


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

# श्रमकल्याण युग

९ फेब्रुवारी २०२१

निवडीचे अनेक निकष पार करून पुरस्कार प्राप्त करणाऱ्या कामगार भूषण पुरस्कार व गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारार्थींचे हार्दिक अभिनंदन !!



## गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांक

## संकेतस्थळाचे उद्घाटन

मुंबई – महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या public.mlwb.in या संकेतस्थळाचे दि.१३ जानेवारी २०२० रोजी कामगार विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव श्री.राजेश कुमार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. पहिल्या टप्प्यात आस्थापनांना कामगार कल्याण निधी भरणा करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी आयोजित परिसंवाद व प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ विविध आस्थापनांतील १२०० हून अधिक एच.आर.मॅनेजर, उद्योग प्रतिनिधींनी घेतला. कार्यक्रमास डॉ.श्रीकांत पुलकुंडवार उपसचिव (कामगार), श्री.सतीश भारतीय (तत्कालीन अवर सचिव), इपिल्पास संघटनेचे अध्यक्ष श्री.सुरेश सुरी, श्रीमती राधा पावसकर (संचालिका, व्हीपीडी कन्सल्टंट), श्रीमती संगीता जोशी (वरिष्ठ व्यवस्थापक, दै. टाइम्स ऑफ इंडिया) आदी मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्यात माहे जानेवारी २०२१ पासून संकेतस्थळासह mahakalyan हे मोबाईल ॲप देखील कार्यान्वित करण्यात आले असून कामगारांना मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाचे अर्ज स्वीकृतीची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.




# आस्थापना नोंदणी आता एका क्लिक वर...

गतिमान कारभार... कामगारांचे कल्याण



**महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६ बब अन्वये राज्यातील आस्थापनांना कामगार / मालक वर्गणी ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.**

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये ५ किंवा त्यापेक्षा अधिक कामगार किंवा कर्मचारी असणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व दुकाने, कंपन्या, कारखाने, बँका, हॉटेल्स, टूर आणि ट्रॅव्हल्स कंपन्या आदी आस्थापनांतील सर्व नियमित, हंगामी, कंत्राटी कामगार/ कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना, उपक्रम व कार्यक्रमांचा लाभ दिला जातो.

### संकेतस्थळाचे वैशिष्ट्य:-

- आस्थापनांनी मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदणी (एकदाच) करावी. नोंदणी करताना पॅन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
- आस्थापनेने भरणा केलेल्या कामगार-मालक वर्गणीच्या पावत्या तत्काल डाउनलोड करता येतील.
- आस्थापनांनी मंडळाच्या संकेतस्थळावर कामगार / कर्मचाऱ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक, कर्मचाऱ्यांची श्रेणी इत्यादी माहिती नमूद करावी. सदर माहितीच्या आधारे प्रत्येक कर्मचाऱ्यास कायमस्वरूपी कर्मचारी ओळख क्रमांक (लेबर आयडेंटीटी नंबर) त्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे कळवला जाईल.
- नोंदणीकृत कामगार / कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मंडळाच्या योजना, उपक्रम व कार्यक्रमांचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.
- कर्मचारी कुटुंबातील सदस्यांची नावे, मोबाईल क्रमांक आदी माहिती संकेतस्थळावर स्वत: अद्ययावत करू शकतील.
- कल्याणकारी योजनांचे अर्ज संकेतस्थळ व मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन भरण्याची सुविधा.

| महाराष्ट्र कामगार कल्याण निधी ऑनलाईन भरण्याची सुविधा | शासनाच्या व्यवसाय सुलभीकरण धोरणाची अंमलबजावणी | प्रत्येक केंद्रातील योजना व उपक्रमांची माहिती मिळणार | कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना मिळणार सहज लाभ |
|---|---|---|---|

संकेतस्थळ: https://public.mlwb.in

गुणवंत विशेषांक
९ फेब्रुवारी २०२१

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

# श्रमकल्याण युग

संपादक
**रविराज इळवे**
कल्याण आयुक्त

कार्यकारी संपादक
**मनोज बागले**
प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी

अक्षर जुळणी, मांडणी व मुद्रण
**मीडिया आर अँड डी (इंडिया) प्रा. लि., मुंबई**

गुणवंत पुरस्काराप्रीत्यर्थ विनामूल्य

पृष्ठे: ७२

अंकात प्रसिद्ध केलेल्या लेखांमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
Maharashtra Labour Welfare Board

## अंतरंग

संपादकीय ........ २
शुभसंदेश ........ ३
**लेख** - कामगार कायद्यातील बदलांना सामोरे जाताना...
- श्री.दिलीप वळसे-पाटील,
मंत्री, कामगार, राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य ........ ९
**लेख** - बाजारतळावरल्या रेघोट्या
- किरण भावसार ........ १२
**श्रमिकांचे काव्यांकुर** - सांग ना ग सटवाई
- उमेश जाधव ........ १४
**पुस्तक परिचय** - भारतीय कामगार चळवळीचे जनक : नारायण मेघाजी लोखंडे ........ १५
पुरस्कारार्थींचा परिचय २०१५ ........ १६
पुरस्कारार्थींचा परिचय २०१७ ........ ३५
राज्यस्तरीय कार्यक्रम २०१९-२०२० ........ ५५
मंडळच्या परिसरात ........ ६३
कल्याणकारी उपक्रम ........ ६८

**पत्र व्यवहारासाठी पत्ता:**
संपादक, श्रम कल्याण युग, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ०१३.
दूरध्वनी: ०२२-४३२२ ६८१२/ ४३२२ ६८२५
संकेतस्थळ: www.public.mlwb.in / www.mlwb.in




कोरोनाचे गडद मळभ ओसरत असताना कामगारांना दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराच्या निमित्ताने एक सकारात्मक संदेश समाजात पोहोचेल, अशी मला खात्री आहे. सबंध मानवजातीला कोरोना महामारीने घरात कोंडून ठेवले होते परंतु अशा संकटातही महानगरे, शहरे आणि गावागावांत भाजीपाला, अन्नधान्य, दूध आदी जीवनावश्यक बाबींचा पुरवठा होत होता. कार्यालये, वाहने, रस्ते यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण होत होते. आरोग्य यंत्रणेला आवश्यक असलेले पीपीई किट, औषधे व इतर साधनसामुग्री उपलब्ध होत होती. हे सर्व शक्य झाले कामगारांच्या बळावर. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता कामगार या संकटकाळात राबत होता. या कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गुणवंत कामगारांचा मंडळाच्यावतीने गौरव केला जात आहे, ही मंडळासाठी अभिमानाची बाब आहे.

कामगार भूषण आणि गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार (सन २०१५ आणि २०१७) वितरण सोहळ्याच्या निमित्ताने 'श्रमकल्याण युग गुणवंत विशेषांक' वाचकांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. कामगार क्षेत्रात या अंकाचे स्वागत होईल, अशी मला खात्री आहे. पुरस्काराच्या निमित्ताने सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, आरोग्य अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचा सत्कार होत आहे. अंकात गुणवंत कामगारांचा थोडक्यात परिचय आहे. पुरस्कारार्थींमध्ये विविध उद्योग, व्यवसाय, बँका, एस. टी. महामंडळ, कारखाने अशा विविध क्षेत्रातील कामगारांचा समावेश आहे. यातून कामगार क्षेत्राची व्याप्ती किती मोठी आहे हे अधोरेखित होते. तसेच कामगार लेखकांनी लिहिलेले लेख आणि कविता यातून कामगारांची लेखणी किती समृद्ध आहे, याची प्रचिती येते. मा.मंत्री (कामगार) यांनी कामगार कायद्यांमध्ये होत असलेल्या बदलांचा मागोवा घेणारा लेख लिहून कामगारांशी असलेली आपली कटिबद्धता अधोरेखित केली आहे.

मंडळाने public.mlwb.in हे संकेतस्थळ आणि mahakalyan हे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले आहे. त्यामुळे कामगारांना मंडळाचे सभासदत्व घेणे किंवा विविध योजनांचे अर्ज ऑनलाईन भरणे शक्य झाले आहे. तसेच आस्थापनांना मंडळाकडे ऑनलाईन नोंदणी करणे, कामगार-मालक वर्गणी भरणे सोयीचे झाले आहे. मंडळाची ही सुविधा कोरोना संसर्गाच्या कठीण काळात उपलब्ध झाल्याने लाभार्थी कामगार व कुटुंबीयांना तसेच नोंदित आस्थापनांना देखील मोठा दिलासा मिळाला आहे.

दैनंदिन काम आणि कौटुंबिक जबाबदारी सक्षमपणे सांभाळून सामाजिक भान देखील जपणाऱ्या सर्व पुरस्कारार्थी कामगारांचे हार्दिक अभिनंदन!

(रविराज इळवे)
संपादक व कल्याण आयुक्त



सत्यमेव जयते

**मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १८ जानेवारी २०२१

# शुभ संदेश

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत 'गुणवंत कामगार गौरव सोहळ्या'च्या निमित्ताने 'श्रमकल्याण युग' विशेषांक प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला.

कामगारांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य या मंडळाकडून होत आहे. या प्रयत्नांचा भाग म्हणून कामगारांसह त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी मंडळाच्या योजना कौतुकास्पदच आहेत. कामगारांच्या गुण कौशल्यांना प्रोत्साहन देण्याचे काम 'गुणवंत कामगार,' 'कामगार भूषण' अशा पुरस्कारांच्या माध्यमातून होत आहे. विविध क्षेत्रात कार्यरत कामगारांना या कौतुकच्या थापेमुळे निश्चितच हुरूप मिळत आहे.

'श्रमकल्याण युग' विशेषांकाच्या प्रकाशनास आणि 'कामगार कल्याण मंडळा'च्या सर्व उपक्रमांना मन:पूर्वक शुभेच्छा!

उद्धव ठाकरे

**(उद्धव बाळासाहेब ठाकरे)**



सत्यमेव जयते

**उप मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १९ जानेवारी २०२१

# शुभ संदेश

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने मंडळाच्यावतीने ‘श्रमकल्याण युग विशेषांक’ प्रकाशित करण्यात येणार असल्याचे समजून आनंद झाला. या पुरस्कार सोहळ्यासह विशेषांकाच्या उपक्रमाला मन:पूर्वक शुभेच्छा. पुरस्कारप्राप्त कामगार बंधू–भगिनींचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन.

कामगार हा राज्याच्या विकासाचा कणा आहे. कामगारांच्या श्रमावरच उद्योग, बांधकाम, सेवा यांसारखी अनेक क्षेत्रे आज उभी आहेत. देशातील पहिले कामगार नेते स्वर्गीय नारायण मेघाजी लोखंडे यांच्या दैदिप्यमान कामगार चळवळीचा इतिहास आपल्या महाराष्ट्राला आहे. महाराष्ट्र शासनाचे कायमच कामगारांच्या हिताला प्राधान्य राहिले आहे. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली. गेल्या सहा दशकांपासून ‘शिस्त, सेवा, सुधार आणि समृद्धी’ हे ब्रीद घेऊन मंडळाचे काम सुरू आहे.

कामगारांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी यासाठी मंडळातर्फे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना प्रतिवर्षी गौरविण्यात येते. ‘विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार’, ‘कामगार भूषण पुरस्कार’ आणि ‘रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे कामगार मित्र’ अशा मानाच्या पुरस्कारांचा यामध्ये समावेश आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून कामगारांचे मनोबल उंचविणारा आहे.

या पुरस्कार सोहळ्याचे औचित्य साधून प्रकाशित करण्यात येणाऱ्या ‘श्रमकल्याण युग विशेषांका’त मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना, उपक्रम, कार्यक्रमांसह कामगार पुरस्कारार्थींचा सचित्र परिचय देण्यात येणार असल्याचे समजून विशेष आनंद झाला. हा विशेषांक कामगार विश्वाची परिपूर्ण माहिती देणारा संग्राह्य अंक असेल, याची मला खात्री आहे. या विशेषांकाला मन:पूर्वक शुभेच्छा.

**(अजित पवार)**



सत्यमेव जयते

मंत्री
कामगार, राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक १ फेब्रुवारी २०२१

## शुभ संदेश

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा ३३ वा 'गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार' वितरण सोहळा दि. ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी संपन्न होत असून त्यानिमित्ताने मी सर्व पुरस्कारप्राप्त कामगारांचे हार्दिक अभिनंदन करतो.

कामगार हा फक्त कारखाने किंवा आस्थापनांमध्ये काम करणारा यंत्रमानव नसून समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात होत असलेल्या घडामोडीत त्याचा सक्रीय सहभाग असल्याचे या पुरस्काराच्या निमित्ताने अधोरेखित होत आहे. कामगारांचा सामाजिक दर्जा उंचविण्यात आणि त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात सदर पुरस्काराचा मोठा वाटा आहे.

पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने मंडळाच्या 'श्रमकल्याण युग विशेषांका'चे प्रकाशन होत आहे. श्रमकल्याण युग विशेषांकात मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम यांच्या माहितीसह पुरस्कारार्थी कामगारांचा परिचय असल्याने हा विशेषांक संग्राह्य असणार आहे. 'श्रमकल्याण युग' गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांकासही माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(दिलीप वळसे-पाटील)



सत्यमेव जयते

**राज्यमंत्री**
**जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण,**
**महिला व बाल विकास,**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, कामगार**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : २८ जानेवारी २०२१

## शुभ संदेश

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे ३३ वा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार आणि कामगार भूषण पुरस्कार वितरण समारंभानिमित्त 'श्रमकल्याण युग' या मुखपत्राचा पुरस्कार विशेषांक दि. ९ फेब्रुवारी २०२१ रोजी प्रकाशित करणार असल्याचे समजून आनंद वाटला. त्यानिमित्ताने मी सर्व पुरस्कारप्राप्त कामगारांचे हार्दिक अभिनंदन करतो.

कामगार हा फक्त कारखाने किंवा आस्थापनांमध्ये काम करणारा यंत्रमानव नसून समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात होत असलेल्या घडामोडीत त्याचा सक्रिय सहभाग असल्याचे या पुरस्काराच्या निमित्ताने अधोरेखित होत आहे. कामगारांचा सामाजिक दर्जा उंचविण्यात आणि त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यात सदर पुरस्कारांचा मोठा वाटा आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ १९५३ पासून राज्यातील कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काम करत आहे. कामगार व त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान सुधारावे यासाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा व आरोग्य विषयक उपक्रम राबवित आहे. श्रमकल्याण युग विशेषांकाच्या माध्यमातून पुरस्कारार्थी कामगारांच्या कार्याची राज्याला ओळख होणार आहे. तसेच कामगारांना मोठे प्रोत्साहन मिळणार आहे.

या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने मंडळाच्या 'श्रमकल्याण युग विशेषांका'चे प्रकाशन होत आहे. श्रमकल्याण युग विशेषांकात मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम यांच्या माहितीसह पुरस्कारार्थी कामगारांचा परिचय असल्याने हा विशेषांक संग्राह्य असणार आहे. श्रमकल्याण युग गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांक व मंडळाच्या पुढील वाटचालीस देखील माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**(ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू)**



**प्रधान सचिव (कामगार),**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३ फेब्रुवारी २०२१

## शुभ संदेश

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे कामगार/ कर्मचाऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याबरोबरच त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे काम करण्यात येते. तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन अशा विविध घडामोडीत सक्रिय असलेल्या कामगारांतून नेतृत्व पुढे यावे यासाठी देखील मंडळ प्रोत्साहन देत असते, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

मंडळातर्फे कामगारांना गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार आणि कामगार भूषण पुरस्कार देऊन गौरविले जाते. कामगारांच्या कार्याची शासकीय पातळीवर दखल घेतल्यामुळे ते अधिक सक्रियपणे काम करताना दिसतात. शासनाची स्त्रीभ्रूण हत्या विरोधी जनजागृती मोहीम, रक्तदान व अवयव दान, पूर व भूकंपासारख्या नैसर्गिक संकटाच्या काळात गुणवंत कामगार हिरिरीने मदतकार्यात सहभागी झाल्याचे दिसून येते. राज्यातील कामगारांचे हित जपले जावे हेच महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. त्यानुषंगाने दिले जाणारे सदर पुरस्कार कामगार नेतृत्व घडवण्याच्या प्रक्रियेत मैलाचा दगड ठरतात.

आद्य कामगार नेते कै. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या स्मृतीदिनी दि. ९ फेब्रुवारी २०२१ रोजी सदर पुरस्कारांचे वितरण होत आहे. सर्व पुरस्कारार्थी बंधू–भगिनींना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा. तसेच यानिमित्त प्रकाशित होणाऱ्या 'श्रमकल्याण युग  गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांका'स देखील शुभेच्छा!

**(विनिता वेद-सिंघल, भा.प्र.से.)**



**कामगार आयुक्त**
महाराष्ट्र राज्य
कामगार भवन, ब्लॉक–ई, सी–२०
वांद्रे–कुर्ला संकुल
वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१,
दिनांक : ०३ फेब्रुवारी २०२१

# शुभ संदेश


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे दिले जाणारे 'गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार' आणि 'कामगार भूषण पुरस्कार' सन २०१५ व २०१७ चे दि. ९ फेब्रुवारी २०२१ रोजी वितरण होणार असल्याचे आणि या निमित्ताने मंडळाचे मुखपत्र असलेल्या 'श्रमकल्याण युग – गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांका'चे प्रकाशन होणार असल्याचे समजून आनंद झाला.

कामगार विश्वात सदर पुरस्कारांना विशेष महत्त्व आहे. आपल्या दैनंदिन कामात व्यस्त असून देखील समाजकार्यात सक्रिय असलेल्या कामगारांना अशा पुरस्कारांमुळे मोठे बळ मिळते. महाराष्ट्र शासन नेहमीच कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. राज्याचे धोरण उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणारे आणि त्याचबरोबर कामगारांचे हित जपणारे आहे. त्यामुळे गुणवंत पुरस्कारांच्या माध्यमातून कामगारांच्या कार्याची दखल घेण्यात येऊन त्यांना गौरविण्यात येत आहे.

औद्योगिक आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवर महाराष्ट्राचे स्थान नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. जगाच्या औद्योगिक वाटचालीत मुंबई शहर आणि महाराष्ट्राचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. देशातील पहिली कामगार संघटना कै. नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन केली, ती याच महाराष्ट्रात. हे सर्व शक्य झाले कामगारांच्या कष्टामुळे आणि त्यांना असलेल्या सामाजिक भानामुळे. त्यामुळे सदर पुरस्काराने गौरविण्यात येणारे कामगार/ कर्मचारी पुढील आयुष्यात अधिक जोमाने काम करून राज्याच्या नावलौकिकात भर टाकतील, याची मला खात्री आहे.

सर्व पुरस्कारार्थी बंधू–भगिनींना आणि यानिमित्ताने प्रकाशित होत असलेल्या 'श्रमकल्याण युग – गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार विशेषांका'स माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**(डॉ.महेंद्र कल्याणकर, भा.प्र.से.)**




**श्री. दिलीप वळसे-पाटील**
मा. मंत्री,
कामगार, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य




# कामगार कायद्यातील बदलांना सामोरे जाताना...

> विविध २९ कामगार कायद्यातील तरतुदी एकत्रित करून एकूण चार संहिता संसदेने पारित केल्या असून त्यांना मा. राष्ट्रपतीची संमती प्राप्त झालेली आहे. तथापि, या संहितांच्या अंमलबजावणीच्या तारखा केंद्र सरकारने अद्याप अधिसूचित केल्या नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत पूर्वीचेच कामगार कायदे लागू आहेत.

केंद्र सरकारने (राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने) संसदेच्या दोन्ही सभागृहांत (दि.२१ सप्टेंबर, २०२० रोजी लोकसभेमध्ये आणि २३ सप्टेंबर २०२०, रोजी राज्यसभेमध्ये) कामगार विषयक औद्योगिक संबंध संहिता (कोड) २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता (कोड) २०२०, आणि औद्योगिक सुरक्षा आरोग्य आणि सेवाशर्ती संहिता (कोड) २०२० या तीन संहिता मंजूर केल्या. तसेच त्यापूर्वी ऑगस्ट २०१९ मध्ये अशाच पद्धतीने वेतन संहिता २०१९ (वेज कोड) संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर करण्यात आली होती.

या चारही संहितांना सन १९९९ मध्ये श्री.रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या दुसऱ्या श्रम आयोगाच्या अहवालाची पार्श्वभूमी आहे. सदर आयोगाचा अहवाल सन २००२ मध्ये तत्कालीन पंतप्रधानांना (राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारला) सादर करण्यात आला होता. तद्नंतर सन २०१४ मध्ये केंद्रात पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार आल्यावर या अहवालातील कामगार कायदेविषयक शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. विविध २९ कामगार कायद्यातील तरतुदी एकत्रित करून या चार संहिता संसदेने पारित केल्या असून त्यांना मा. राष्ट्रपतीची संमती प्राप्त झालेली आहे. तथापि, या संहितांच्या अंमलबजावणीच्या तारखा केंद्र सरकारने अद्याप अधिसूचित केल्या नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत पूर्वीचेच कामगार कायदे लागू आहेत.

या चार संहितांपैकी औद्योगिक संबंध संहिता २०२० ही औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७, औद्योगिक रोजगार (स्थायी आदेश) अधिनियम १९४६,

> ज्या कारखान्यांमध्ये एकापेक्षा अधिक कामगार संघटना आहेत व त्यापैकी कोणत्याही संघटनेकडे ५१ टक्केपेक्षा जास्त कामगार सभासद नाहीत अशा ठिकाणी किमान २० टक्के सभासद संख्या असणाऱ्या संघटनांचे 'निगोशिएटिंग कौन्सिल' नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे.

आणि श्रमिक संघ अधिनियम १९२६, या तीन कायद्यांच्या एकत्रीकरणातून तयार करण्यात आली आहे. या संहितेतील तरतुदींबाबत विवादाचे मुद्दे उपस्थित होत आहेत. विशेषतः ३०० कामगार संख्येपर्यंतचे कारखाने बंद करण्यास परवानगीची आवश्यकता नसणे तसेच कायम कामगारांऐवजी 'फिक्स टर्म' (निश्चित कार्यकाळ) कामगार नेमण्यास परवानगी आदी तरतुदींबाबत कामगार क्षेत्रात असंतोष आहे.

सध्या देशात औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ हा कायदा लागू आहे. या कायद्यानुसार १०० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांना ले ऑफ, कामगार कपात, क्लोजर यासाठी सरकारची परवानगी घेणे आवश्यक आहे. यासाठी ९० दिवस आधी सरकारकडे अर्ज करणे आणि सुनावणी झाल्यावर सरकारने परवानगी दिल्यास कारखाना बंद करणे अशी व्यवस्था आहे. केंद्र सरकारने आता नवीन कायद्यानुसार ती मर्यादा ३०० पर्यंत वाढवलेली आहे. १०० ची मर्यादा ३०० पर्यंत वाढविल्याने सरकारची परवानगी आवश्यक असणाऱ्या कारखान्यांची संख्या केवळ १० ते २० टक्के राहील. ८० टक्के कारखाने हे या मर्यादेच्या आत असल्याने ते केव्हाही बंद करण्यास अथवा कामगार कपात करण्यास मुभा राहणार आहे. या ३०० कामगार संख्येमध्ये कारखान्यातील प्रत्येक कामगार मोजला जाणार नसून फक्त कायम कामगार मोजले जातील. याआधी 'ॲप्रेंटिस' हे कामगाराच्या व्याख्येत येत होते. मात्र, ते या संहितेत कामगाराच्या व्याख्येतून वगळण्यात आलेले आहेत. या संख्येत कंत्राटी कामगारही मोजावेत ही कामगार संघटनांची मागणी मान्य करण्यात आलेली नाही. शिवाय, 'फिक्स टर्म एम्लॉयमेंट'ला कायदेशीर मंजुरी दिल्यामुळे कायम कामगारांना 'फिक्स टर्म एम्पलॉयमेंट' मध्ये म्हणजे 'कॉन्ट्रॅक्ट'मध्ये परिवर्तित केले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कामगार संघटना नोंदणीच्या कायद्यात दुरुस्ती करून कामगार संघटनांना मान्यता देण्याची तरतूद नव्याने करण्यात आलेली आहे. या तरतुदींनुसार उद्योगात अथवा कारखान्यांत ५१ टक्क्यांपेक्षा जास्त कामगार सभासद असल्यास, त्या संघटनेला 'निगोशिएटिंग युनियन' म्हणून मान्यता देण्यात यावी अशी तरतूद केली आहे. ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक संघटना असतील व त्यापैकी कोणत्याही संघटनेकडे ५१ टक्के पेक्षा जास्त कामगार सभासद नसल्यास किमान २० टक्के सभासद संख्या असणाऱ्या संघटनाचे 'निगोशिएटिंग कौन्सिल' नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे. मान्यताप्राप्त युनियनचा अधिकार किमान तीन वर्षांचा व जास्तीत जास्त पाच वर्षांचा राहील. त्यानंतर नव्याने मान्यतेबाबत प्रक्रिया होईल. सध्याच्या औद्योगिक विवाद कायद्यात मान्यतेबाबत तरतूद नाही. तथापि, यासाठी महाराष्ट्रात 'बीआयआर ॲक्ट' आणि 'एमआरटीयू ॲक्ट' हे दोन कायदे आहेत. या कायद्यांमध्ये मान्यताप्राप्त संघटनांना हा दर्जा देण्याचा अधिकार निबंधक/ औद्योगिक न्यायालयास आहे. तथापि, नवीन कोडमध्ये 'निगोशिएटिंग युनियन' हा दर्जा देण्याचा अधिकार मालकास देण्यात आलेला असून या तरतुदींसंबंधात कामगार संघटनांकडून मोठा आक्षेप घेतला जात आहे.

सद्यस्थितीत कायदेशीर तरतुदीनुसार औद्योगिक स्थायी आदेश १०० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू आहेत, तर महाराष्ट्रात या कायद्यातील राज्य सुधारणेनुसार ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार संख्या असणाऱ्या आस्थापनांना लागू आहेत. औद्योगिक संबंध संहितेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर स्थायी आदेशांची तरतूद ३०० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांनाच लागू राहील. सदर मुद्दा या संहितेच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये कधीही चर्चेत आलेला नव्हता. शिवाय, स्टॅण्डिंग कमिटीनेही याबाबत शिफारस केलेली नव्हती. असे असताना केलेला हा बदल 'आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO)'च्या कन्व्हेन्शन १४४चा भंग करणारा आहे. कामगारांची



कपात करणे तसेच त्यांना ले ऑफ देणे, कारखाना बंद करणे, तसेच स्थायी आदेश लागू करणे यासाठी ३०० किंवा त्यापेक्षा अधिक वाढविण्यात आलेली कामगारांची संख्या विचारात घेता महाराष्ट्रात १०० पेक्षा अधिक कामगार असलेले ५७०० कारखाने असून ३०० पेक्षा जास्त कामगार असलेले कारखाने केवळ १६०० आहेत. म्हणजे नव्या तरतुदींनुसार ४१०० कारखाने वगळले जाऊन तेथील कामगारांना औद्योगिक संबंध संहितेचे संरक्षण मिळणार नाही.

उर्वरित तीन कामगार संहितांबाबत कामगार संघटनांचा फारसा विरोध दिसून येत नाही. तथापि, या संहितांमध्ये व्यवस्थापनांकडून होणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या कायदेशीर तरतुदींच्या उल्लंघनासाठी कारावासाची शिक्षा असली तरी गुन्ह्याच्या क्षमापनाची (compounding of offence) तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच व्यवस्थापनांकडून झालेल्या गुन्ह्यांसाठी मालकाला जबाबदार न धरता गुन्ह्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीस जबाबदार धरण्याची तरतूद केल्याने या संहितांच्या अंमलबजावणीबाबत मालकवर्गामध्ये गांभीर्य राहणार नाही व संबंधित शासकीय यंत्रणेचा वचकही राहणार नाही.

वेतन संहिता २०१९ हा कायदा ऑगस्ट २०१९ मध्ये संसदेने मंजूर केलेला असूनही व केंद्र सरकारने मसुदा नियम प्रसिद्ध करून देखील अद्यापपर्यंत लागू झालेला नाही. याबाबत चौकशी केली असता असे समजते की, या कायद्यात वेतन या शब्दाच्या व्याख्येत मूळ वेतन किमान ५० टक्के असावे, ही अट मालकवर्गास रुचत नसल्यामुळे उद्योजकांकडून दबाव निर्माण झाल्याने हा कायदा अद्याप लागू झालेला नाही.

महाराष्ट्र शासनाने सदर संहिता राज्यात लागू करण्यापूर्वी संबंधित घटकांशी, विशेषतः कामगार संघटनांशी चर्चा करून व त्यांची याबाबतची मते जाणून घेऊन निर्णय घेण्याची भूमिका दि. ७ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाने दि.२० ऑक्टोबर २०२० रोजी राज्यातील प्रमुख कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत सर्वच कामगार संघटनांनी प्रामुख्याने औद्योगिक संबंध संहिता, २०२० मधील कारखाना बंद करणे, कामगार कपात करणे व ले ऑफ देणे यासाठी शासनाची पूर्वपरवानगी बंधनकारक असण्याची मर्यादा १०० ऐवजी ३०० कामगार एवढी वाढविण्यात येणे, निश्चित कार्यकाल रोजगार (FTE), स्थायी आदेश ३०० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार कार्यरत असलेल्या आस्थापनांना लागू करणे, अशा नव्याने करण्यात आलेल्या तरतुदींना विरोध दर्शविला आहे. याशिवाय बहुतांश कामगार संघटनांनी केंद्र शासनाने पारित केलेल्या या कामगार संहिता कामगारविरोधी असल्याचे प्रतिपादन केले आहे.

वास्तविक पाहता कामगार हा विषय भारतीय राज्य घटनेच्या समवर्ती (concurrent) सूचीमध्ये समाविष्ट असल्याने या विषयावर कायदे करण्याचे अधिकार केंद्र सरकारसोबत राज्य सरकारला देखील आहेत. भारतीय राज्य घटनेतील या तरतुदीनुसार महाराष्ट्राने कामगारहिताचे विविध राज्यकायदे पारित करून तसेच केंद्रीय कायद्यांमध्ये कामगारहिताचे राज्यापुरते बदल करून आपले पुरोगामित्व सिद्ध केले आहे. नव्याने येऊ घातलेल्या लेबर कोडमध्ये केंद्र सरकारने राज्य सरकारांना या कायद्यांमध्ये बदल करण्याचे अधिकार ठेवलेले नाहीत. सद्यस्थितीत हे लेबर कोड स्वीकारून त्यांची अंमलबजावणी करण्याशिवाय राज्य शासनाला दुसरा पर्याय दिसून येत नाही. तथापि, राज्य शासनाच्या अधिकारात या चारही संहितांचे नियम तयार करताना कामगारहिताचे जास्तीतजास्त संरक्षण होईल व उद्योगांनाही चालना मिळेल अशा तरतुदी करण्याची भूमिका राज्य शासनाची राहील.

# बाजारतळावरल्या रेघोट्या...



किरण भावसार
१९, विश्वप्रभा, संजीवनी नगर,
सरादवाडी रोड,
सिन्नर – ४२२११३
मोबाईल: ७७५७०३१९३३

**गावातल्या कुठलाही महत्त्वाच्या कार्याचा मुहूर्त बाजारच्याच दिवशी असे. निवडणुकींच्या प्रचार सभा, गणपतीच्या ओट्यावरची नाटकं, कनातीतले पिक्चरचे खेळ, तमाशे, ग्रामपंचायतीचे लिलाव, विकासकामांची उद्‌घाटनं... सगळं काही याच दिवशी. आठवडाभराचे वाणसामान, भाजीपाला आदी बाजारवस्तूंबरोबरच पुढच्या बाजारापर्यंत पुरेल इतका उत्साह, चैतन्य, जोश, तरतरी या बाजारामुळे कष्टाने पिचलेल्या मनांमध्ये भरत असे. बाजाराच्या गलक्याबरोबरच त्याचा एक विशिष्ट वासही असायचा, कृत्रिमतेचा लवलेश नसलेला नैसर्गिक! माझ्या मनाने तो आजवर साठवून ठेवला आहे!**

देवनदीची चढण ही अशी चढून गावाकडं निघालो की, आपण बाजारतळाच्या पटांगणात येतो. एकीकडं सुतारन्येहा, कुंभारवाडा असं थेट नदीपर्यंत उतरत गेलेलं गाव अन् दुसरीकडं चिंचेची बाग यांच्या दुभाळक्यात बाजारतळाचा विस्तार झालेला. इथंच चिंचेची, वडाची मोठमोठी झाडं, त्यांना बांधलेले पार, नदीकाठावर गावातल्या काही थोर पुरुषांच्या समाध्या. स्मशानभूमी, मुस्लिमांची दफनभूमी, लिंगायत समाजाची थडगी अशा चिरशांती घेतलेल्या पूर्वजांनी या जागेला वेढा घातलेला. अगदी याच ठिकाणी देवनदी वळसा घालून मेंढी-चोंढीच्या दिशेने धावू लागते.

सर्वत्र बांधलेले छोटे-छोटे मातीचे बाजार ओटे, आताशा ग्रामपंचायतीने बांधलेलं बाजार शेड पाहिल्यावर ही जागा आठवडे बाजाराची असावी असं सहज लक्षात येतं. गावाच्या पूर्वेला नदीकाठी असलेल्या या बाजारतळानं आमचं अख्खं लहानपण खेळवत-खेळवत आम्हाला आपल्या अंगाखांद्यावर मिरवलेलं..

एरवी ओकीबोकी वाटणारी ही जागा बुधवारच्या आठवडे बाजारी कशी फुलून यायची, मोहरून जायची. आजूबाजूच्या दहा-बारा खेड्यांतील वाटा बाजाराच्या दिशेने धुवट, नीटनेटके कपडे लेऊन, डोईवर पाट्या, माळवं, पिशव्या घेऊन चालू लागायच्या. शेतकरी, मजूर, पोरंबाळं सगळ्यांच्या आनंदाचा हा दिवस. बाजार म्हणजे दर आठवड्याला भरणारी जत्राच ती!

तालुक्याच्या गावातले व्यापारी दुकानदार आपापली दुकानं घेऊन यायचे अन् बाजार ओट्यांवर पालं ठोकायचे. गूळवाले, किराणावाले, मसालेवाले, आयते कपडे, कापड दुकानं, हरेक माल, सुया बिबवे-फणी-कंगवे, कुलुपं-किल्ल्या बनवणारे, स्टील-जरमनची भांडी, मटन-मासे, बोंबील-झिंगे, झाडू, शिरया, भेळ-भत्ता, जिलबी, गोडीशेव, लहान मुलांची कचकड्याची खेळणी, पोळपाट-लाटणे, खुरपे-विळे, दोरखंड, आंबे, केळी, चिकू-सफरचंद अशी कितीतरी दुकानं! बाजारतळ सजून-गजबजून जायचा. एका बाजूला हिरवी आळी, सगळी माळवं-भाजीपाल्याची रांग बसलेली. अधून मधून धान्याची बोचकी. गहू, बाजरी, ज्वारी, मठ-मूग, कुळीथ असं इरवड घेऊन शेतकरी बसलेले. नाकातल्या भल्या थोरल्या नथीला सावरीत, मिसरीचं बोट गुपचूप दातांवरून फिरवीत पुन्हा काटा-माप हातात धरणाऱ्या बायका, कशिद्याच्या, झालरीच्या पिशव्या घेऊन खरेदीला लोटलेली पंचक्रोशी.



'चला सस्ते लावले' 'आता थोडेच राहिल्ये बरं का!' 'चला इकडं खाणाऱ्याची मजा!' अशा कितीतरी भुरळ पाडणाऱ्या आरोळ्या. दोन-पाच रुपयांत हातातली पिशवी भाजीपाला, खाऊ अशा बाजार वस्तूंनी शिगोशीग भरून जाई. हट्टानं ताईचं बोट धरून हा बाजार पालथा घालताना किती मजा यायची. एखादे वेळी प्लॅस्टिकची मोटारगाडी, शिट्टी, भोवरा, चेंडू असल्या वस्तूंसाठी हट्ट करायचो. भरल्या बाजारात भोकाड पसरून, प्रसंगी आवडलेली वस्तू दुकानातून उचलून हातात घेऊन ताईची पंचाईत करायचो. बऱ्याचदा ती हा हट्ट मोडून काढायची अन् कधी कधी एखादी गरजेची वस्तू घेणं टाळून लाडकोडही पुरवायची.

बाजारचा एक विशिष्ट गलका असायचा. सर्व आवाजांचा मिळून एक आवाज. कधी आठवडे बाजारी गावात तमाशाचा फड उतरायचा. तमाशाची जाहिरात करणारी गाडी पंचक्रोशीत फिरायची. मधून-मधून बाजारतळावर यायची. तमाशाच्या या जाहिराती 'कड कड कड कड, ढंगळांग मचळांग, आला आला आला तमाशाऽऽ, तमाशाऽऽ, तमाशाऽऽ, अशा मोठ्या मजेदार ढंगात असायच्या.



शाळा सुटल्यानंतर आमची बच्चे कंपनी तमाशाच्या राहुट्या, तंबूभोवती गर्दी करायची. कनात लावून रुपया- दोन रुपयांत जुने मराठी चित्रपटही याच आठवडे बाजारी मनमुराद पाहिले आहेत. निळू फुले, अरुण सरनाईक, जयश्री गडकर, यशवंत दत्त, दत्ता साळवी, वसंत शिंदे, गणपत पाटील, अशोक सराफ ही मंडळी घरातल्या माणसांइतकी चिरपरिचित झालेली!

पोळ्याचा आठवडे बाजार मात्र वरच्या वेशीला बसस्टँडच्या परिसरात भरायचा. बैलांचे निरनिराळे रंग, आभूषणे हे या बाजाराचे खास वैशिष्ट्य! चवर, छंबी, गोंडे, कासरे, नाडे, गेरू, हिंगुळ, क्वचित झुली, घाट्या, घुंगरं असा सगळा साज असायचा. पूजेसाठी मातीचे बैल विक्रीला असायचे. मोठ्या आकाराचे मातीचे बैल घेण्यासाठी जीव फार तुटायचा पण घरातून मात्र त्यास विरोध! लहानपणी एकदा कधीतरी हट्ट करीत बैलांची जोडी घेतली तर घरी नेतानाच कुणाचा तरी धक्का लागून एका बैलाचा पाय मोडला. त्यावर्षी पोळ्याच्या सणाचा आनंदच घेऊ शकलो नाही. माझ्या बालवयातल्या आनंदाचाच पाय मोडला होता जणू!

(आता मुलांना या मातीच्या बैलांमध्येही फारसा रस नाहीये. गेल्या पोळ्याला त्यांना मी जबरदस्तीने मातीच्या मोठ्या बैलांची जोडी विकत घेऊन दिली. खरंतर हरवलेलं, निसटून गेलेलं बालपणातलं ते सुख मिळवण्याचा मी केलला तो केविलवाणा प्रयत्न असावा!)

बाजारात नवनाथसारखे काही मित्र दुकानदारांचे सामान वाहून नेणे, बाजार ओटे साफ करणे अशी कामे करीत. सुनील लोहारकर थरथरत्या डोक्यावरून भल्या थोरल्या तांब्याच्या हंड्यानं पाणी वाहून भावाच्या मदतीनं अख्ख्या बाजाराला चहा-पाणी पाजीत असे.

गावाचा कुठलाही महत्त्वाच्या कार्याचा मुहूर्त बाजारच्याच दिवशी असे. निवडणुकीच्या प्रचार सभा, गणपतीच्या ओट्यावरची नाटकं, कनातीतले पिक्चरचे खेळ, तमाशे, ग्रामपंचायतीचे लिलाव, विकासकामांची उद्घाटनं सगळं काही याच दिवशी. आठवडाभराचं वाणसामान, भाजीपाला आदी बाजार वस्तूंबरोबरच पुढच्या बाजारापर्यंत पुरेल इतका उत्साह, चैतन्य, जोश, तरतरी हा बाजार कष्टाने पिचलेल्या मनांमध्ये भरायचा. बाजाराच्या गलक्याबरोबरच त्याचा एक विशिष्ट वासही असायचा, कृत्रिमतेचा लवलेश नसलेला नैसर्गिक! माझ्या मनाने तो आजवर साठवून ठेवला आहे!

बहुरूपी, रायरंद, वासुदेव (याला आम्ही गोपीबाबा म्हणायचो) गारुड्याचे खेळ, डोंबारी यांचेही खेळ बाजारचा दिवस साधून बाजारतळाजवळचे गर्दीचे ठिकाण अन् सावली हेरून रंगायचे. शनिखालची चिंच या सगळ्यांची साक्षीदार राहिली आहे..

***

बाजारात जायचा तो उत्साह आता केव्हाच मावळलाय! नाही म्हणायला बायकोच्या आग्रहाखातर तिच्यासोबत शहरातल्या बाजारात जातोही. पण या बाजारात फक्त माझा देह फिरत असतो, मन तर कधीच पिसासारखं हलकं होऊन वडांगळीच्या बाजारतळावरील चिंचेच्या झाडावर जाऊन बसलेलं असतं. त्या आरोळ्या, तो आवाज, तमाशा-पिक्चरच्या जाहिराती, मसाल्याचा, भाजीपाल्याचा, तळलेल्या खाऊचा असा वेगळाच वास.. अशा चित्रांची अन् सयींची साय मनावर दाटून आलेली असते आणि इकडे हातात बाजाराची पिशवी कोंबत बायको 'कुठं हरवलात?' असा मिश्किल सवाल करीत घराकडं दामटत असते...

■■■



**उमेश वामन जाधव**
विभा हॉस्पिटलिटी सर्विस,
गोदरेज रुग्णालय, विक्रोळी
मोबाईल क्र. - ८८७९८०३१६२

# सांग ना ग सटवाई

ज्या खांद्यानं डोली वहायची
त्या खांद्याला ताटी वहायला लागली
सांग ना ग सटवाई
तू माझ्या ताईसोबत अशी का वागली ?

तिनं माझ्या शिक्षणासाठी
स्वत: कायमची घेतली रजा
समजुतीचा गुणाकार करून
माझ्या अज्ञानाचं दु:ख केलं वजा
मायेची बेरीज करता करता
नाही थकली नाही भागली...

माझ्या हॉस्पिटलच्या बिलासाठी
तिने बाबांना दागिने दिले काढून
आणि माझ्या भविष्याच्या ताटात
मला सुंदर आयुष्य ठेवलं वाढून
आईसोबत उपाशी राहून
ती सुद्धा रात्र-रात्र जागली...

जरी परिस्थितीचं डोईजड ओझं
ताई निमूटपणे वाहत राहिली
पण स्वाभिमानी होता बाणा तिचा
नाही कधीच कुणाला भ्यायली
तिच्या आयुष्याच्या रणभूमीवर
आज तोफ काळाने डागली...

अगं, तुला चांगलं लिहिता येत नाही
तर मग वाईटही लिहू नको
कुणाची लाडकी बहीण भावापासून
बळजबरीने हिरावून घेऊ नको
बहीण-भावाच्या गोड प्रेमाची
किती उदाहरणं आहेत चांगली...



# भारतीय कामगार चळवळीचे जनक : नारायण मेघाजी लोखंडे



भारतातील पहिली कामगार चळवळ महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक विचारप्रणालीतून रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८८४ साली स्थापन केली. देशात संशोधित फॅक्टरी ॲक्ट निर्माण होण्यासह आज भारतीय कामगारांना भरपगारी आठवडी सुटी व अनेक सोयीसुविधा प्राप्त होत आहेत. त्याचे सर्व श्रेय नारायण मेघाजी लोखंडे यांना जाते.

१९२० नंतर देशात प्रस्थापित झालेल्या कामगार संघटनानी भारतीय कामगारांच्या आद्य चळवळीला विस्मृतीत टाकले होते. परंतु सत्यशोधक परंपरेतील संशोधक मनोहर कदम यांनी अनेक वर्षे संशोधन व अभ्यास करून भारतीय कामगारांचे आद्य पुढारी, भारतातील पहिल्या कामगार वृत्तपत्राचे संपादक व समाजक्रांतीकारक नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र १९९५ साली प्रकाशित केल्यानंतर जाणीवपूर्वक दुर्लक्षित करण्यात आलेल्या आद्य कामगार चळवळीचा क्रांतिकारी इतिहास जिवंत झाला.

कामगार क्षेत्रात काम करणारे पदाधिकारी, कार्यकर्ते व अभ्यासक यांना नारायण मेघाजी लोखंडे यांचा चरित्रग्रंथ वाचल्याशिवाय व अभ्यासल्याशिवाय कामगार चळवळीत काम करणे अशक्यप्रायच आहे. त्यामुळे या चरित्र ग्रंथाच्या दोन्ही आवृत्त्या २४ वर्षांपूर्वी संपल्यानंतर व चरित्रकार मनोहर कदम यांचे सन २००० मध्ये निधन झाल्यानंतर या चरित्र ग्रंथाची प्रचंड मागणी लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन तिसऱ्या आवृत्तीच्या स्वरूपात केले आहे. नुकतेच या ग्रंथाचे लोकार्पण स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. जे. एस. पाटील यांच्या हस्ते दि. १० जानेवारी रोजी औरंगाबाद येथे करण्यात आले.

प्रचंड मागणी असलेल्या या चरित्र ग्रंथाची किंमत २५० रुपये असून स्वतंत्र मजदूर युनियनशी संलग्नित संघटना तसेच मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन व मागासवर्गीय वरिष्ठ अभियंता व अधिकारी संघटनेच्या सभासदांसाठी २०% सवलतीसह हा ग्रंथ २०० रुपयांमध्ये उपलब्ध आहे. तिसरी आवृत्ती देखील लवकर संपण्याची शक्यता लक्षात घेता संलग्न संघटना व या संघटनांचे सभासद यांनी या ग्रंथाची लवकरात लवकर मागणी करावी.

या पुस्तकाचा इंग्रजी आणि हिंदी अनुवाद असलेल्या आवृत्त्याही येत्या सहा महिन्यांत प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहेत.

**ग्रंथ मिळण्याचे ठिकाण:**

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे केंद्रिय कार्यालय : ३१४, निलकमल काम्प्लेक्स, महाजन मार्केट, सिताबर्डी, नागपूर - ४४० ०१२

संपर्क: सुधीर माने- ९९२२९०९२८९ | बी. एन. गोंडोळे- ९९२३२३९८८९


गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार
वितरण सोहळा
गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
२०१५
कामगार भूषण पुरस्कार,
गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार,
पुरस्कारार्थींचा परिचय



# श्री. महेश यशवंतराव सेवलीकर

**(मल्टी स्किल ऑपरेटर)**

**बजाज ऑटो लि., वाळूज, औरंगाबाद**

सन १९८६ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. 'गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार १९९७' चे मानकरी आहेत. 'पंतप्रधान श्रम श्री पुरस्कार २००४' ने सन्मानित आहेत. टी.पी.एम., कायझेन, एन.सी.क्यू.सी.२००७ ते २०१३ या कार्यप्रणालीतील उत्कृष्ट काम केल्याचे प्रमाणपत्र मिळाले आहे. औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावर 'गुणवत्ता वाढीसाठी मी काय केलं?' या विषयावर मुलाखत प्रसारित झाली आहे. मराठवाडा गुणवंत कामगार विकास संस्थेच्या 'औद्योगिक सुरक्षा कार्यशाळा २००८' मध्ये सहभाग होता.

औरंगाबाद जिल्हा राजर्षी शाहू महाराज समितीचा 'राजर्षी शाहू कामगार पुरस्कार १९९९' प्राप्त झाला आहे. सेवेची २५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल कंपनीने रौप्यमहोत्सवी प्रशस्तीपत्र दिले आहे. वृक्षारोपण कार्यक्रम, एड्स जनजागरण, अंधश्रद्धा निर्मूलन, समता रॅली, योग प्रशिक्षण, रक्तदान, देहदान, नेत्रदान, व्यसनमुक्ती आदी कार्यक्रमांत सहभागी झाले आहेत. 'गुणवंत कामगार बंधुंसाठी संवाद', 'इंद्रधनुष्य', 'श्रमिक क्रांती' व 'आरोग्य धन' आदी अंकांचे प्रकाशन केले आहे. कामगार साहित्य संमेलन आदी साहित्य संमेलनात सहभागी झाले आहेत.

२०१९



## श्री. अनंत वसंतराव वाकुरे

**(वरिष्ठ प्रचालक - विशेष श्रेणी ||)**
**आर.सी.एफ., थळ, तालुका अलिबाग, जिल्हा-रायगड**

सन १९८६ पासून ट्रेनी म्हणून रुजू झाले. उत्तम कामामुळे आतापर्यंत ५ बढत्या झाल्या आहेत. कंपनीच्या संयंत्र सुरक्षा समितीवर तसेच सर्वोच्च सुरक्षा समितीवर क्रियाशील सदस्य म्हणून कार्यरत आहेत. उत्पादन वाढीसाठी व संयंत्र समस्या सोडविणाऱ्या 'क्षितिज' गुणवत्ता मंडळाचे संस्थापक सदस्य म्हणून कार्यरत आहेत. निसर्ग मित्र मंडळ, अलिबाग या संस्थेच्या माध्यमातून कासव संवर्धन, प्लास्टिक निर्मूलन, वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृतीचे कार्य करतात. सर्पमित्र, रक्तदाता म्हणून सर्वत्र सुपरिचित आहेत. मोफत कायदेविषयक सल्ला देण्याचे काम करतात. सह्याद्री पतसंस्थेचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. देशव्यापी श्रमशक्ती पाक्षिकाच्यावतीने 'कामगार रत्न पुरस्काराने' सन्मानित.



## श्री. राजेश वसंत मेस्त्री

**(वरिष्ठ प्रचालक - विशेष श्रेणी ||)**
**आर.सी.एफ., चेंबूर, मुंबई**

सन १९९६ पासून कार्यरत. आरसीएफ कंपनीच्या 'सर्वोत्कृष्ट कर्मचारी २०१६' चे मानकरी. कंपनीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून केलेल्या कामामुळे 'कायझेन वीर' पुरस्कार प्राप्त केला आहे. राष्ट्रीय सुझाव स्मृतिचिन्ह २०१६ ने गौरवांकित आहेत. सिटीझन रिपोर्टरच्या माध्यमातून सामाजिक व नागरी समस्या सोडविल्याबद्दल दैनिक महाराष्ट्र टाइम्सकडून प्रशंसापत्र प्राप्त झाले आहे. आरसीएफच्या 'सुरक्षा घोषवाक्य' व 'सुरक्षा काव्य' पुरस्काराने गौरव झाला आहे. क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया निबंध स्पर्धेचे विजेते आहेत. स्वच्छता अभियान मोहीम राबवितात. आरसीएफतर्फे क्यूसी आंतरराष्ट्रीय अधिवेशन, तैवान येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली होती. स्थानीय लोकाधिकार समिती, यूथ कौन्सिल, पंचरत्न मित्र मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज कल्याण मंडळ या संस्थांच्या माध्यमातून आदिवासी पाड्यातून विविध सामाजिक कामे तसेच वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, नेत्र चिकित्सा शिबिर, शैक्षणिक वस्तू वाटप, निराधार महिलांसाठी मदतीचे कार्यक्रम इ. कार्यक्रम राबवितात. सांस्कृतिक, क्रीडाविषयक व संघटनात्मक कार्यात सहभाग.



## श्री. सुखदेव नामदेव सूर्यवंशी

**(मल्टीस्किल ऑपरेटर ग्रुप लीडर)**
**बजाज ऑटो लि., वाळूज, औरंगाबाद**

सन १९८९ पासून कंपनीत कार्यरत आहेत. झीरो डिफेक्ट, झीरो ब्रेकडाऊन व झीरो ॲक्सिडेंट या कामाच्या पद्धतीमुळे औद्योगिक सुरक्षा पुरस्काराने सन्मानित. कामाच्या ठिकाणी कायझेन, टी.पी.एम., क्वालिटी सर्कल तंत्राचा वापर करतात. रक्तदाते म्हणूनही विभागात परिचित. पती-पत्नी दोघेही नेत्रदान व देहदान इच्छापत्र नोंदणीदार आहेत. सामाजिक समस्यांबाबत वृत्तपत्रांतून नियमित लिखाण करतात. आदर्श मित्र मंडळ, सांगली जिल्हा सांस्कृतिक मंडळ, ब्रह्मास्त्र गणेश मंडळ आणि कामगार संघटना आदी सामाजिक संस्थाच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमांत सहभाग. २५ वर्ष सेवा केल्याबद्दल बजाज ऑटो लि. च्या विशेष पुरस्काराचे मानकरी.



## श्री. विकास शिवाजी कोरे

**(मशिनिस्ट ग्राईंडर)**
**किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. खडकी पुणे**

सन १९९६ पासून कंपनीत कार्यरत आहेत. किर्लोस्कर फाऊंडेशनच्या स्वच्छता अभियान 'वॉश' च्या माध्यमातून कामे केली आहेत. विविध शाळा व परिसरातील संस्थांमध्ये जनजागृती. सेफ्टी कमिटी सदस्य, इंडस्ट्रीयल रिलेशन कमिटी सदस्य, तक्रार कमिटी सदस्य आणि संघटना सदस्य म्हणून कंपनीत कार्यरत आहेत. फाईव्ह एस प्रणाली, क्वालिटी सर्कल, कायझेन प्रणाली सारख्या माध्यमातून कंपनीच्या सुरक्षा व उत्पादन प्रक्रियेत सतत सुधारणा करीत असतात. राष्ट्रीय इंजिनिअरिंग श्रमिक संघाचे सदस्य आहेत. कंपनीच्या क्रीडा स्पर्धेतील ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल, क्रिकेट स्पर्धेतील विजेते. निराधार बालसंगोपन अनाथ आश्रम, राष्ट्रप्रेमी युवक मंडळ, संस्कार प्रतिष्ठान, टाटा मोटर्स समाज केंद्र, सांगली जिल्हा मित्र मंडळ, आनंद पार्क मित्र मंडळ अशा सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून नदी स्वच्छता अभियान, स्वाईन फ्लू जनजागरण, आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान, वृक्षारोपण तसेच विविध जनजागृती कार्यक्रम यात हिरीरीने सहभाग घेत असतात. कंपनीच्या गुणवत्ता पुरस्काराचे मानकरी.



## श्री. जितेंद्र मधुकर कुलकर्णी

**(मल्टीस्किल ऑपरेटर)**
**बजाज ऑटो लि., वाळूज, औरंगाबाद**

सन १९९२ पासून कंपनीत रुजू. कामासंदर्भातील, कमिमेंट टूवर्डस वर्ड क्लास मॅन्युफॅक्चरींग सर्टीफिकेट, टोटल प्रॉडक्टिव्हिटी मेंटेन सर्टीफिकेट आदी प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत. झीरो डिफेक्ट, झीरो ब्रेकडाऊन व झीरो ॲक्सिडेंट कार्यप्रणाली, कामात सतत सुधारणा इ. चा वापर करतात. कामाच्या ठिकाणी कायझेन, टी.पी.एम., क्वालिटी सर्कल तंत्राचा वापर करतात. पती-पत्नी दोघांनीही नेत्रदान व देहदान इच्छापत्र नोंदणी केली आहे. योग प्रशिक्षक म्हणूनही परिचित आहेत. भारत स्वाभिमान न्यास, सह्याद्री सहकारी ग्राहक संस्था, देवगिरी सहकारी ग्राहक संस्था, भगवान बाबा बालिकाश्रम, आदर्श मित्र मंडळ आणि कामगार संघटना आदी सामाजिक संस्थाच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण इ. सामाजिक कामे करतात. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांमध्ये सहभाग असतो.



## श्री. अर्जुन गणपती पवार

**(लिपिक लेखा विभाग)**
**क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड सहकारी साखर कारखाना लि., कुंडल, सांगली**

सन १९९७ पासून कंपनीत कार्यरत. वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत स्वच्छ व सुंदर पद्धतीने लिहिण्यात वाकबगार असल्याचा लेखापरीक्षकांचा शेरा प्राप्त झाला आहे. कारखान्याच्या उच्चांकी शेअर्स विक्रीच्या कामात बहुमोल सहयोग दिला आहे. वनसंवर्धन, पर्यावरण, कुटुंब कल्याण आदी सामाजिक समस्यांविषयी जनजागृतीचे काम करतात. इंधन बचतीचा संदेश म्हणून स्वतः सायकल वापरून प्रदूषणमुक्तीचा संदेश देत असतात. त्यांनी स्वतः दोन अपत्यांनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली आहे. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे सातत्याने आयोजन करतात. सहकार क्षेत्राचा अभ्यास असल्याने शेती पदवीधर कृषी उद्योग, कुंडल विणकर उत्पादक, नवजीवन यंत्रमाग विणकर सोसायटी, डॉ.पतंगराव कदम शेतकरी खरेदी-विक्री संघ, क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड सहकारी साखर कारखाना सेवकांची पतसंस्था, श्री बसवेश्वर सहकारी पाणी पुरवठा संस्था, क्रांती मिल्क प्रोसेसिंग को-ऑपरेटिंव्ह संघ, क्रांतिसिंह नाना पाटील सहकारी शेतमाल प्रक्रिया व शीतगृह संस्था, कुंडल ग्रेप ग्रोवर्स को-ऑप सोसायटी आदी विविध सहकारी संस्थेच्या स्थापनेपासून कार्यरत आहेत. निर्मल ग्राम स्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती, पोलिओ लसीकरण, रक्तदान शिबिर, आदी उपक्रमांमध्ये भाग घेतात.



२०१५



## श्री. श्रीकृष्ण शालीग्राम अरखराव

**(तंत्रज्ञ)**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. मर्यादित एकलहरे, नाशिक**

सन १९९४ पासून सेवेत कार्यरत. कंपनीचा सन २०१४ चा 'सुरक्षा नायक' पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, सक्रिय सुरक्षितता सदस्य, कंत्राटी कामगारांना प्रशिक्षण, काव्य स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा आदीमध्ये पुरस्कार प्राप्त झाला आहे. कंपनी अंतर्गत अनेक प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहेत. सन २००३ मध्ये आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन केले आहे. दारुबंदी, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, बालवाचक मेळावा, स्वयंरोजगार मार्गदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, काव्य स्पर्धा, ग्राम स्वच्छता अभियान, इ. कार्यक्रम राबवितात. सांस्कृतिक, क्रीडाविषयक व संघटनात्मक कार्यात सहभाग. विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थांचे कार्यकर्ते. सामाजिक कार्यक्रमानिमित्त श्रीलंका, थायलंड येथे दौरा केला आहे. स्वत:ची जमीन सार्वजनिक पाणीपुरवठ्याकरिता दान केली आहे. स्वत: विपश्यनेचे प्रशिक्षण घेतले असून विपश्यना शिबिराचे सातत्याने आयोजन करत असतात.



## सौ. राजलक्ष्मी संजय सुर्वे

**(वरिष्ठ लिपिक)**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, रत्नागिरी विभाग.**

सन १९९२ पासून महामंडळात कार्यरत आहेत. वाणिज्य पदवीधर असून कायदा, व्यवस्थापन, आदी पदव्या प्राप्त आहेत. सन २००९ चा परिवहन भूषण पुरस्कार प्राप्त झाला आहे. नाट्य महोत्सव, एकांकिका स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग. नाट्य लेखन व परीक्षक म्हणून कामकाज केले आहे. त्यांनी लिहिलेल्या अनेक कथा आकाशवाणीवरून प्रसारित झाल्या आहेत. कामगार संघटनांमध्ये कामगारांचे प्रश्न सोडविणे, कामगार चळवळ यामध्ये उत्साहाने सहभाग. महिला लैंगिक छळ अत्याचार तक्रार समिती सदस्य म्हणून काम केले आहे. कंपनी अंतर्गत विविध कार्यक्रमांचे संयोजन व सूत्रसंचालन करतात. नेत्रदान, देहदान जनजागृती, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग असतो.



## सौ. अलका राजेंद्र कर्णिक

**(भांडारपाल)**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चिखलढाणा, औरंगाबाद.**

सन १९९१ पासून महामंडळाच्या सेवेत कार्यरत आहेत. व्यसनाधीनता आणि त्याचा चालक-वाहकांवर होणारा विपरीत परिणाम यावरील उपचारांकरिता उपयुक्त आरोग्यदीप पुस्तक, आरोग्यदीप आरोग्यदर्शिका, महिलांकरिता रजोनिवृत्ती व आहार नियोजन आदी आरोग्यविषयक पुस्तकांचे लेखन, निर्मिती व प्रकाशन केले आहे. निसर्गोपचार वैद्यकीय पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असून कोलंबो विश्वविद्यालयातून आहार विषयावर संशोधन सुरू आहे. आहारतज्ज्ञ समुपदेशक म्हणून १५ वर्षांपासून कार्यरत. निरामय डायट कौन्सेलिंग, हेल्थकेअर फाऊंडेशन व कॅन्सर काउन्सिलिंग सेंटर या संस्थांची स्थापना केली आहे. आरोग्यविषयक विविध कार्यशाळांचे आयोजन दूरदर्शन व आकाशवाणीवरील आरोग्यविषयक ५० हून अधिक कार्यक्रमात सहभाग. संपूर्ण महाराष्ट्रात ८०० हून अधिक कार्यक्रमांचे सादरीकरण. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षापूर्व ताणतणाव तपासणी करून उपाययोजना सुचविणारा शोधनिबंध तसेच कष्टकरी महिलांचे हिमोग्लोबिन वाढविणारे किचन कॅलेंडर प्रसिद्ध झाले आहेत. लोकमान्य रक्तपेढीचा 'उत्कृष्ट सेवा पुरस्कार', लायन्स क्लब औरंगाबाद 'बेस्ट सेक्रेटरी पुरस्कार', सिपना इंजिनियरिंग कॉलेज अमरावती 'उमंग २००७' गौरव पुरस्कार, डायनॅमिक सायन्स अकादमी अमरावती 'सेवा गौरव पुरस्कार २००७', 'लोकमत सखी गौरव २०१५' आदी पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



### श्री. भरत सर्जेराव दराडे

**(मशीन ऑपरेटर)**
**गुडइयर साउथ एशिया टायर्स प्रा.लि.औरंगाबाद**

सन १९९६ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. कला पदवीधर असून कायदा, व्यवस्थापन, आदी पदव्या प्राप्त केल्या आहेत. रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, अन्नदान, दिंडी, पालखी, स्वच्छता अभियान, आदी सामाजिक कार्यात सहभागी होतात. स्वाध्याय परिवाराच्या माध्यमातून समाजसेवेचे काम करतात. कंपनीद्वारे सुरक्षा प्रश्न मंजुषा पुरस्कार, विना अपघात दोनशे दिवस आदी पुरस्कार प्राप्त झाले आहेत, सुरक्षेविषयी कामगारांना मार्गदर्शन. कामगार संघटनेमार्फत कामगार चळवळीत सक्रिय सहभाग. भ्रष्टाचार विरोधी मंच, श्वास सेवाभावी संस्था, कर्मचारी पतसंस्था, साईबाबा मंदिर संस्थान ट्रस्ट आदी संस्थांमार्फत सामाजिक कार्यात सहभाग असतो.



### श्री. दिलीप गणपत आसबे

**(ऑपरेटर)**
**औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लि. चितेगाव, औरंगाबाद.**

सन २००४ पासून कंपनीत कार्यरत. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, वृक्षदिंडी, रक्तदान, गुणवंत विद्यार्थी सत्कार, कर्णपुरा यात्रा सेवा, वृद्धाश्रम सेवा, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, आंतरजातीय विवाहित जोडप्यांचा सत्कार, ग्रंथप्रदर्शन, विमेन्स सेफ्टी, सायकल रॅली, आदी सामाजिक कार्यात सहभाग असतो. याकरिता अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त झाला आहे. कंपनीच्या उत्पादन वाढीकरिता व गुणवत्ता टिकविण्याकरिता TPM प्रणालीत काम करून कुशलता सिद्ध केली आहे. कंपनीद्वारे बेस्ट ऑपरेटर पुरस्कार, सेफ्टी सजेशन पुरस्कार, सुरक्षा घोषवाक्य पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



### श्री. रविंद्र बाळकृष्ण कुलकर्णी

**(जॉब इन्स्पेक्टर)**
**जी.के.एन. सिंटर मेटल्स प्रा.लि., पिंपरी, पुणे.**

सन १९७७ पासून कंपनीत कार्यरत आहेत. महिंद्रा सिंटर कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगार व व्यवस्थापन यांच्यामध्ये समन्वय साधला आहे. पर्वती बचाव आंदोलनात सहभागी झाले आहेत. पर्वती हरित क्रांती समितीच्या माध्यमातून वृक्षारोपण केले आहे. आंध्रप्रदेश पूरग्रस्तांना, भूकंपग्रस्तांना मदत मिळवून दिली आहे. पर्वती नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक आहेत. स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, स्वयंरोजगार शिबिर, वृद्धाश्रमास फळवाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार, शैक्षणिक साहित्य वाटप, स्वामी विवेकानंद भारत परिक्रमेस सहाय्य, आदी सामाजिक कार्यात सहभाग असतो. नंदादीप एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना साहाय्य मिळवून दिले आहे. पर्वती क्रीडा संघटनेची स्थापना करून मोटार सायकल साहसी स्पर्धा, कराटे शिबिर, शरीर सौष्ठव स्पर्धा, चालत पर्वती चढाई आदी स्पर्धा आयोजित करतात.





### श्री. प्रभाकर गंगाराम लहाने

**(कनिष्ठ यंत्र चालक)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या. (महावितरण), रिसोड, वाशीम.**

सन २००५ पासून कंपनीत कार्यरत. विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन वाशिम विभागीय सचिव पदी कार्यरत आहेत. वीज सेवकांना कनिष्ठ तंत्रज्ञ या पदावर कायम करण्याकरिता संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले व यश मिळवून दिले. सर्व सामन्यांकरिता पाणपोई, अपंग व अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण, रक्तदान, नेत्रदान, स्वच्छता अभियान, आदी सामाजिक उपक्रम राबविले आहेत. वीज थकबाकी वसुली मोहिमेत चांगले काम केल्यामुळे कंपनीकडून प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. वाशिम जिल्हा गुणवंत तांत्रिक पुरस्काराने व राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित. वीज कामगार पतसंस्थेची स्थापना करून वीज कामगारांना कर्ज उपलब्ध करून दिले आहे. शंभूराजे स्वयंरोजगार सहकारी संस्थेच्या माध्यमातून तरुणांना रोजगार प्राप्ती. तांत्रिक अप्रेन्टीस असोसिएशनची स्थापना करून नवीन विद्युत साहाय्यक भरती केंद्रीय पद्धतीने करून त्यात शिकाऊ उमेदवारांना प्राधान्य देण्याचे कार्य केले आहे. तसेच त्यांनी मरणोत्तर नेत्रदानाची नोंदणी केली आहे.



### श्री. अंबादास एकनाथराव देवराये

**(बॉयलर अटेंडर)**
**वोखार्ड लिमिटेड, चिखलठाणा, औरंगाबाद.**

सन १९९५ पासून कंपनीत कार्यरत आहेत. कंपनीचा १५ वर्षे सेवेचा सर्व्हिस पुरस्कार प्राप्त झाला आहे. युनिसेफच्या बाल कामगार बचाव व डोनेशन कार्यक्रमास योगदान दिल्याबद्दल भारतीय क्रिकेटपटू राहुल द्रविड यांनी गौरविले आहे. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, गरजू रुग्णांना मदत करणे, रक्तदान करणे, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, बचतगट प्रशिक्षण, पाणी बचत, वीज दुर्घटना टाळणे, कामगार व कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक समस्या सोडविणे, आदी सामाजिक कार्य. महाराष्ट्र प्रांतिक तेली समाज महासंघाच्या माध्यमातून समाजबांधवांची अद्ययावत माहिती तयार करण्यात पुढाकार. तिळवण तेली समाजाच्या माध्यमातून विद्यार्थी-पालक करिअर मार्गदर्शन शिबिर, विद्यार्थी गुणगौरव, वधू-वर परिचय मेळावा, ग्रंथदिंडी, धार्मिक उत्सव, आदीचे आयोजन केले आहे. अखिल भारतीय मराठा साहित्य संमेलनास योगदान.



### श्री. बाळासाहेब श्यामराव डेरे

**(इलेक्ट्रिशियन)**
**फेरेरो इंडिया प्रा.लि., बारामती, पुणे.**

सन २००८ पासून कार्यरत. श्रमिक एकता महासंघाची स्थापना करून कामगारांचे विशेषतः महिला कामगारांचे प्रश्न सोडविले आहेत. इमसोफर मॅन्युफॅक्चरींग एम्प्लॉईज युनियनच्या माध्यमातून कामगारांना सानुग्रह अनुदान, बढती, मेडिक्लेम, बस सुविधा, कॅन्टीन सुविधा आदी लाभ मिळवून दिले आहेत. महिला कामगारांना कामावर येण्याकरिता बस उपलब्ध करून देणे, महिला लैंगिक अत्याचार सुरक्षा समितीची स्थापना करून त्यांची सुरक्षा जपणे, महिला सबलीकरण, महिला विषयक कायदे व अधिकार यांची जाणीव करून देणे, 'किंडर गार्डन'च्या रूपाने कंपनीमध्ये पाळणाघर सुरू करणे, फेरेरो प्रीमिअर लीगचे आयोजन, मलेशिया येथील इंटरनॅशनल युनियन फूड फेडरेशन आयोजित सेमिनारमध्ये कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा करण्याकरिता सहभाग, कंपनीतील कामगारांचे तसेच इतरांचे विवाह जमवून देणे, वृक्षारोपण, रक्तदान, नेत्रदान, स्वच्छता अभियान, आदी सामाजिक उपक्रम राबविले आहेत. मयुरेश्वर मंडळाची स्थापना करून विविध धार्मिक उत्सव साजरे करतात.



## श्री. विनायक दत्तात्रय पाठारे

**(प्रॉडक्शन एक्झिक्युटीव्ह) ओरिएंट ब्लॅकस्वान प्रा. लि., फोर्ट, मुंबई.**

सन २००० पासून कंपनीत कार्यरत. कंपनीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी व आर्थिक प्रगतीसाठी काम केले आहे. प्रिंटींगच्या नवनवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास करून उत्पादन खर्च कमी केला आहे. संबंधित सहकाऱ्यांना त्यांच्या कामात मदत करून सांघिक भावना जोपासतात. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, गुणवंत विद्यार्थी गुणगौरव, मोफत आरोग्य शिबिर, विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करतात. हरी ॐ मित्र मंडळाचे १९८६ पासून सचिव व पाठारे क्षत्रिय पतसंस्थेचे सदस्य, क्षात्रैक्य समाज आदी सामाजिक संस्थाच्या विविध पदांवर कार्य केले आहे. मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनचे मानद सचिव म्हणून काम केले आहे. कॅरम असोसिएशनच्या माध्यमातून जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन केले आहे.



## श्री. दत्ताराम विठ्ठल जाधव

**(वरिष्ठ कक्ष सहकारी) दि लीला हॉटेल, अंधेरी, मुंबई**

सन १९९२ च्या नेमणुकीपासून कार्यरत आहेत. हॉटेल व्यवस्थापनाकडून सर्वोत्कृष्ट कर्मचारी, प्रामाणिक कर्मचारी, उत्कृष्ट कामगार पुरस्कार प्राप्त झाला आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत हाउसकीपिंग विभागातील बेस्ट रूम अटेंडन्ट पुरस्काराने सन्मानित. अतिथी टिप्पणी कार्डच्या माध्यमातून नऊ वेळा स्वच्छ व उत्तम सेवेबद्दल प्रमाणपत्र मिळाले आहे. मानांकन कार्य प्रक्रियेनुसार अतिथी खोल्यांसाठी लागणारा खर्च कायम राखून उत्तम आर्थिक नियोजनाचा आदर्श घालून दिला आहे. हॉटेलमध्ये येणाऱ्या परदेशी व स्वदेशी पाहुण्यांना उत्तम सेवा देऊन हॉटेलचा लौकीक वाढविला आहे. मुंबईच्या महापौरांकडून सर्वोत्कृष्ट कामगार पुरस्कार मिळाला आहे. गरीब व आदिवासी मुलांना शैक्षणिक साहित्य, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या वारसांना आर्थिक मदत, वृद्धाश्रमांना आर्थिक मदत आदी कार्य केले आहे.



## श्री. रविंद्र जयराम चौधरी

**(वाहक)**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धुळे आगार, धुळे.**

सन १९९८ पासून महामंडळाच्या सेवेत कार्यरत आहेत. वाहक पदावर काम करून जनसेवा अंतर्गत अंध-अपंग व महिला प्रवाशांची विशेष सेवा केली आहे. उत्कृष्ट काम करून महामंडळाचे उत्पन्न वाढविल्यामुळे तीन वेळा सन्मान झाला आहे. राज्यस्तरीय आदर्श कामगार पुरस्कार, समाज गौरव पुरस्कार, कामगार रत्न पुरस्कार, राष्ट्र चेतना पुरस्कार, अखिल भारतीय प्रतिभा सन्मान पुरस्कार, भारतज्योती एक्सलंस ॲवॉर्ड आदी पुरस्कार प्राप्त झाले असून राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप मिळाली आहे. राष्ट्रीय एस.टी.कामगार काँग्रेस(इंटक) साक्रीचे अध्यक्ष व धुळे जिल्ह्याचे उपाध्यक्ष, एस.टी.कामगार संघटना धुळेचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मोटार कामगार संघ साक्रीचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. तेली समाजाच्या विविध मंडळांवर विविध पदांवर कार्यरत असून समाजासाठी काम करीत आहेत. ॲम्बिशिअस कम्प्युटर्स इन्स्टिट्युटच्या माध्यमातून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण देत आहेत. नेत्र तपासणी शिबिर, मोतीबिंदू निदान शिबिर, स्वच्छता अभियान, रक्तदान, वृक्षारोपण, वधूवर परिचय मेळावा, कुष्ठरुग्णांना मदत आदी समाजोपयोगी कार्य केले आहे.





### श्री. बाळासाहेब हिंदुराव कांबळे

**(चालक)**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, संभाजीनगर आगार, कोल्हापूर.**

सन २००० च्या नेमणुकीपासून महामंडळाच्या सेवेत आहेत. एस.टी. प्रवाशांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वर्तमानपत्रे, सुट्टे पैसे, मोबाईल चार्जिंग, इत्यादी सेवा देण्याचा प्रयत्न करतात. एस.टी.मध्ये प्रवाशांच्या राहिलेल्या वस्तू योग्य रीतीने परत केल्यामुळे प्रशासनाने सत्कार केलेला आहे. ''आदर्श चालक बना, अपघात टाळा'' या पुस्तकाचे लेखन करून हजारो प्रती मोफत वाटल्या आहेत. जनकल्याण सामाजिक सेवा संस्थेचे संचालक सदस्य आहेत. या संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण, व्यसनमुक्ती, कृषी, सांस्कृतिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रासह महिला, अपंग, कुष्टरोगी, कामगार, लहान बालके, पशु-पक्षी यांच्यासाठी उपक्रम राबविले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरण साहित्य संमेलन, छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय एकात्मता साहित्य संमेलन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन, व्यसनमुक्ती व पर्यावरण साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. पक्षांकरिता घरटी बांधणे, वृक्षारोपण व संवर्धन, एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली आदीचे आयोजन करतात. जनकल्याण आणि विविध बारा संस्थांच्या पुरस्काराचे मानकरी आहेत.



### श्री. केदारी तिप्पाण्णा अकिवाड

**(फिटर)**

**किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्कर वाडी, ता.पलूस, जिल्हा सांगली.**

सन २००६ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. कामाच्या ठिकाणी कायझन, ५-एस.प्रणाली, एस.आर.एम. आदींचा वापर करून उत्पादन वाढीसाठी, उत्पादन दर्जा वाढीसाठी, गुणवत्ता व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता याकरिता प्रयत्न करतात. याव्यतिरिक्त सामाजिक काम करताना नैसर्गिक आपत्तीत मदत करणे, रक्तदान करणे, एड्स-कॅन्सर रोगांबाबत जनजागृती करणे इत्यादी कामे करतात. २००५-०६ मध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा नदीला आलेल्या महापुरामध्ये मदत व पुनर्वसन कार्यातील योगदानाबद्दल तत्कालीन पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव झाला आहे. झाडे लावा, झाडे जगवा, लेक वाचवा यासाठी वृत्तपत्र लिखाण केले आहे. कबड्डी स्पर्धेत अनेक बक्षिसे पटकावली आहेत. तसेच खो-खो व ॲथलेटीक्स स्पर्धेत सहभाग घेतात. कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांसाठी सेवाभावी कार्यक्रमात सहभाग. श्री हनुमान वाचनालय, वेलणकर अनाथ बालकाश्रम, भारतीय समाज सेवा केंद्र, गुरुमाउली महिला गृहउद्योग, रणसंग्राम सोशल फाउंडेशन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय संस्था आदी संस्थांच्या माध्यमातून समाजोपयोगी कामे केली आहेत.



### श्री. गुणवंत हनुमंतराव मिसलवाड

**यांत्रिकी साहाय्यक कारागीर**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड आगार, नांदेड**

सन १९८९ पासून एस.टी.च्या सेवेत कार्यरत आहेत. एस.टी. नांदेड आगारात झालेल्या कामगार कार्यशाळेत सक्रिय सहभाग. एस.टी.कामगार सेनेचे डेपो उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. नांदेड जिल्हा आदिवासी विकास मंच या संस्थेत उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. आदिवासी महादेव कोळी समाजाच्या विविध आंदोलनात सक्रिय सहभाग असतो. आदिवासी कोळी विकास परिषद या संस्थेत नांदेड शहर अध्यक्ष म्हणून काम केले आहे. महात्मा बसवेश्वर जयंती, अण्णाभाऊ साठे जयंती आदी राष्ट्रपुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम आयोजनात सहभाग असतो. महर्षी वाल्मिकी सेवाभावी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात सहभाग असतो.



### श्री. लिलेश्वर माणिकराव बन्सोड

**ज्युनियर ऑपरेटर**
**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि. ठाणे.**

सन १९९४ पासून कनिष्ठ यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. कंपनीच्या उपकरणांची वेळोवेळी देखभाल करून, सुरक्षेबाबत जन-मित्रांमध्ये व वीजग्राहकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती व मेळाव्याचे आयोजन करण्यात सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल वर्कर्स फेडरेशन या संघटनेचे राज्य संयुक्त सचिव म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. संघटनेच्या माध्यमातून कर्मचारी सभासदांकरिता प्रशिक्षण शिबिर, आरोग्य शिबिर, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक प्रशिक्षण यासाठी वेळोवेळी शिबिर घेऊन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले आहे. पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त महाराष्ट्रातील जनता तसेच उत्तराखंडातील अतिवृष्टीग्रस्त जनतेसाठी निधी जमविण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. विदर्भ संघाच्या माध्यमातून रक्तदान करणे, वधुवर मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम, विदर्भातील तंत्रज्ञ व उद्योजक यांना विदर्भ पुरस्कार, उद्योग पुरस्कार प्रदान करणे अशा विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यामध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेऊन विविध उपक्रम राबविले आहेत.



### श्री. बाळकृष्ण महादेव गोपाळे

**सी.एन.सी. ऑपरेटर**
**वनाझ इंजिनिअर्स लिमिटेड, कोथरुड, पुणे**

सन १९९६ पासून कंपनीत कार्यरत आहेत. कामात सुधारणा, उत्पादकता वाढ, आय.एस.ओ व टी. एस.१६९४९, ५ एस, व इतर जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. तसेच ५ एस प्रणालीचे कंपनी सचिव, वनाझ संघटनेचे उपाध्यक्ष आहेत. तांत्रिक प्रगती बरोबर इतर विविध क्षेत्रातील त्यांची विधायक कामगिरी देदीप्यमान व नेत्रदीपक स्वरूपाची आहे. 'कारखाना जगला तर कामगार जगेल' या उक्तीप्रमाणे कार्यशील तसेच कंपनीची भरभराट कशी होईल यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. अनेकदा रक्तदान केले आहे. कामगार संघटनेच्या माध्यमातून औषधोपचार योजना, रक्तदान शिबिर, क्रीडा महोत्सव, अंध व्यक्तींसाठी शिबिर, ई.सी.जी. शिबिर, मोफत चष्मे वाटप, परिसरातील विविध शाळांना शालेय देणगी, राज्यस्तरीय व्यावसायिक बॉडी शोचे आयोजन, मातोश्री वृद्धाश्रमाला देणगी. साहस पुणे या संस्थेच्या पदभ्रमण मोहिमांमधून निसर्ग संवर्धन, वृक्षारोपण तसेच खेड्यापाड्यातील व अतिदुर्गम भागातील लोकांना औषधवाटप असे उपक्रम राबविण्यात मोलाची मदत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये उत्स्फूर्त सहभाग. पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्काराने सन्मानित झाले आहेत.



### श्री. दादासाहेब जयवंत गावडे

**इलेक्ट्रीशियन**
**महिंद्रा सॅनियो स्पे.स्टील कं. लि.**
**ता. खालापूर जिल्हा रायगड**

सन १९८१ पासून कार्यरत. कंपनीच्या सुरक्षा विभागातर्फे आयोजित सुरक्षा विषयक विविध उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होऊन भरीव योगदान देत आहेत. औद्योगिक सुरक्षेविषयी सजग असून कारखान्यातल्या कामगारांना सुरक्षेसंदर्भात जागृत व प्रोत्साहित करण्यासाठी सुरक्षा विभागाला विविध उपक्रम राबविण्यासाठी आजतागायत प्रामाणिक बहुमोल सहकार्य केले आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा काव्य लेखनाचा नारायण सुर्वे प्रथम पुरस्कार, कादंबरी लेखनाचा द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांची साहित्यभूषण पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन साहित्याचा अभ्यासक असल्याचेही सिद्ध केले आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून शाळा, महाविद्यालये व सामाजिक संस्थांमध्ये व्याख्यानाच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीचा व साहित्यिक अभिरुची जाणीवा नेणीवांचा सातत्याने जागर करीत असतात. कुलस्वामिनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून २०१४ पासून 'गोंदण' नावाचा अंक सुरू केला आहे.





## श्री.संजय जीवन साळुंखे

**मेन्टेनन्स सुपरवायझर**
**लोकमान्य हॉस्पिटल, निगडी, पुणे**

सन १९९९ पासून कार्यरत असून त्यानंतर आतापर्यंत तीन वेळा पदोन्नती मिळालेल्या आहेत. त्यांनी आतापर्यत नवीन विभागात जाऊन स्वत: इलेक्ट्रीक कामे करून तसेच नवीन तंत्राचे एलईडी बल्ब बसवून विजेची व हॉस्पिटलच्या पैशांची बचत केली आहे. त्यांचा बेस्ट कामगार म्हणून गौरव झाला आहे. हॉस्पिटलची पूर्ण मेटेनन्सची जबाबदारी सांभाळतात. ८ ते ९ व्यक्तींना इलेक्ट्रीक शॉकमधून वाचविले आहे, तसेच एका व्यक्तीच्या घरी आग लागली असताना विझविण्याचे धाडसाचे काम केले आहे. हॉस्पिटल कामगार व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आहेत. कामगारांसाठी पगारवाढीचा करारनामा करण्यात व मेडिकल फॅसिलिटी फ्री करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. अन्नदान करणे, रक्तदान, आरोग्य शिबिर, गरजू विद्यार्थांना शालेय मदत, कामगार दिवस, महिलादिन सत्कार, परिचारिका दिवस, गणेशोत्सव, दत्तजयंती, कवी संमेलनात सहभाग, खेळाडूंना प्रोत्साहन, सहल काढणे इत्यादीमध्येभाग घेतात. हॉस्पिटलमध्ये न होणारे उपचार व ऑपरेशन यांच्यासाठी मदत देण्याचे कार्य करत असून मंडळाच्या विविध योजनांचा लाभ कामगार व कामगार कुटुंबीय विद्यार्थ्यांना मिळवून दिला आहे.



## श्री. प्रविण जगन्नाथ बहिरट

**(वरिष्ठ प्रचालक)**
**राष्ट्रीय केमिकल ॲण्ड फर्टीलायझर लि. चेंबूर, मुंबई.**

सन १९९१ पासून कंपनीच्या सेवेत कार्यरत आहेत. कंपनीच्या उत्पादन वाढीविषयक कार्यक्रमांमध्ये सतत सहभाग असतो. कायझन भूषण पुरस्काराचे मानकरी आहेत. सन २००९ मध्ये कंपनीच्या अमोनिया प्लांटमधील संभाव्य दुर्घटना टाळण्यात यश. त्यामुळे कंपनीच्या व्यवस्थापनाने विशेष पुरस्कार देऊन सन्मान केला होता. कंपनीच्या सजेशन स्कीमचा नेहमी उपयोग करतात. खताची गुणवत्ता टिकून राहावी म्हणून नीम कोटेड युरियाचे उत्पादन करण्याची सूचना केली व कंपनीने ती स्वीकारली होती. कंपनीच्या आर.सी.एफ. दर्पण या त्रैमासिकात सुरक्षा, पर्यावरण व स्वास्थ्य या विषयी लिखाण केले आहे. एल.ई.डी. बल्ब, सौरऊर्जा प्लांटवर चालविण्याची सूचना देखील कंपनीने स्वीकारली होती. कंपनीच्या गुणवत्ता विकास मंडळामध्ये कार्यरत, तसेच सडक सुरक्षा सप्ताहात सहभागी असतात. सन २०१५ च्या औद्योगिक क्षेत्रातील सर्वोच्च अशा 'श्रम श्री पंतप्रधान पुरस्कारासाठी' कंपनीतर्फे नामनिर्देशन केले आहे. सामाजिक संस्थांमध्ये सक्रीय असून रक्तदान शिबिर, कॅन्सर शिबिर, अनाथ मुलांसाठी शिबिर, भूकंपग्रस्तांसाठी मदत शिबिर, आदिवासी कल्याण उपक्रम, गरीब विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप अशा उपक्रमांमध्ये सहभाग असतो.



## श्री. दिनेश नामदेव जगताप

**(कार्यालय सहायक)**
**हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई.**

सन १९९९ पासून महामंडळाच्या सेवेत रुजू झाले. महामंडळाच्या औषध देयकाची थकबाकी किमान कालावधीत जमा करून दिल्याबद्दल कौतुक झाले आहे. उत्पादन वाढीच्या प्रयत्नात सक्रिय सहभाग असतो. हाफकिन सहकारी पतपेढीत उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले आहे. हाफकिन महामंडळात कर्माचाऱ्यांसाठीच्या योग वर्गात योगशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. केन्द्रीय श्रमिक शिक्षा बोर्ड यांच्या कामगार प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये संघटनेच्या वतीने सहभागी झाले आहेत. ग. द. आंबेकर प्रतिष्ठानच्या कामगार प्रशिक्षण शिबिरात सहभाग. महामंडळाच्यावतीने हाफकिनच्या मुखपत्राचे वितरक म्हणून काम करतात. अखिल भारतीय भटक्या व विमुक्त जाती संघ, मुंबई प्रदेश या संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. समाजातील बांधवांना जातीचा दाखला मिळवून देणे, वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत, नोकरीकरिता मार्गदर्शन इत्यादीसाठी कामे करतात. स्वत: व कुटुंबीयांनी अवयवदान याकरिता नोंदणी केलेली आहे. महामंडळातील कामगार मित्रांसाठी प्रेक्षणीय व धार्मिक स्थळी पर्यटन यात्रेचे आयोजन करतात. हाफकिन वसाहतीतील कर्मचारी व रहिवाशांकरिता क्रीडा स्पर्धेचे आयोजन, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग असतो.



## श्री. संदीप बाबू बारी

**(सिनिअर असिस्टन्ट)**
**महिंद्रा अॅण्ड महिंद्रा लि. कांदिवली, मुंबई.**

सन १९८९ पासून सेवेत रुजू झाले. क्वालिटी सर्कल, फायर फायटिंग, व महिंद्र राईज या कंपनीच्या कार्यक्रमात भाग घेतला आहे. कंपनीच्या कामगार संघटनेच्या खजिनदारपदी कार्यरत आहेत. कंपनीतील कामगारांना घेऊन २०१३ मध्ये दायित्व या संस्थेची स्थापना करून आदिवासी पाड्यातील मुलांसाठी शैक्षणिक मदत व क्रीडा साहित्याचे वाटप हे उपक्रम राबवितात. ESOP या संस्थेच्या माध्यमातून एका वर्षासाठी नन्ही कली दत्तक योजनेत सहभाग घेतला. परिवर्तन मुंबई मातृमंदिर देवरुख, श्री उथलेश्वर महादेव देवस्थान, ओम दिप्ती हौसिंग सोसायटी, कर्टेल ग्रामविकास मंडळ, आदी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विविध सामाजिक कामे केली आहेत. महिंद्राच्या कर्मचाऱ्यांसाठी नाट्य महोत्सवाच्या आयोजनात सहभागी असतात. औद्यागिक फायर ड्रिल व फायर फायटिंग स्पर्धेचे विजेते म्हणून बक्षीस प्राप्त केले आहे.



## श्री. धर्मेंद्र गुलाब कन्नाके

**(तंत्रज्ञ १)**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.(महानिर्मिती), औष्णिक केंद्र, चंद्रपूर.**

सन १९९२ पासून सेवेत रुजू झाले. महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समिती ऊर्जानगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सहकारी कर्मचारी पतसंस्था, आदिवासी विकास संस्था चंद्रपूर, अंधश्रद्धा निर्मूलन संस्था चंद्रपूर, अल्कोहोलिक अॅनॉनिमस संस्था चंद्रपूर आदी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सहभाग. गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व आर्थिक मदत. गरीब गरजू महिलांना रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, पर्यावरण जनजागृती शिबिर, वृक्षारोपण मोहीम, वृद्धाश्रम व अपंग विद्यालयास साहित्य वाटप, आदिवासी मुला-मुलींना रोजगार संधी व वधूवर मेळावे आयोजन, व्यसनमुक्ती कार्यक्रम अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन व कार्यक्रमात सहभागी होत असतात. फुले-आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने २०१५ चे सन्मानपत्र, आदिवासी परधान महासंघ यांचे प्रशस्तीपत्र तसेच आदिवासी विकास परिषदेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.



## श्री. निळकंठ हंजारी राठोड

**(मल्टी स्किल ऑपरेटर)**
**रुचा इंजिनिअर्स प्रा.लि., वाळूंज, औरंगाबाद.**

सन २००५ पासून कंपनीच्या सेवेत रुजू झाले. कंपनीत टीपीएम या प्रणाली, कायझन व इम्प्लीमेंटेड सजेशन आदी कार्यपद्धतीचा उपयोग करून उत्पादन व गुणवत्ता वाढीसाठी तसेच या प्रणालींचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. कंपनीत काम करताना झिरो ब्रेक डाऊन, झिरो ॲक्सिडेन्ट, झिरो डिफेक्ट उद्दिष्टे साध्य केली आहेत. कंपनीत नियमित होणाऱ्या सुरक्षा सप्ताहात सहभागी होऊन फायर फायटिंग व फर्स्ट एड ट्रेनिंग प्रशिक्षण पूर्ण केले आहे. कंपनीच्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग. सन २००७ पासून कंपनीतील कामगार संघटनेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्वालिटी सर्कल स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पारितोषिके मिळवली आहेत्त. कंपनीत कामगार दिन. स्वातंत्र्य दिन, नेत्र तपासणी शिबिर, आदी कार्यक्रमामध्ये पुढाकार घेतात.

२०१५



### श्री. सुनील सबाजी कुटे
**(फिटर)**
**महिंद्रासीआयईऑटोमोटिव्हलि., भोसरी, पुणे**

सन १९८९ पासून कंपनीच्या सेवेत रुजू झाले. कंपनीतील कामात नेहमी सुरक्षा प्रणालीचा वापर करतात. महिंद्र सीआयई ऑटोमोटिव्ह लि. सेवक सहकारी पतसंस्थेत कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कंपनीच्या कामात कायझेन प्रणालीचा अवलंब करून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करतात. सर्वात मोठा फेराइट वेल्डिंग रॉड तयार केल्यामुळे कंपनीने प्रशस्तिपत्र देऊन अभिनंदन केले आहे. कंपनीतील सेवेची २५ वर्षे पूर्ण केल्याचा पुरस्कार. ESOP या संस्थेच्या माध्यमातून मतदान जनजागृती, वृक्षारोपण, योगा प्रशिक्षण शिबिर, आदी सामाजिक कामे केली आहेत. गिर्यारोहणाची आवड आहे. पतंजली योग समितीच्यावतीने भारत स्वाभिमान यात्रेत सहभाग, उत्कर्ष मित्र मंडळ, धर्मवीर संभाजी राजे मंच, श्री साई मंदिर देवस्थान ट्रस्ट पुणे, शिवशंभो फाउंडेशन, शाहूनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, आदी संस्थांच्या मदतीने रक्तदान शिबिर, महिला बचत गट, पर्यावरण जनजागृती, क्रीडा स्पर्धा व शिबिरे, वृक्षारोपण, अनाथ व अपंग मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप आदी कार्यक्रमात सहभाग घेतला आहे. महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.



### श्री. आबासाहेब भास्कर गायकवाड
**(वाहक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, आटपाडी आगार, सांगली.**

सन २००० पासून कंपनीच्या सेवेत आहेत. सन २०१५ वार्षिक प्रवासी सवलत कार्डाची विक्रमी विक्री केली तसेच शालेय सहलीसाठी प्रासंगिक कराराच्या बस मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. इटली येथे २०१३ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भालाफेक व थाळीफेक स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविले आहे. ऑस्ट्रेलियामधील ॲडलेड येथे २०१५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत थाळीफेक, हथोडाफेक व गोळाफेक स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविले आहे. महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे सक्रिय सभासद आहेत. ॲथलीट म्हणून अनेक प्रशस्तिपत्रके मिळाली आहेत. रक्तदान शिबिरात सहभाग असतो. अनेक गौरवपत्राचे मानकरी आहेत.



### श्री. किशोरकुमार एकनाथ शिंदे
**(ऑपरेटर)**
**एस. के. एफ. इंडिया लि. चिंचवड. पुणे**

सन १९९० पासून कंपनीच्या सेवेत कार्यरत. कंपनीचे काम करताना तीन बढत्या मिळवल्या आहेत. क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पंच म्हणून काम केले असून पुणे मॅराथॉन या स्पर्धेच्या आयोजन समितीवर १९९० पासून कार्यरत आहेत. नवी दिल्ली येथे २०१० साली झालेल्या कॉमनवेल्थ गेम मध्ये नियोजन समितीमध्ये काम केले आहे. तसेच राज्य व जिल्हा आदी स्पर्धांच्या नियोजनात पुढाकार घेतात. कंपनीच्या रिक्रिएशन कमिटीचे सक्रिय सभासद आहेत व सर्व कल्याणकारी उपक्रमात सहभागी होत असतात. पिंपरी चिंचवड स्पोर्टस् क्लबचे सहसचिव म्हणून कार्यरत आहेत. नचिकेत बालग्राम, लायन्स क्लब देहू रोड, ज्येष्ठ नागरिक संघ काळेवाडी, कै.भाऊसाहेब तापकीर शिक्षण प्रसारक मंडळ आदी संस्थांच्या माध्यमातून अनाथ बालक मदत, क्रीडा स्पर्धा आयोजन, आरोग्य शिबिर अशी सामाजिक कामे केली आहेत. दैनिक लोकमतमध्ये क्रीडा विषयक लिखाण करतात.



### श्री. दत्तात्रय नामदेव येळवंडे

**(ग्रुप लीडर)**

**स्पॅको टेक्नॉलोजीस इं.प्रा. लि., चिंचवड, पुणे.**

सन १९८८ पासून कंपनीच्या सेवेत रुजू झाले. कंपनी सेवाकाळात उत्पादन वाढीबरोबरच गुणवत्ता, सुरक्षितता, पर्यावरण, व अन्य बाबींमध्ये सतत प्रयोगशील व प्रयत्नशील राहून परिणामकारक सुधारणा केल्या आहेत. शापूरजी पालनजी कंपनीमध्ये एका कंत्राटी कामगाराचे दोन्ही पाय काम करत असताना निकामी झाले होते त्याकरिता श्रमिक एकता महासंघाचे उपाध्यक्ष म्हणून आमरण उपोषणाच्या माध्यमातून सदर कंपनीकडून पंधरा लाखांची मदत संबंधितास मिळवून दिली व सदर कामगारावर उपचार केले. वृक्षारोपण, रक्तदान, दाभोळकर हत्या निषेध मोर्चा, वायूप्रदूषण रोखण्याकरिता बस डे उपक्रमात सहभाग, भ्रष्टाचार विरोधी कृती, आदी सामाजिक कार्य केले आहे. देहू जिल्हा परिषद शाळेतील मुलांकरिता संगणक टेबल व लाईटची व्यवस्था केली आहे. देहू-आळंदी येथून प्रस्थान होणाऱ्या पायी दिंडी यात्रेत वारकऱ्यांना अन्नदान देऊन त्यांची सेवा. मंडळाच्या राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबिरात सहभाग, फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन, आदी सांस्कृतिक कार्य केले आहे. स्पॅको एम्प्लॉइज युनियनचे सरचिटणीस, श्रमिक एकता महासंघाचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र कंत्राटी कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. व्हियेतनाम येथील इन्डस्ट्रीअल ग्लोबल युनियन आयोजित जागतिक परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.



### शेख अब्दुल सलीम अब्दुल रजाक

**(कारागीर 'क' काथीलागर)**

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नांदेड आगार, नांदेड.**

सन १९८८ पासून महामंडळाच्या सेवेत कार्यरत. नाट्यकलेची आवड असल्याने एस.टी.महामंडळाच्या नाट्यस्पर्धा, कामगार कल्याण मंडळाच्या नाट्य स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन पारितोषिके मिळविली आहेत. अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे कार्यकारिणी सदस्य म्हणून अनेक नवोदितांना संधी दिली. एस.टी.यांत्रिक संघटनेच्या कामगार कल्याण समितीच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले आहेत. नांदेड येथील गुरु-ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळ्यात सहभागी होऊन कँप व्यवस्थापन आणि भाविकांना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून दिली. अनेक एकांकिका स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून काम पहिले आहे. रक्तदान, मोतीबिंदू तपासणी शिबिर, स्वच्छता अभियान, परिसरातील कचरा जाळून होळी साजरी करणे, पंढरपूर यात्रेस जाणाऱ्या भाविकांचा सत्कार, महामंडळातर्फे प्रवासी मित्र म्हणून पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



### श्री. योगेश बाबुराव बर्वे

**लाईनमन (वरिष्ठ तंत्रज्ञ)**

**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नाशिक**

सन १९९९ पासून कंपनीत काम करीत असून सध्या वरिष्ठ तारमार्ग तंत्रज्ञ या पदावर कार्यरत आहेत. आपल्या कक्षांतर्गत व उपविभागांतर्गत कंपनीच्या कामात नवनवीन उपक्रम राबवतात. वीज चोरी रोखणे, शेती पंप वीज देयक १०० टक्के वसूल करणे, झोपडपट्टी धारकांना पथनाट्याद्वारे वीज जोडणी घेण्यास भाग पाडणे व वीज देयक भरण्यास प्रवृत्त करण्याचे महत्वपूर्ण काम करून प्रशासनाचा महसूल वाढविण्यास प्रयत्नशील असतात. त्याबाबत त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांना वार्षिक व शैक्षणिक खर्चाची मदत करणे, सर्वधर्मीय मोफत दफन विधी, प्लास्टिकचा वापर टाळा, अंधश्रद्धा निर्मूलन, गोदावरी स्वच्छता अभियान, निराधार व कुष्ठपीडित लोकांना पावसाळ्यात छत्री वाटप, गणपती मूर्ती दान संकल्पना, सामूहिक विवाह आयोजित, रक्तदान शिबिरे, गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, शाळा व महाविद्यालयात जाऊन वीज बचत, व पाणी बचत व व्यसनमुक्तीचे प्रबोधन आदी कार्यात सक्रिय सहभाग असतो.





## श्री. श्रीकांत आण्णासाहेब पाटील

**(क्लार्क-१)**
**मनुग्राफ इंडिया ली, कोडोली, कोल्हापूर**

सन १९९१ पासून कार्यरत आहेत. मनुग्राफ युनिट एम्प्लॉईज युनियन या संघटनेचे सभासद. संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या आर्थिक व सामाजिक अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी हिरीरीनेभाग घेतात. मनुग्राफ डे मधील व्यसनमुक्तीसाठी नाटिकेमध्ये सक्रिय सहभाग, लॉटरी असोसिएशन, रक्तदान शिबिर, गणेश उत्सव, आदि उपक्रमात सहभागी असतात. ग्रामपंचायत केखलेचे सदस्य म्हणून निवडून आले होते. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले व त्यांच्या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले गेले. त्यामध्ये लेक वाचवा अभियान, हागणदारी मुक्त गाव, वृक्षारोपण, नेत्र शिबिर, तंटामुक्त गाव, आरोग्य शिबिर, यामध्ये त्यांचे योगदान मोलाचे होते. त्यांनी राबविलेल्या योजना या शासनस्तरावर उल्लेखनीय म्हणून गौरविल्या आहेत. तसेच ग्रामपंचायतीच्या शिक्षण कमिटीचे चेअरमन म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. त्यांच्या कारकीर्दीमध्ये पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास आली. त्यांच्या संपूर्ण कामाची पोचपावती म्हणून त्यांना भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांचे हस्ते निर्मल ग्राम पुरस्कार प्रदान करण्यात आला.



## श्री. निलेश बाळाराम पाटील

**मल्टी स्किल्ड ऑपरेटर कम मेकॅनिक**
**टाटा स्टील सी.आर.सी, पालघर**

सन १९९२ कंपनीमध्ये कामगारांची सुरक्षा यासाठी सेफ्टी स्टुअर्ड तसेच पर्यावरण, उत्पादन ,गुणवत्ता, एस.जी.अे., कायझन, टी.पी.एम., ५ एस अशा सर्व क्षेत्रात संघटित राहून कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी कटिबद्ध राहिले आहेत. महाराष्ट्र कामगार युनियन संघटनेमध्ये सेक्रेटरी या पदावर कार्यरत असताना कामगार संघटना व कामगारांमधील हितसबंध जुळवून आणण्यासाठी प्रयत्न केले. भारतीय विद्यार्थी सेना व शिवसेना या संघटनेमध्ये विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. २६ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये तालुक्यातील अनेक गावांना मदत केली. तसेच आदिवासी परिसरामध्ये बोअर वेल मारण्यासाठी आर्थिक मदत केली. गणेशोत्सवात वृक्षरोपण, आदी विविध कार्यक्रमात सक्रिय सहभाग.



## श्री. रामकृष्ण बाबुराव बोऱ्हाडे

**मशिन ऑपरेटर**
**महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. कांदिवली**

सन १९८० पासून महिंद्रा ट्रॅक्टर कांदिवली या कारखान्यात कार्यरत. युनिटचे कार्यकारिणी उपाध्यक्ष म्हणूनही ते क्रियाशील आहेत. युनियनचे व व्यवस्थापनाचे विविध उपक्रम तसेच जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरण यामुळे उद्योगधंद्यांपुढे निर्माण होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी उत्पादन व उत्पादकता याविषयी विविध संकल्पना यामध्ये सकारात्मक पुढाकार देतात. सुरक्षा समितीचे प्रमुख म्हणून प्रत्येक कर्मचाऱ्याच्या सुरक्षेची काळजी घेतात. व्यवस्थापनाच्या ध्येय धोरणांमध्ये सुधारणा करण्यात सहभाग असतो. जागतिक दर्जाची ॲवार्डस् मिळविताना त्यांनी भाग घेतला. शिनोली आणि वाडीवस्त्यांवरील अंगणवाडीतील मुलामुलींना मोफत गणवेश आणि शैक्षणिक व आर्थिक मदत. भैरवनाथ ट्रस्ट मार्फत सामुदायिक विवाह सोहळा, गणेशोत्सव, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, कबड्डी खेळाचे सामने, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, शौचालये दुरुस्ती, संरक्षक भिंत इत्यादी कार्यक्रमांमध्ये सक्रिय भाग घेतात.



## श्री. राजेश गोरख सोनार

**वाहक**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धुळे**

सन १९९७ पासून महामंडळात वाहक या पदावर रुजू झाले. कामगार संघटनेकडून वेळोवेळी राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमात जसे कामगार प्रश्न, प्रवासी वाढवा अभियान, उत्पन्न वाढवा अभियान, सुरक्षितता, इत्यादी विविध उपक्रमात अग्रेसर असतात. लेखनाची आवड असून स्थानिक वृत्तपत्रात बातमीदार म्हणून काम कलेले आहे. स्वतः रक्तदाते असून इतरांनाही रक्तदान करण्यासाठी प्रवृत्त करतात. मनुश्री प्रतिष्ठान धुळे या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक कार्य करतात. अहिर सुवर्णकार समाज या संघटनेच्या माध्यमातून गोरगरीब मुलांना शालेय वस्तू वाटप, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, अंधश्रद्धा निर्मूलन, समाजसुधारकांची जयंती/पुण्यतिथी साजरी करणे, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आदी कार्यक्रमात सहभाग आणि विशेषतः बेटी बचाव या विषयावर कवितालेखन देखील करत आहेत.



## श्री. कृष्णा सुखदेव ढोकले

**(उत्पादन साहाय्यक)**
**हाफकिन जैव औषध महामंडळ, पिंपरी, पुणे.**

सन १९९८ पासून मंडळाच्या सेवेत रुजू झाले. सन २००५-०६ मध्ये आलेल्या पुरामध्ये वाहून आलेल्या व अडकलेल्या सापांना जीवनदान, तोरणा किल्ला दुर्घटनेतील मृतदेह शोधण्यात पोलिसांना मदत, २०१३ साली उत्तराखंड येथील जलप्रलय रेस्क्यू ऑपरेशनमध्ये स्वयंसेवक म्हणून कार्य, माळीन गाव भूस्खलनात स्वयंसेवक म्हणून कार्य आदी लोकोपयोगी काम केले आहे. गिर्यारोहक म्हणून महाराष्ट्रातील ४० मोहिमा सर करत नागफणी सुळक्यावर भररात्री व एकट्याने चढाईचा दुहेरी विक्रम केला आहे. हिमालयातील माउंट एव्हरेस्ट, माउंट श्रीकंठ, माउंट आयलंड, माउंट हनुमान तिब्बा आदी शिखर सर केले आहेत. महाराष्ट्राचा प्रथम शासकीय कर्मचारी एव्हरेस्ट वीर, राज्याचा उत्कृष्ट प्रस्तरारोहक, पर्यावरण मित्र, उद्धव श्री, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल, अशा इतर अनेक पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. भारतीय कामगार सेना पिंपरी युनिटचे अध्यक्ष, पिंपरी चिंचवड माउंटेनियरिंग क्लबचे कार्यवाह, शिवसह्याद्री ॲडव्हेन्चर्स भोसरीचे चिटणीस, गिरीप्रेमी संस्था पुणे सदस्य, हाफकिन ट्रेकिंग क्लबचे संस्थापक म्हणून कार्यरत आहेत.



## श्री. दत्तात्रय नारायण मंतिनवार

**(लेखपट यंत्रचालक)**
**शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर.**

सन १९८७ पासून सेवेत कार्यरत. कंपनीच्या उत्पादन वाढीकरिता चांगली यंत्र सामुग्री, योग्य वातावरण, कामगारांना प्रशिक्षण, उद्योगाचे आधुनिकीकरण, आरोग्य तपासणी शिबिर, उत्पादन व उत्पादकता याबद्दल माहिती आदी काम केले आहे. शासकीय मुद्रणालय औद्योगिक कामगार संघटनेचे कोषाध्यक्ष, भारतीय आदिवासी भटक्या विमुक्त युथ फ्रंटचे सदस्य, शासकीय मुद्रणालय सहकारी संस्थेचे सदस्य, व महाराष्ट्र बेलदार समाज महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. संघटनेच्या माध्यमातून पदोन्नती, अनुकंपा तत्वावर भरती, सरळसेवा भरती, मागासवर्गीयांच्या समस्या सोडविल्या आहेत. शासकीय मुद्रणालयामध्ये शिवजयंती, आंबेडकर जयंती, विद्यार्थी गुणगौरव, क्रीडा विषयक कार्यक्रम, तसेच अमरनाथ यात्रेचे सातत्याने आयोजन करतात. अंधश्रद्धा निर्मूलन, ग्राहक तक्रार निवारण, मोहल्ला कमिटी, रक्तदान शिबिर, क्रीडा प्रशिक्षण शिबिर आदी सामाजिक कार्यात सहभाग.





## श्री. सतिश विठोबा टेंबे

**(हायस्कील्ड)**
**माझगावडॉकशिपबिल्डर्सलि., माझगाव, मुंबई.**

सन १९९८ पासून कंपनीत रुजू झाले. कंपनीचे उत्पादन वाढीसाठी जागृती करून देशाच्या सुरक्षेशी निगडित असलेल्या उत्पादनात सातत्य टिकवून ठेवून युद्धनौका, पाणबुडी यात प्रगती केली आहे. समुद्रीतेल कंपनीसाठी ऑफशोअर प्लॅटफॉर्म बांधणीच्या कालबद्ध कार्यक्रमास चालना दिली. संघटनेच्या माध्यमातून व्यवस्थापनाशी कुशलतेने बोलणी करून वेतनवाढ, वैद्यकीय सुविधा, प्रवासभत्ता व इतर सुविधा, निवृत्ती वेतन करार आदी लाभ कामगारांना मिळवून दिले. कामगारांचे जीवनमान, राहणीमान, कौटुंबिक स्वास्थ्य सुरक्षित करून अनुपस्थिती, व्यसनाधीनता कमी केली. देशाचे पंतप्रधान, संरक्षण मंत्री व नौदल प्रमुख यांचे उपस्थितीत युद्धनौका व पाणबुडी वेळेपूर्व राष्ट्रास समर्पित करण्याच्या कामात सहभाग आहे. एस.एस.व्ही. संस्था, चेतना संस्था, गणेश चॅरीटेबल ट्रस्ट, साथी फाऊंडेशन यांच्या माध्यमातून शैक्षणिक, बेरोजगार मेळावा, महिला सबलीकरण, प्रशिक्षण शिबिर, कौटुंबिक समुपदेशन, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आदी सामाजिक उपक्रम राबविले आहेत. व्यायामाची आवड असल्याने शरीर सौष्ठव स्पर्धेत भाग घेऊन अनेक पारितोषिके मिळविली आहेत. मुंबई डिस्ट्रीक्ट कॅरम असोशिएशनचे सदस्य म्हणून जिल्हा व राज्यस्तरीय कॅरम स्पर्धांचे आयोजन केले आहे.



## श्री. रणजितसिंग इंद्रसिंग गिरासे

**(टाईम किपर)**
**युनिवर्सल स्टार्च केम अलाईड लि, दोंडाईचा, धुळे.**

सन १९९१ पासून कंपनीत कार्यरत आहेत. टाईम कीपर या नात्याने कामगारांच्या रजा, अपघात लाभ, भविष्य निर्वाह निधी आदीबाबतच्या समस्या सोडवून लाभ मिळवून दिले व कंपनीच्या उत्पादन वाढीस साहाय्य केले आहे. आम्ही दोंडाईचेकर, स्वामी विवेकानंद सांस्कृतिक संस्था, जायन्ट्स इंटरनॅशनल, स्वामी समर्थ विकास केंद्र, रोटरी क्लब, तालुका काँग्रेस सेवादल आदी संस्थांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या सेवा सवलतीचा लाभ, वृक्षलागवड व वृक्ष संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, राजपूत समाजातील मुलामुलींचे विवाह, समुपदेशनातून विवाहावरील खर्चात कपात, ग्राम स्वच्छता अभियान, गंभीर आजारी रुग्णांना मदत, आदी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग दिला आहे. गीत गायन स्पर्धा, राष्ट्रीय नेत्यांची जयंती व पुण्यतिथी, पारंपरिक सण व उत्सव, धार्मिक उत्सवांचे आयोजन सातत्याने केले आहे. वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा शारीरिक आरोग्य सुदृढ राहावे म्हणून क्रिकेट, खो-खो, व्हॉलीबॉल आदी स्पर्धांचे आयोजन केले आहे.



## श्री. श्रीकांत माधव भुते

**ऑपरेटर (एच.आर.५ ग्रेड)**
**एस.के.एफ.(इं) लि., चिंचवड, पुणे.**

सन १९९० पासून कंपनीत कार्यरत. प्रामाणिक काम, चिकाटी, उत्पादन वाढीस सहाय्य केले. आज पर्यंत तीन वेळा बढती देऊन केलेल्या कामांची दखल कंपनीने घेतली आहे. कंपनीच्या उत्पादन वाढीकरिता योग्य वातावरण, कामगारांना प्रशिक्षण, उद्योगाचे आधुनिकीकरण, आरोग्य तपासणी शिबिर, उत्पादन व उत्पादकता याबद्दल माहिती आदी काम केले आहे. शालेय गरीब व गरजू मुलांकरिता मोफत गणवेश वाटप, वारकऱ्यांना अन्नदान देऊन त्यांची सेवा, मूक-बधीर संस्था, सावली धान्यरूपी मदत, मातोश्री वृद्धाश्रमाला भेट, कसबा पेठ येथील गरजू लोकांना आर्थिक व इतर मदत, उगम ग्रुपच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, एच.आय.व्ही. मुलांना भेटवस्तू व भोजन, दिवाळीमध्ये आकाश कंदिल तयार करणे, धार्मिक उत्सव, गणेशोत्सव, नवरात्री, शिवजयंती, दहीहंडी आयोजन, तसेच कॅरम स्पर्धांचे आयोजन केले आहे.



### श्री. महेश कृष्णा मेस्त्री

**(मशिनिष्ट- मिलर)**
**टाटा मोटर्स लि., पिंपरी, पुणे**

सन १९९२ पासून सेवेत कार्यरत. कंपनीने प्रशंसनीय कामगिरी व गुणवत्तेसाठी मॅन ऑफ द मंथ, मॅन ऑफ द इयर आणि मानाच्या JRD टाटा गुणवत्ता पुरस्काराने गौरविले आहे. सजेशन स्कीम, टी.पी.एम., ५ एस प्रणाली, कायझेन, शून्य अपघात व वर्ल्ड क्लास क्वालिटी या कामाच्या पद्धतीचा उपयोग करतात. कै.सुमंत मुळगावकर ट्रस्ट, पोलीस नागरिक मित्र संस्था, महालक्ष्मी ट्रस्ट शाहूनगर आदी संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक मदत, स्वच्छता मोहीम, रक्तदान, केदारनाथच्या प्रलयग्रस्तांना मदत, नेपाळ भूकंप निधी आणि वृक्षारोपण कार्यक्रम अशी सामाजिक कामे केली आहेत. गृहनिर्माण संस्थेत सोलर वॉटर हिटर बसवून पर्यावरण रक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. विजेच्या बचतीसाठी LED दिव्यांचा वापर करण्यासाठी जनजागृती करतात.



### श्रीमती आस्था अजय दळवी

**(फार्मासिस्ट)**
**शुश्रूषा सिटीझन्स कॉ.ऑप. हॉस्पिटल लि., दादर, मुंबई.**

सन २००२ च्या नियुक्तीपासून हॉस्पिटलच्या सेवेत कार्यरत आहेत. हॉस्पिटलसाठी लागणारी विविध औषधे वेळेत उपलब्ध करून देणे, कॅथलॅब डिपार्टमेंट सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न, एक्स रे फिल्म व लाईफ सेव्हिंग औषधे ठेवण्याच्या परवानगीसाठी प्रयत्न केले. इतर हॉस्पिटल्सना भेटी देऊन तेथील अद्ययावत यंत्रे व कार्यप्रणालींचा अभ्यास करून स्वत:च्या कामात सुधारणा केली. याचबरोबर कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी हिंद मजदूर सभेच्या मुंबई लेबर युनियन या संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले. श्री. दत्त क्रीडा प्रबोधिनी, सार्वजनिक नवरात्रौत्सव विक्रोळी, सार्वजनिक उत्सव समिती, जिजाऊ महिला बचत गट, कला साधना मंडळ, कलावती महिला बचत गट, इंडियन सुन्नी इस्लाम असोसिएशन, नेचर क्युअर एज्युकेशन सोसायटी, आदी संस्थांच्या माध्यमातून आरोग्य व रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, विद्यार्थी गुण गौरव, गरजू महिलांना मदत, अपंग व अनाथ लोकांसाठी मदत, ज्येष्ठ नागरिकांसाठी मदत अशी कामे केली आहेत.



### श्री. सतीश रामचंद्र देशपांडे

**(सिनियर मशीन ऑपरेटर ग्रेड १)**
**गरवारे पॉलिएस्टर लि., चिकलठाणा, एमआयडीसी, चिकलठाणा, औरंगाबाद**

सन १९८८ पासून सेवेत आहेत. मशीनचे लाईफ वाढवण्यासाठी प्रयत्न केले. खराब साहित्यातून विविध उपयोगी ट्रॉलींची निर्मिती करून वेळ व अपघात कमी करण्याचा प्रयत्न केला. मशीनच्या मॉडीफिकेशन व डेव्हलपमेंट यात विशेष लक्ष घालून उद्देश साध्य केले आहेत. गरवारे कम्युनिकेशन सेंटरच्या रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, ध्वनिप्रदूषण जनजागृती, हागणदारीमुक्त गाव, स्वच्छता मोहीम यासारख्या उपक्रमांत सहभागी असतात. फायर सुरक्षितता, कायझेन, टी.पी.एम. या कार्यप्रणालींच्या वापरात पुढाकार घेतात. मनुष्यबळ विकास व लोकसेवा अकादमीचा कामगार श्री पुरस्कार, भारतीय समाज विकास अकादमीचा राष्ट्रभूषण गौरव पुरस्कार, अखिल महाराष्ट्र पत्रकार व पत्रलेखक संघाची राष्ट्रीय फेलोशिप आणि विविध क्रीडा व सामाजिक पुरस्काराने सन्मानित आहेत.





## श्री. गुरुदेव शिवाजी सरोदे (वेल्डर)

**आय.एस.एम.टी. लिमिटेड, बारामती, पुणे**

सन १९९४ पासून कंपनीत कार्यरत आहेत. कंपनीने बेस्ट अटेंडन्ट अ‍ॅवार्डने सन्मानित केले आहे. पाईप रोलिंग लाईफ वाढविण्यासाठी व काम सुरळीत होण्यासाठी यशस्वी बदल करून काम केले आहे. कोलींग पाईपमध्ये देखील आवश्यक ते बदल करून उत्पादनवाढीसाठी प्रयत्न केले आहेत. वेल्डिंग जॉईंट तुटू नयेत याकरिता विशेष काम केले आहे. कामगार संघटनेच्या माध्यमातून होणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात सहभागी असतात. धम्मज्योत ट्रस्ट तांदुळवाडी संस्थेची स्थापना करून मुलांना वह्या वाटप, अंधश्रद्धा निर्मूलन व प्रबोधन कार्य केले आहे. वृद्धांसाठी नेत्रचिकित्सा व चष्मा वाटप शिबिर, धम्म परिषदांचे आयोजन असे उपक्रम राबविण्यात पुढाकार घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज सेवक व नेहरू पुरस्काराने सन्मानित झाले आहेत.



## श्री. वसंत लक्ष्मण चिपळूणकर (इलेक्ट्रिशियन)

**जे. के. फाईल्स इंडिया लि., गाणे खड्पोली, चिपळूण, रत्नागिरी**

सन १९९७ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. गुणवत्ता व सुरक्षा वाढीसाठी मशीनमध्ये आवश्यक ते बदल केले. त्याचप्रमाणे वीज बचत करण्यासाठी १०० कि.वॅट क्षमतेचे पावर प्लान्ट जनरेटिंग सिस्टम कार्यान्वित करण्यासाठीच्या कामात सहभागी आहेत. कंपनीस नॅशनल केस स्टडी कॉम्पिटीशनमध्ये विजेतेपद मिळवण्यासाठी आय.एस.ओ., सुरक्षा व पर्यावरण, उत्पादन व वितरण व्यवस्था, व्हॅल्यु स्ट्रीम आदींसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. कंपनीने सन २०००, २००३ व २००४ मध्ये उत्कृष्ट कामगार म्हणून निवड केली आहे. कामगारांच्या सहकारी पतसंस्थेत २००७ पासून सदस्य म्हणून कार्यरत आहेत. महात्मा गांधी तंटामुक्ती समिती व लेख संहिता समितीचे सदस्य म्हणून काम केले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पंपाकरिता मोबाईल ऑटो सिस्टीम बसवून दिली, वॉटर लेवल कंट्रोल सिस्टीम, कृषी प्रदर्शनात वीज बचतीची पोस्टर्स व पत्रके इ. कामांसाठी कृषी अधिकारी चिपळूण, कोकण भूमी प्रतिष्ठान यांनी सन्मान केला आहे. अलोरे, नागावे, कुंभार्ली या गावांच्या ग्रामपंचायती तसेच कोकण विभाग गुरू रविदास विकास मंडळ, समता आंतरजातीय विवाह-पुनर्विवाह संस्था आदी संस्थांच्या माध्यमातून सौर पथदिवे योजना, विद्यार्थी गुणगौरव, कायदेविषयक मदत इ. सामाजिक कामे केली आहेत. दिव्यांग क्रीडापटूंसाठी रत्नागिरी डिस्ट्रिक्ट पॅरा अ‍ॅथलेटिक अलायन्सच्या उपक्रमांत भाग घेतला आहे.



## श्री. हनमंत किसन माळी (टर्नर)

**टाटा मोटर्स लि., पिंपरी, पुणे**

सन १९८० पासून सेवेत आहेत. कंपनीच्या फायर प्रिव्हेन्शन, इंडस्ट्री सेफ्टी, एन.पी.आय., वर्ल्ड क्लास क्वालिटी अशा उत्पादन वाढ व गुणवत्ता वाढीच्या प्रशिक्षण उपक्रमात सहभागी झाले आहेत. कंपनीचे २०११, २०१३, २०१४ व २०१५ चे गुड अटेन्डन्स प्रमाणपत्राचे मानकरी. कंपनीतील विविध कामांचा अनुभव असलेले अष्टपैलू कामगार म्हणून ख्याती आहे. सन १९९७ ते २०१५ विदाउट एनी ॲक्सिडेंट प्रशस्तीपत्र प्राप्त केले आहे. एस.क्यू.डी.सी.एम.इ., टी.पी.एम., ५ एस, कायझेन या कार्यप्रणालीत सहभाग असतो. कंपनीच्या उत्पादन व वितरणाची जबाबदारी उत्तमपणे सांभाळली आहे. संस्कार प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड ब्लड डोनर्स असोसिएशन, महात्मा ज्योतिबा फुले मंडळ, अखिल चिंचवड नवरात्र महोत्सव, श्री दत्त नागरी पतसंस्था, रक्तदान शिबिर, एड्स मार्गदर्शन रॅली, चिकनगुन्या व डेंग्यूबाबत जनजागृती, वधू-वर मेळावा, व्यसनमुक्ती, शैक्षणिक साहित्य वाटप, विद्यार्थी गुणगौरव, अनाथ अपंग विद्यार्थ्यांना मदत आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन आदी उपक्रमात सक्रीय सहभाग.

# गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार

## वितरण सोहळा




कामगार भूषण पुरस्कार,
गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार,
पुरस्कारार्थींचा परिचय



# श्री. विजय भूपाल पिसे

**(इलेक्ट्रिशियन)**
**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
**किर्लोस्करवाडी, तालुका पळूस,**
**जि. सांगली**

कंपनीच्या सेवेत सन १९९३ पासून आहेत. सन २००५ चे गुणवंत कामगार आहेत. कंपनीच्या अनेक विभागात विविध सुधारणा करीत उत्पादन वाढ, सुरक्षितता, ऊर्जा बचत अशा ७५ कायझेन करण्याचा उच्चांक केला आहे. कंपनीने त्यांना ॲप्रिसिएशन अवार्ड देऊन सन्मानित केले आहे. किर्लोस्कर कामगार युनियनचे क्रियाशील सदस्य आहेत. महासुरक्षा पत्रिकेत औद्योगिक सुरक्षेसंबंधी लिखाण करीत असतात. किर्लोस्कर ब्रदर्सच्या सेफ्टी निबंध स्पर्धा, सुरक्षितता घोषवाक्य स्पर्धा, कायझेन स्लोगन स्पर्धा, सुरक्षितता स्पर्धांमध्ये त्यांना पारितोषिके मिळाली आहेत.

महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक केली आहे. रामकृष्ण काकडे चॅरिटेबल ट्रस्टचा समाजरत्न पुरस्कार तसेच श्रमशक्ती एकता सामाजिक संस्थेचा एकता पुरस्कार, जनकल्याण सामाजिक संस्थेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर जनमित्र पुरस्कार, वसुंधरा पुरस्कार आदी पुरस्कार मिळाले आहेत. 'बीज एकले' नावाच्या मराठी चित्रपटात भूमिका केली आहे. तसेच नाट्य स्पर्धांमध्ये अभिनय केला आहे. सांगली जिल्ह्यात २००५ साली आलेल्या पुरात मदत कार्यात सहभागी झाल्याबद्दल जिल्हाधिकारी सांगली यांनी प्रशस्तिपत्र दिले आहे. रस्ता सुरक्षा अभियानात विशेष भाग घेतला. वृक्षारोपण व सायकल रॅलीचे आयोजन करण्यात भाग घेतला आहे. याव्यतिरिक्त रक्तदान, एड्स जनजागृती अभियान, वधूवर मेळावे, अंधश्रद्धा निर्मूलन आदी कार्यात सहभागी असतात. आईच्या नावे सरस्वती ज्ञानप्रबोधिनी ही संस्था स्थापन करून शैक्षणिक कार्य करीत आहेत.



## श्री. भास्कर नामदेव पाटील

**टेक्निशियन (ओ.अँड एम.)**
**रिलायन्स इंडस्ट्रीज लि.,**
**नागोठणे,**
**जि. रायगड**

कंपनीच्या सेवेत सन १९९२ पासून कार्यरत आहेत. सेवेत चार वेळा पदोन्नती मिळाली आहे. ऑक्टोबर २०१० मध्ये कंपनीच्या पी.पी.प्लांटमधील मेकॅनिकल वर्कशॉपमध्ये लागलेली आग वेळीच आटोक्यात आणून संभाव्य अपघात टाळल्यामुळे कंपनीने 'वेल डन ॲवार्ड' ने सन्मानित केले आहे. तसेच कंपनीने मशीन डिझाईनसाठी 'जेम्स ॲवार्ड'ने सन्मानित केले आहे. पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियनचे सक्रिय सभासद आहेत. कामाच्या ठिकाणी सुरक्षा, पाणी व कच-याचे नियोजन, व्यसनमुक्ती यासाठी प्रयत्न केले. साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यासाठी विविध पुरस्कार मिळाले आहेत. 'मुन्नाभाई एस.एस.सी' या चित्रपटाचे संयुक्त कथालेखन व 'स्वप्न' या चित्रपटासाठी संवाद लेखन केले आहे. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव व कामगार कल्याण मंडळाच्या नाट्य महोत्सवात पुरस्कार मिळाले आहेत.



## श्री. प्रकाश रत्नु बाईत

**(सिनिअर ऑपरेटर)**
**भारत सरकार टांकसाळ,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई**


सन १९९५ पासून आस्थापनेत कार्यरत आहेत. सेवेत तीन वेळा पदोन्नती मिळाली आहे. व्यवस्थापनाने कामातील दक्षतेमुळे सन्मानित केले आहे. आस्थापनेने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यश संपादन केले आहे. टांकसाळ मजदूर सभा, मुंबई मिंट को-ऑपरेटिव्ह सोसायटी या संस्थांचे सक्रिय सभासद आहेत. राजर्षी शाहू कोल्हापूर विकास प्रतिष्ठान, राजाराम अवधूत चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर जिल्हा लोकसेवा मंडळ, अदिती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था, रेणुकामाता सहकारी संस्था, सर जमशेदजी जीजीभाई धर्मशाळा, रामदूत रहिवासी सेवा संघ आदी संस्थांच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी कार्यात सहभाग घेतला.



## श्री. संदीप दत्तात्रय पानसरे

**(ऑपरेटर)**
**महिंद्रा सी.आय.ई.ऑटोमोटिव्ह लि.**
**उर्से, तालुका मावळ, जिल्हा पुणे**

कंपनीत सन १९९७ पासून सेवेत आहेत. कायझेन प्रणालीचा वापर करून उत्पादन व गुणवत्ता वाढीसाठी यशस्वी प्रयत्न केल्यामुळे कंपनीने ८०हून अधिक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. पुणे जिल्हा कामगार संघाचे सक्रिय सभासद असून सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा विषयक कार्यक्रमात सहभागी असतात. वज्र फाउंडेशन, सिद्धीविनायक प्रतिष्ठान, श्री स्वामी समर्थ मित्र मंडळ, जुन्नर आंबेगाव संघ, तळेगाव दाभाडे नगर परिषद, श्री साई फ्रेंड सर्कल, उर्से-शिलाटणे-वडगाव आदी ग्रामपंचायती व विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यक्रम व उपक्रमांमध्ये सहभाग आहे. महिलांसाठी मोफत ड्रायव्हिंग कोर्स, महिला बचत गटांची स्थापना, रस्ता सुरक्षा अभियान, वृक्षारोपण, पाणी अडवा पाणी जिरवा, आरोग्य तपासणी शिबिर, अंध विद्यार्थ्यांसाठी गणवेश व फराळ वाटप, वृद्धाश्रमास धान्यवाटप आदी कार्यक्रम राबविले आहेत.





## सौ. जयश्री संजय पंडित

**(सहायक लेखा अधिकारी)**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई**

सन १९८१ पासून प्राधिकरणाच्या सेवेत आहेत. आस्थापनेत त्यांनी कनिष्ठ लिपिक ते सहायक लेखा अधिकारी अशा पदोन्नती प्राप्त केल्या आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचारी महासंघ या संघटनेच्या सक्रिय सभासद आहेत. कामाच्या ठिकाणी पाणी विक्रीसाठीच्या दर नियमनातील आर्थिक अनियमितता व त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करून संस्थेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे उत्पन्न वाढ झाली. 'आपलं पाणी' या प्रकल्पात स्वच्छता अभियानाद्वारे राजस्थान, गुजरात येथे विशेष काम केल्याबद्दल प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. गिर्यारोहण मोहिमेत सक्रिय भाग घेतला. त्यांनी विविध सायकल मोहिमा पूर्ण केल्या आहेत. सहलींचे यशस्वी आयोजन केले आहे. या व्यतिरिक्त विविध सामाजिक संस्थांशी निगडित आहेत.



## सौ. संगीता गिरीश फुके

**(लिपिक)**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**

**एन.डी.पटेल रोड, नाशिक**

महामंडळात सन १९९५ पासून कार्यरत आहेत. आस्थापनेच्या उत्पन्न वाढीसाठी नियोजित कामगिरी पार पाडली आहे. सामाजिक कामांमध्ये 'दिलासा' या वृद्धाश्रमाशी जोडलेल्या असून तिथे अन्नदान व विविध सेवा, अनाथ बालकांसाठी शैक्षणिक व आर्थिक मदत आदी उपक्रमांत भाग घेतात. कामगार संघटनेशी संलग्न आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषद व अक्षर मानव या संस्थांच्या सभासद असून विविध समाजोपयोगी कामे करीत आहेत. साहित्य क्षेत्रातील श्रावण बाळ, साहित्य गौरव, उत्कृष्ट संपादन आदी पुरस्कार मिळाले आहेत. महिला बचत गटासाठी समुपदेशन व मार्गदर्शन केले, वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम राबविली. आंतरजातीय विवाहासाठी सामाजिक समता प्रमाणपत्र सन १९९३ मध्ये व नारी पत्रकार भूषण पुरस्कार २०१७ मध्ये मिळाले आहेत.



## श्री. सचिन राजाराम अनपट

**(लेखनिक)**

**सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि. सदर बाजार, सातारा**

बँकेत सन २००८ पासून कार्यरत आहेत. शाखेचे कामकाज करताना विविध प्रशिक्षण, मायक्रो फायनान्स, विमा, महिला बचत गट आदी कामात सक्रिय असतात. वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, रक्तदान आदी कार्यात सहभाग असतो. सांस्कृतिक कार्यक्रमांपैकी राज्य नाट्य स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, नाट्य लिखाण स्पर्धा यात भाग घेतला आहे. त्याचप्रमाणे दैनिकात लिखाण करतात. बँकेच्या सांस्कृतिक मंडळाशी निगडित आहेत. कृष्णाई कलामंच, जयहिंद प्रतिष्ठान यासारख्या संस्थांच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता अभियान, जलसंधारण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, क्रीडा स्पर्धा आयोजन, आरोग्य शिबिर यांच्या आयोजनात सहभाग आहे.

२०१६



## श्री. शरद गिरीधर पाटील

**(वरिष्ठ तंत्रज्ञ-उपकरण SG-II)**
**राष्ट्रीय केमिकल अँड फर्टीलायझर लि. थळ, अलिबाग, जि. रायगड**

सन १९८६ पासून कंपनीत कार्यरत आहेत. कंपनीत उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करून राष्ट्रीय स्तरावर सादरीकरण केले व पुरस्कार मिळविले आहेत. ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक, वैद्यकीय व आर्थिक मदत मिळवून देणे, सामुदायिक विवाह आयोजन, नोकरी विषयक मार्गदर्शन, शैक्षणिक सहली आदी कार्यक्रमांचे आयोजन करतात. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या उपक्रमांतर्गत एकच मुलगी असणाऱ्या पालकांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला आहे. विविध सामाजिक संस्थांशी निगडित आहेत.



## श्री. सोपान आबासाहेब बांगर

**(ऑपरेटर मल्टीस्किल ५)**
**बजाज ऑटो लि. वाळूज, औरंगाबाद**

कंपनीत सन १९८६ पासून सेवेत आहेत. नवनवीन कामे शिकण्याची वृत्ती, क्वालिटी कंट्रोल, टीपीएम यामुळे व्यवस्थापनाने गौरव केला आहे. वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, हुंडा बंदी कार्यक्रम, स्वच्छता अभियान, अनाथ आश्रमातील मुलांसाठी निधी देणे, बेटी बचाओ बेटी पढाओ उपक्रम, व्यसनमुक्ती कार्यक्रम आदींमध्ये सहभाग घेतला. संघटनेच्या माध्यमातून कामगार व व्यवस्थापन यांच्यात सामंजस्य ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात जलसंवर्धनासाठी जनजागृती करतात.



## श्री. सुरेश शंकर निकम

**(ड्रिलर ग्रेड W-5)**
**इंटरव्हॉल्व पूनावाला लि. हडपसर, पुणे**

कंपनीच्या सेवेत सन १९९७ पासून आहेत. कार्यप्रणालीत बदल करीत उत्पादकता वाढविली म्हणून व्यवस्थापनाने W-5 ही ग्रेड बहाल केली आहे. त्यांनी उत्कृष्ट उत्पादन व चांगली उत्पादकता यासाठी मशीन शॉपमध्ये व असेम्ब्लीमध्ये सुधारणा घडवून आणल्या आहेत. वृक्षारोपण, रस्त्यांचे डांबरीकरण, विविध जनजागृतीचे कार्यक्रम, रक्तदान शिबिर, स्ट्रीट लाईटसाठी पाठपुरावा, कामगार मेळावा व कविसंमेलन आदी सामाजिक कार्यात भाग घेतला. संघटनेचे सक्रिय सभासद आहेत. कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजना, कार्यक्रम व उपक्रमांत भाग घेण्यासाठी इतर कामगार व कामगार कुटुंबीयांना प्रोत्साहन देतात.





### श्री. दत्तात्रय सोनबा मुळीक

**(सेल मेंबर कम फोअर क्लिप ड्रायव्हर)**
**महिंद्रा अँड महिंद्रा फार्म डिव्हिजन आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई.**

सन १९७१ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. उत्पादन व उत्पादकता वाढीच्या विविध संकल्पना राबविण्यात सहभाग असतो. कंपनीत सुधारणा टीममध्ये काम करुन कानपूर येथील गुणविकास मंडळाच्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला. 'इसॉप्स'च्या माध्यमातून दिवाळी फराळ वाटपासारख्या कार्यक्रमातून सक्रिय आहेत. परिसरातील ओमकार मित्र मंडळ, गोराई हाऊसिंग फेडरेशन, आम्ही सातारकर, मराठा सहायक मंडळ, वारकरी संप्रदाय आणि भारतीय कामगार सेना अशा संस्था व संघटनांशी संलग्न आहेत. स्वच्छता मोहीम, आदिवासी भागात शैक्षणिक साहित्य वाटप, सदनिका हस्तांतरण प्रश्न सोडवणे, वैद्यकीय शिबिर आयोजन, गुणवंत विद्यार्थी सत्कार, व्याख्यानमाला, नृत्य स्पर्धा, कबड्डी स्पर्धा यांचे आयोजन, कर्तृत्ववान महिलांचा सत्कार, शहिदांच्या परिवारांचा सन्मान अशा विविध कार्यक्रम व उपक्रमांत सहभाग घेतला. ट्रेकिंगचीही आवड आहे.



### सौ. रुपाली भरत कोंडे

**(ऑपरेटर-रिसेप्शनिस्ट)**
**गोदरेज अँड बॉईज मॅन्यु. कं. लि., शिरवळ, तालुका-खंडाळा, जिल्हा सातारा**

कंपनीत सन २००२ पासून काम करीत आहेत. टी.पी.एम., ५ एस आदी कार्यप्रणालीचे प्रशिक्षण घेतले आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षा यंत्रणेचे प्रशिक्षण प्राप्त केले आहे. गोदरेज एम्प्लॉईज युनियन, गोदरेज सहकारी पतसंस्था, गुणवंत कामगार प्रतिष्ठान सातारा आदी संस्थांच्या माध्यमातून कामगार क्षेत्रात विविध कल्याणकारी कामात सक्रिय आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या 'हरित सेने'च्या सदस्य आहेत. धर्मवीर संभाजी कला क्रीडा मंडळ, जय भवानी युवक मित्र मंडळ, शिवतेज सार्वजनिक वाचनालय, राजमुद्रा प्रतिष्ठान, अंबिका माता सामाजिक सेवा चॅरीटेबल ट्रस्ट, चैतन्य व राजलक्ष्मी महिला बचत गट आणि विंग, अतीट, कर्णवडी या ग्रामपंचायतींच्या माध्यमातून वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, ग्रामस्वच्छता अभियान, बायोगॅस व सेंद्रिय खताबाबत जनजागृती, व्यसनमुक्ती व ऊर्जा संवर्धन आदी कार्यक्रमात भाग घेतला आहे.



### श्री. श्रीकांत त्रिंबक मोरे

**(ऑपरेटर मल्टीस्किल)**
**बजाज ऑटो लि. वाळूज, औरंगाबाद**

सन १९९१ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. कामातील कुशलता, हजेरीतील सातत्य व सुरक्षित कामाची पद्धत यामुळे यंत्रकारागीर-२ या श्रेणीपासून सुरुवात करून यंत्रकारागीर-५ या श्रेणीपर्यंत पदोन्नती मिळविली आहे. क्वालिटी सर्कलच्या माध्यमातून उत्पादन वाढ, गुणवत्तेत सुधारणा, वेळेची बचत, सुरक्षा व आर्थिक वाढ साध्य केल्यामुळे व्यवस्थापनाने वेळोवेळी गौरव केला आहे. बजाज ऑटो लि. एम्प्लॉइज युनियनचे सक्रिय सभासद आहेत. आदर्श मित्र मंडळ, सुयोग चॅरीटेबल ट्रस्ट, तेजस्वी नागरी पतसंस्था, प्रणव वाचनालय, सुयोग महिला बचत गट आदींच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा विषयक कार्यक्रमात सहभागी झाले. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, हुंडा व दारूबंदी आदी सामाजिक विषयांवर प्रबोधन करतात.



### श्री. दिलीप गणपत खोंड

**(युटीलिटी ऑपरेटर)**
**व्ही.व्ही.एफ. इंडिया लि. तळोजा, रायगड**

कंपनीत सन १९९४ पासून कार्यरत आहेत. अचूक काम, अधिक उत्पादन, सुरक्षा व उत्तम दर्जा या कामाच्या पद्धतीमुळे व्यवस्थापनाने गौरविले आहे. कंपनीच्या सर्व बसेसमध्ये 'फर्स्ट एड बॉक्स' बसवण्याच्या संकल्पनेस व्यवस्थापनाने पुरस्कार देऊन कार्यान्वित केली. शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून निवड केली आहे. व्ही.व्ही.एफ. लि. एम्प्लॉइज युनियनचे संचालक आहेत. व्ही.व्ही.एफ.लि. एम्प्लॉइज को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे सक्रिय सभासद आहेत. समता साहित्य अकादमीने 'संताजी जगनाडे महाराज समता पुरस्काराने' सन्मानित केले आहे. बृहन्मुंबई तिळवण तेली समाज मुंबई, श्री.शनेश्वर सेवा संघ, ज्ञान प्रकाश क्रीडा मंडळ मुंबई, पुष्पवृष्टी मंगलमूर्ती चॅरीटेबल ट्रस्ट आदी संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थी गुणगौरव, बेरोजगारांना मार्गदर्शन, वधू-वर व पालक मेळावा, वरिष्ठ नागरिक ओळखपत्र मदतकार्य, कबड्डी सामने, कुटुंब साक्षरता अभियान असे कार्यक्रम राबविले आहेत.



### श्री. कृष्णा फकीरचंदजी गायगोले

**(कनिष्ठ लिपिक)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अमरावती**

आस्थापनेत सन १९८४पासून कार्यरत आहेत. आपले काम करीत असतानाच भारतीय कामगार सेनेच्या माध्यमातून इतर कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्रिय असतात. कामगारांची वेतनवाढ व इतर सेवा सुविधा यांच्यासाठी विविध व्यासपीठावर प्रश्न उपस्थित करतात. संघटनेतर्फे स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, क्रीडा स्पर्धांच्या आयोजनात भाग घेतला. वीज कर्मचारी कंत्राटी कामगार सेनेचे अमरावतीचे अध्यक्ष आहेत. कंत्राटी कामगारांसाठी वैद्यकीय सुविधा, कामावर कायम करणे, वेतनवृद्धी आदी विषयांवर आंदोलन केले आहे. अमरावती जिल्हा मागासवर्गीय खाटिक संघ, अवधूत चतुरपती अन्याय निवारण संस्था आदी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्य केले.



### श्री. सुभाष दगडू देशमुख

**(फाऊंड्री ऑपरेटर)**
**फाऊंडेशन ब्रेक्स मॅन्युफॅक्चरिंग प्रा.लि.) बांभोरी, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव**

कंपनीत सन १९९५ पासून सेवेत आहेत. व्यवस्थापनाने चार वेळा बढती दिली आहे. कंपनीने सन २००२ व २०१४ मध्ये पुरस्कार देऊन गौरविले आहे. 'बेस्ट एम्प्लॉइ ॲवार्ड'ने देखील सन्मानित आहेत. फाऊंडेशन ब्रेक्स कामगार संघटनेचे सक्रिय सभासद आहेत. भटके विमुक्त हक्क परिषद, रिपब्लिकन बहुजन परिषद, महाराष्ट्र जोशी समाज संघटना, देवताळा ग्राम पंचायत, देवगिरी नागरी सहकारी बँक लि., लक्षवेधी फाऊंडेशन, यमुना फाऊंडेशन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले साहित्य परिषद, उत्कर्ष मतिमंद विद्यालय, दिशा समाज प्रबोधन संस्था, जळगाव जिल्हा अपंग बांधव समिती आदींच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, एड्स जनजागृती, स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, मतिमंद मुलांना मदत, बेटी बचाओ बेटी पढाओ, पर्यावरण संवर्धन अशा कार्यात सहभागी झाले.



## श्री. शिवाजी राजाराम शिंदे

**(अभिलेख सहायक)**
**भारतीय आयुर्विमा महामंडळ भोगाळे, तालुका चिपळूण, जिल्हा रत्नागिरी**

महामंडळात सन १९९१ पासून कार्यरत आहेत. कोल्हापूर विभागीय कर्मचारी संघटना, चिपळूण शाखेचे पदाधिकारी आहेत. त्याचप्रमाणे श्री दत्त शिक्षण संस्था, उल्हास ट्रस्ट, रामवरदायिनी ट्रस्ट, दसपटी विभाग मराठा सेवा संघ आदी संस्थांच्या माध्यमातून वृक्षारोपण, पाणी अडवा पाणी जिरवा, आरोग्य शिबिर, क्रिकेट, खोखो, चित्रकला स्पर्धा, गरजू विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप, भजन स्पर्धा यांच्या आयोजनात भाग घेतला आहे. जिल्हा परिषद शाळेसाठी स्वत:ची जमीन बक्षीस दिली आहे.



## श्री. आनंदराव हिरामण सोनवणे

**(प्रधान यंत्रचालक)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित, नंदुरबार**

कंपनीच्या सेवेत सन १९८९ पासून आहेत. वीज उपकेंद्रातील सामुग्रीची नियमित देखभाल, विजेचे योग्य व्यवस्थापन, वीज ग्राहकांचे समुपदेशन, वीज चोरी रोखण्यासाठी उपाययोजना आदी कामे करीत कंपनीच्या महसुलात वाढ करण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर सहकारी कामगार बंधूच्या वेतन तफावत व इतर प्रश्नांबाबत संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करतात. वीज वितरण जळगाव झोनच्या कामगार पुरस्काराचे मानकरी आहेत. तांत्रिक कामगार युनियनचे ते पदाधिकारी आहेत. तसेच भोई समाज क्रांती दल, सहारा वेल्फेअर सोसायटी यांच्या माध्यमातून वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आदी कार्यक्रमात भाग घेतला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत पारितोषिके मिळवली आहेत.



## श्री. गणेश गुलाब तांबोळी

**(रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशन ऑपरेटर)**
**फिन्स फ्रोजन फूडस् लि. मालेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक**

सन १९९५ पासून कंपनीच्या सेवेत आहेत. कंपनीतील उत्पादनवाढ, विविध ट्रेनिंग प्रोग्राम, औद्योगिक सुरक्षा, प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्स यातून कामाचे कौशल्य वाढवून उत्पादकता वाढीचे प्रयत्न केले. कंपनीच्या कामगार संघटनेचे सक्रिय पदाधिकारी आहेत. कामगारांसाठी मेडिक्लेम योजना राबविण्यामध्ये विशेष सहभाग होता. जय साई सुख दु:ख बहुद्देशीय सेवाभावी संस्थेची स्थापना करून समाजोपयोगी काम करतात. महिलांसाठी आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, नेत्ररोग तपासणी शिबिर, व्यसनमुक्ती कार्यक्रम, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांस अन्नधान्य वाटप आदी कार्यक्रम राबविण्यात भाग घेतला आहे.



## श्री. दत्ताराम तुकाराम फोपे

**(मुख्य रोखपाल)**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महालक्ष्मी शाखा, मुंबई**

बँकेत सन १९८१ पासून सेवेत आहेत. बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी सेना युनियनचे कार्याध्यक्ष आहेत. युनियनतर्फे विविध शिबिरे, चर्चासत्रे, द्विपक्ष करार मार्गदर्शन, व्यवस्थापनाशी चर्चा याद्वारे कामगारांचे प्रश्न मांडत असतात. बँक ऑफ महाराष्ट्रच्या स्पोर्ट्स क्लबचा जीवन गौरव पुरस्कार मिळाला आहे. राज्यव्यापी गिरीमित्र संमेलनात 'गिरीमित्र' पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. 'हिमालयीन रेकॉर्ड बुक' मध्ये 'सुली टॉप' या साहसी खेळाबद्दल त्यांची विशेष दखल घेण्यात आली आहे. शाळेतील मुलांसाठी 'सोशल सर्विस लीग ट्रेकर्स क्लब'ची स्थापना करून मुलांसाठी या खेळाची आवड निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. याव्यतिरिक्त बांधीलकी, जान्हवी चॅरिटेबल ट्रस्ट, शिवप्रेमी चॅरिटेबल ट्रस्ट, शिवसेना शाखा क्र.२१४ आदी संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थी गुणगौरव, वह्या वाटप, आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, चष्मा वाटप शिबिर, विविध क्रीडा स्पर्धा आदी कार्यक्रम व उपक्रमांत भाग घेतला आहे.



## श्री. रोहित शरद कानडे

**(मजदूर)**
**भारत प्रतिभूती मुद्रणालय, नाशिक रोड, नाशिक**

आस्थापनेत सन २००२ पासून सेवेत आहेत. आस्थापनेत विविध शाखांमध्ये त्यांनी आपल्या कामामुळे कौशल्य संपादन केले आहे. आस्थापनेच्या विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन पुरस्कार प्राप्त केले आहेत. इंडियन सिक्युरिटी प्रेस मजदूर संघाचे ते सक्रिय सदस्य आहेत. आय. एस.पी.सी.एन.पी. वेल्फेअर फंड कमिटीचे सभासद आहेत. विविध आरोग्य शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार, शालोपयोगी साहित्य वाटप, क्रिकेट, फुटबॉल आदी स्पर्धांच्या आयोजनात भाग घेतला आहे. नवनाथपंथी सामाजिक बहुद्देशीय संस्था व इतर भटक्या विमुक्त संघटना यांच्या माध्यामतून 'मोफत दफन विधी योजना' नाशिक महानगर पालिकेकडून मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न केले. कवी संमेलन, साहित्य संमेलन आदींमध्ये भाग घेतला आहे. डॉ. आंबेडकर फाऊंडेशनच्या सामाजिक कार्यात सहभागी असतात.



## श्री. उल्हास सीताराम देशमुख

**(असिस्टंट एक्झिक्युटीव्ह)**
**अजंता फार्मा लि. वाळूज, औरंगाबाद**

कंपनीच्या सेवेत सन २००६ पासून कार्यरत आहेत. सेवेत तीन वेळा पदोन्नती मिळाली आहे. वैद्यकीय सेवेशी निगडित काम असल्याने अचूकता व तत्परतेवर लक्ष देतात. कंपनीत वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह आदी कार्यक्रम सहकाऱ्यांच्या मदतीने करतात. कर्करोग रुग्णांसाठी सी-केअर फाउंडेशनच्या माध्यमातून आरोग्यवर्धक शिबिरे, पोषक आहार वाटप, संगीत रजनी आदी कार्यक्रमांच्या आयोजनात भाग घेतला आहे. आरएसएस या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला आहे.





### श्री. रविंद्र हणुमंत चव्हाण

**(क्रेन ऑपरेटर)**
**कल्याणी कारपेंटर स्पेशल स्टील प्रा. लि., पुणे**

कंपनीत सन १९९४ पासून सेवेत आहेत. त्यांच्या कामाबद्दल व्यवस्थापनाने सहा बढत्या दिल्या आहेत. कामात ५-एस प्रणालीचे काटेकोर पालन करतात. कंपनीच्या विविध कमिट्या फाईव्ह-एस प्रणाली समिती, सुरक्षितता समिती, कायझेन यांच्या माध्यामातून उत्पादन व सुरक्षिततेसाठी प्रयत्नशील असतात. तसेच बचपन बचाओ समिती, पुणे यांच्यावतीने रस्त्यांवरील मुलांसाठी घरटं प्रकल्प राबविण्यात सहभाग आहे. विघ्नहर्ता न्यास-पुणे, भंडारी समाज सेवा ट्रस्ट, इंदिरा शिक्षण संस्था, पोलीस मित्र संघटना, भारत विकास परिषद आदी संस्थांच्या माध्यमातून पर्यावरण जनजागृती, आरोग्य शिबिर, एड्स जनजागृती, वधू-वर मेळावे, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, स्वच्छता मोहीम, कवी संमेलन आदी कार्यक्रमात भाग घेतला आहे.



### श्री. संजय चंद्रकांत कदम

**(स्पेशल असिस्टंट)**
**कोकण मर्कंटाईल को-ऑप. बँक लि. माझगाव, मुंबई**

बँकेत सन १९९५ पासून सेवेत आहेत. बँकेत ग्राहक संपर्क, संकलन व ठेवी वाढविण्याची मोहीम, विविध प्रशिक्षणे यात भाग घेतला. त्यांच्या कामाची दखल घेऊन व्यवस्थापनाने गौरव केला आहे. बँकेच्या एम्प्लॉइज युनियनच्या माध्यमातून कल्याणकारी उपक्रम व रक्तदान शिबिर यासारख्या कार्यक्रमांत सहभागी असतात. सामाजिक कामांमध्ये प्रामुख्याने गोल्डन पार्क सोसायटी व एव्हरेस्ट सोसायटीच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा विषयक कार्यक्रम राबविताना सक्रियभाग घेतला. अंध व कुष्ठरोग रुग्णांसाठी काम करतात.



### श्री. रोहिदास लक्ष्मण वीरकर

**(स्ट्रक्चरल फॅब्रीकेटर)**
**माझगाव डॉक शिप बिल्डर्स लि. डॉकयार्ड रोड, मुंबई**

सन १९९२ पासून कार्यरत आहेत. सेवेत तीन वेळा पदोन्नती प्राप्त केली आहे. विशेष म्हणजे भारतीय नौदलासाठी बांधलेल्या आय.एन.एस. मुंबई व आय.एन.एस. कोलकता या जहाज बांधणीत स्टील शिपराईट म्हणून काम केले आहे व त्यासाठी त्यांना 'डायरेक्टर अॅवार्ड' मिळाले आहे. माझगाव डॉक शिप बिल्डर्स स्थानीय लोकाधिकार समिती, माझगाव डॉक एस.सी./एस.टी. एम्प्लॉइज वेल्फेअर असोसिएशन व माझगाव डॉक शिप बिल्डर्स कर्मचारी सहकारी पतपेढीचे पदाधिकारी असून या माध्यमातून कामगारांच्या विविध उपक्रमात भाग घेतला आहे. रोटरी क्लब डोंबिवली, माझगाव डॉक मित्र मंडळ यांच्या विद्यार्थी गुणगौरव, सामाजिक कार्यक्रमात सक्रिय आहेत.



### श्री. अशोक काशिनाथ बारी (फुसे)

**(कामगार )**
**दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि.**
**गाडेगाव, तालुका जामनेर**
**जिल्हा जळगाव**

कंपनीच्या सेवेत सन १९९३ पासून आहेत. बारी पंच मंडळ व स्थानिक कामगार कल्याण केंद्राच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपतात. सामूहिक विवाह, गुणवंत पाल्यांचा सत्कार यात सहभाग असतो. कामगार नाट्य स्पर्धेत भाग घेतला आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ कामगार व कामगार कुटुंबीयांना मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.



### श्री. बळवंत राघोजी ठाकरे

**(तंत्रज्ञ-१)**
**चंद्रपूर महाऔष्णिक**
**विद्युत केंद्र**
**ऊर्जा भवन, चंद्रपूर**

आस्थापनेच्या सेवेत सन १९९१ पासून कार्यरत आहेत. चार वेळा पदोन्नती मिळाली आहे. विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन, भारतीय कामगार सेना, चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था यांचे सदस्य आहेत. राष्ट्र चेतना सामाजिक कल्चरल पर्यावरण सेवा समिती, विकलांग सेवा संस्था, महिला विकास व कल्याण समिती, मौलाना आझाद बहुद्देशीय संस्था आदीच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यात भाग घेतला आहे.



### श्री. दत्तात्रय प्रल्हाद अवसरकर

**(मशिनिस्ट ग्राईंडर ऑपरेटर)**
**टाटा मोटर्स, पिंपरी, पुणे**

कंपनीच्या सेवेत सन १९९५ पासून आहेत. एसटीडी टीमचे टीम लीडर, सेफ्टी स्टुवर्ड, एस्क्युडीसीएमई कार्यप्रणालीचा वापर, ५-एस प्रणाली, उत्तम हजेरी व शून्य अपघात, सुधारणा अशा पारितोषिकांचे मानकरी आहेत. मरणोत्तर नेत्रदान करण्याचे सहमतीपत्र त्यांनी दिले आहे. पोलीस मित्र म्हणूनही त्यांनी काम केले आहे. पर्यावरण संवर्धन समिती, नामदेव शिंपी समाज संस्था, पिंपरी सेरोलॉजिकल संस्था, तक्षशीला अनाथ बाल संगोपन शिक्षण संस्था तसेच टाटा मोटर्स यांच्यावतीने मतिमंद मुलांसाठी मदत, रक्तदान शिबिर, स्वच्छता कार्यक्रम, वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती, वृद्धाश्रमात मदत, व्होलिबॉल व क्रिकेट स्पर्धा आदी उपक्रमांत सहभाग घेतला आहे. कलासागर या संस्थेच्या माध्यमातून लेखन प्रसिद्ध झाले आहे.



## श्री. रमेश हरिभाऊ चांदेकर

**(एस-३)**
**इंड्रन्स टेक्नोलॉजी लि. चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे**

सन २००० पासून कंपनीच्या सेवेत आहेत. सेवेत दोन बढत्या मिळाल्या आहेत. उत्तम हजेरी व कामाबाबत व्यवस्थापनाने प्रमाणपत्र देऊन गौरविले आहे. तसेच त्यांना कायझेन ॲवार्ड, परफॉर्मन्स ॲवार्डने सन्मानित केले आहे. कामाच्या जागेत एक्झॉस्ट फॅन, कचरा डब्बा, वेस्टेज टाकण्यासाठी व्यवस्था, सुरक्षा व शून्य अपघात यासाठी दक्ष असतात. कर्णबधिर पालक संघाचे सभासद असून तेथेही मदत करतात. सिंहगड साहित्य या अंकात त्यांचे लेख, कविता प्रकाशित झाल्या आहेत. गुणवंत विद्यार्थी सत्कार, शैक्षणिक मार्गदर्शन, आरोग्य विषयक कार्यक्रम, वह्या पुस्तके वाटप, विविध क्रीडा स्पर्धा यासारख्या उपक्रमात भाग घेतला आहे.



## श्री. दिनकर यादव मशाखेत्री

**(कनिष्ठ अभियंता-ग्रेड-३)**
**चंद्रपूर थर्मल सुपर पॉवर स्टेशन (महाजेनको) ऊर्जा नगर, चंद्रपूर**

कंपनीच्या सेवेत सन १९९२ पासून कार्यरत आहेत. भारतीय कामगार सेनेच्या माध्यमातून कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. ज्येष्ठ नागरिक सत्कार, प्रबोधनात्मक कार्यक्रम, वृक्षारोपण, वैद्यकीय उपचारांसाठी मदत, जंगलात वृक्ष बीजरोपण, पुस्तके वह्या वाटप आदी कामात सहभाग आहे. पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे काम करतात. पर्यावरण मित्र पुरस्काराने सन्मानित आहेत. स्वयंरोजगार व व्यक्तिमत्व विकास शिबिर आदी कार्यक्रमात योगदान दिले आहे.



## श्री. शेख सलिमोद्दिन शेख करीमोद्दिन

**(वाहतूक नियंत्रक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, कळमनुरी आगार, हिंगोली**

महामंडळात सन २००५ पासून सेवेत आहेत. महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्नशील असतात. स्थानिक बँका, आस्थापनांना भेटी देऊन मासिक व त्रैमासिक पास योजनेचा प्रचार करून प्रवासी संख्या वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. इंधन बचतीसाठी समुपदेशन करतात. नूतन साहित्य मंदिर वाचनालय, संभाजी ब्रिगेड, खिदमत-ए-हुजाज कमिटी, सिरम प्रतिष्ठान, स्वा. तुळशीबाई सेवासंस्था, खुराना सावंत इंजिनिअरिंग संस्था, महाराष्ट्र शासन वन विभाग यांच्या माध्यमातून राष्ट्रीय दिन, सामूहिक विवाह सोहळा, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, स्वच्छ भारत अभियान आदी कार्यक्रमात सहभाग घेतला.



### श्री. सुरेश दौलतराव पानस्कर

**(मशिनिस्ट ग्राईंडर-ग्रेड ४)**
**किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, तालुका पलूस, जिल्हा सांगली**

कंपनीच्या सेवेत सन १९९८ पासून कार्यरत आहेत. कायझन, ५-एस प्रणाली आदींच्या माध्यमातून उत्पादन वाढ, गुणवत्ता व सुरक्षितता यासाठी प्रयत्नशील असत्तात. कंपनीने आयोजित केलेल्या क्वालिटी सर्कल, राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताह, ऊर्जा संवर्धन आदी कार्यक्रमांत सहभाग घेतात. व्यवस्थापनाने अपग्रेडेशन व पदोन्नती दिली आहे. किर्लोस्कर वॉश उपक्रमात स्वयंसेवक आहेत. संघटनेच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करतात. जिजामाता महिला संघटना, गुरुमाऊली महिला गृहउद्योग, जायंट्स ग्रुप ऑफ रामानंदनगर, विश्वभारती लोककला मंडळ, हनुमान सांस्कृतिक मंडळ, दत्त कला क्रीडा मंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुद्देशीय संस्था, किर्लोस्कर ब्रदर्स गणेशोत्सव मंडळ, सोशल क्लब आदींच्या माध्यमातून बेटी बचाओ अभियान, ग्रामस्वच्छता, रक्तदान शिबिर, कॅन्सर व एड्स रोगांविषयी जनजागृती, व्यसनमुक्ती कार्यक्रम, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा विविध कार्यक्रमांत भाग घेतला.



### श्री. आनंद मुकुंदराव जागीरदार

**(वाहतूक नियंत्रक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अकोला आगार, अकोला**

महामंडळाच्या सेवेत सन १९९३ पासून आहेत. महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी चालक व वाहक यांचे प्रबोधन केले व प्रवासी वाढवा अभियानात सहभाग घेतला. विविध शाळांमध्ये सहली व इतर बाबींसाठी एस.टी. बसेस वापरण्यासाठी जनजागृती करतात. दैनंदिन काम करीत असतानाच संगीत हा छंद जोपासला आहे. स्वच्छ भारत अभियानात सहभाग घेतला. त्यांनी लिहून संगीतबद्ध केलेले गीत अकोला विभागातील घंटागाडीवर वाजविले जाते. स्थानिक वृत्तवाहिनीवर फावल्या वेळात निवेदन करतात. किरण बहुद्देशीय मंच, आदर्श मंडळ, निरंकारी संस्था आदींच्या माध्यमातून सांस्कृतिक व सामाजिक काम करतात.



### श्री. बाबासाहेब ज्ञानदेव भोरकडे

**(सिनिअर ऑपरेटर)**
**ॲडव्हान्स एन्झाईम टेक्नोलॉजी लि. सिन्नर, नाशिक**

सन १९९४ पासून कंपनीच्या सेवेत कार्यरत आहेत. सेवेत ५ वेळा पदोन्नती मिळाली आहे. कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी विविध प्रशिक्षणे, कायझन, ५ - एस प्रणाली, जीएमएमपी आदींचा कामात अंतर्भाव केला. कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्रिमूर्ती कला क्रीडा मंडळ, युवा फाऊंडेशन, आनंद अमृत फाऊंडेशन, कामगार शक्ती फाऊंडेशन, अंधश्रद्धा निर्मूलन समिती आदींच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, श्रमदान शिबिर, विद्यार्थी गुणगौरव, अंधश्रद्धा निर्मूलन, योग साधना, नाट्य आदी कार्यक्रमात सहभाग घेतला.



### श्री. साताप्पा महादेव सुतार

**(बॉयलिंग हाऊस पंपमन)**
**जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना, हुपरी**

कारखान्यात सन १९९४ पासून कार्यरत आहेत. लेखनाचा छंदही जोपासला असून काव्यसंग्रह व कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. कर्नाटक राज्य दलित संघर्ष समिती यांचा साहित्यरत्न पुरस्कार मिळाला आहे. कारदगा ग्रामीण साहित्य संमेलनात भाग घेतला आहे. दि ग्रेट मराठा सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, वृक्षारोपण, प्रदूषण जनजागृती, पाणी वाचवा पाणी जिरवा आदी कार्यक्रमांत भाग घेतला.



### श्री. ज्ञानेश्वर वाळू जुंद्रे

**(ऑपरेटर-गुलेटिन कटर)**
**भारत प्रतिभूती मुद्रणालय, नाशिक**

मुद्रणालयात सन १९८९ पासून सेवेत आहेत. ३ बढत्या मिळाल्या आहेत. नोटबंदीच्या काळात विशेष काम केले. याव्यतिरिक्त ते स्टाफ युनियनचे पदाधिकारी आहेत. संघटनेच्या माध्यमातून कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. राष्ट्रीय कुस्तीपटू म्हणून अनेक पुरस्कार मिळवले आहेत. त्याचप्रमाणे कुस्ती खेळाचे राष्ट्रीय पंच आहेत. प्रेस एम्प्लॉइज क्रेडीट सोसायटीच्या माध्यमातून कामगारांसाठी योजना राबवितात. १०वी व १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, रक्तदान शिबिर, पर्यावरण कार्यक्रम, शैक्षणिक योजना यासारख्या उपक्रमांत त्यांनी भाग घेतला आहे.



### श्री. संदीप रघुनाथ पाचंगे

**(वरिष्ठ यंत्रचालक)**
**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, साक्री रोड, धुळे**

कंपनीच्या सेवेत सन २०११ पासून आहेत. त्यांना एक बढती मिळाली आहे. ग्राहकांना विजेचा पुरवठा वेळेवर व नियमित व्हावा, यासाठी प्रयत्नशील असतात. आशा फाउंडेशन, इंडियन रेड क्रॉस सोसायटी आदींच्या माध्यमातून सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट, करियर मार्गदर्शन, समुपदेशन कार्यशाळा आदी उपक्रमांत भाग घेतला आहे. नाटकांची विशेष आवड असल्यामुळे अखिल भारतीय नाट्य परिषद व अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेचे ते सदस्य आहेत. नाटकात केलेल्या कामामुळे त्यांना अनेक बक्षिसे मिळाली आहेत.



## श्री. किशन विठ्ठलराव शिर्लेकर

**(वरिष्ठ लिपिक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**गंगाखेड रोड, परभणी**

महामंडळात सन १९९२ पासून सेवेत आहेत. सेवेत पदोन्नती प्राप्त केली आहे. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा युवा पुरस्कार प्राप्त आहे. त्यांचे लिखाण दिवाळी अंकांत व स्वतंत्रपणे प्रकाशित झाले आहे. वनसंवर्धन, पर्यावरण रक्षण, कुटुंब कल्याण, आदी कार्यक्रमांत त्यांचा सहभाग असतो. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना शिबिर, सहकार शिबिरे यात त्यांनी सहभाग नोंदविला आहे.



## श्री. शंकर दत्तात्रेय नाणेकर

**(हेल्पर)**
**एम.पी.एन्टरप्रायजेस अँड असोसिएट,**
**कर्वे रोड, पुणे**

कंपनीच्या सेवेत १९९७ पासून आहेत. कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सदैव प्रयत्नशील असतात. त्याचबरोबर ते शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी येथील शाळेच्या व्यवस्थापन समितीवर कार्यरत आहेत. शाळेस स्वच्छ व सुंदर शाळा म्हणून पुरस्कार मिळाला आहे. शिवछत्रपती मंडळ व इतर संस्थांच्या माध्यमातून वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, स्वच्छता मोहीम, विविध क्रीडा स्पर्धा राबविण्यात भाग घेतला.



## श्री. इस्माईल नसरुद्दिन मुल्ला

**(वेल्डर कम गॅस कटर)**
**टाटा मोटर्स कंपनी लि. पिंपरी, पुणे**

कंपनीत सन १९९० पासून आहेत. कामाच्या ठिकाणी उत्पादकता, गुणवत्ता वाढीसाठी तसेच सुरक्षितता यासाठी प्रयत्नशील असतात. कायझेन, पोकायोके, वीज बचत, शून्य अपघात, उत्पादन खर्चात बचत या सुधारणा मोहिमेत सहभाग असतो. व्यवस्थापनाने प्रशस्तिपत्र देऊन त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा २०१४-१५ चा पर्यावरण संवर्धन पुरस्कार त्यांना मिळाला आहे. पोलीस मित्र संघटनेचे ते सक्रिय कार्यकर्ते आहेत. विद्यार्थी गुणगौरव, वधू-वर मेळावा, दुष्काळग्रस्तांना मदत, अपंगांना मदत, मतिमंद विद्यार्थ्यांसाठी कार्य, विविध क्रीडा स्पर्धा अशा अनेक सामाजिक उपक्रमांत त्यांनी भाग घेतला आहे.



### श्री. शिवराम मनोहर गवस

**(सुपरवायझर स्टोअर)**
**सिमंड मार्शल लि.**
**कासारवाडी, पुणे**

कंपनीच्या सेवेत सन २००० पासून आहेत. तीन वेळा पदोन्नती मिळाली आहे. कामाच्या ठिकाणी मशीनमध्ये तांत्रिक बदल करून मशीन ऑटोमॅटिक होण्यासाठी प्रयत्न केले. मानव अधिकार फोरम, पर्यावरण संवर्धन, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, सिंधुदुर्ग एकता प्रतिष्ठान, पोलीस मित्र संघटना, कोकण प्रवासी वाहतूक संघ आदी संघटनांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, अंधश्रद्धा निर्मूलन, मुलगी वाचवा अभियान, स्त्री भ्रूण हत्या जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, मतिमंद व विकलांग मुलांसाठी कार्यक्रम, कचरा व्यवस्थापन, नदी स्वच्छता मोहीम अशा कार्यात भाग घेतला.



### श्री. बाळासाहेब आबुराव बारवकर

**(सिनिअर टेक्निशियन)**
**ज्युबिलंट लाईफसायंसेस कंपनी लि.**
**निम्बूत, नीरा, बारामती, पुणे**

कंपनीच्या सेवेत १९९० पासून आहेत. सुरक्षा, अपघात विरहित काम, उत्पादन वाढीसाठी नवीन टेक्नॉलॉजी आत्मसात करणे, कंपनीच्या विविध उपक्रमात भाग घेणे आदी कामांमुळे व्यवस्थापनाने त्यांना गौरविले आहे. ज्युबिलंट कामगार युनियनचे सक्रिय सभासद आहेत. संघटनेच्या मदतीने कामगारांचे प्रश्न सोडविणे, मेडिक्लेम, आयुर्विमा, शैक्षणिक सेवा, आरोग्य सुविधा, विविध प्रशिक्षण शिबिरे आयोजनासाठी प्रयत्नशील असतात. बारामती वारकरी सेवा संघाचे तसेच व्यसनमुक्त महाराष्ट्र संघाचे अध्यक्ष आहेत. सामाजिक संस्थांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती शिबिर, गुटखाबंदी अभियान, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, शैक्षणिक कार्य, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, भूकंप व त्सुनामीग्रस्तांसाठी सेवा कार्य, दिव्यांग, अनाथ मुलांसाठी मदत अशा उपक्रमात भाग घेतला.



### श्री. गजानन नथू पाटील

**(वरिष्ठ तंत्रज्ञ-यांत्रिकी विशेष श्रेणी-II)**
**राष्ट्रीय केमिकल आणि फर्टिलायझर लि.**
**थळ, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

सन १९८४ पासून आस्थापनेच्या सेवेत आहेत. सेवेत ६ बढत्या मिळाल्या आहेत. कारखान्याने सर्वोत्तम कामगार म्हणून गौरव केला आहे. आरसीएफ थळ गुणविकास मंडळाचे ते सदस्य असून आंतरराष्ट्रीय अधिवेशनात सहभागी झाले आहेत. कंपनीत सेफ्टी, हेल्थ व एनव्हायरनमेंट कमिटी व वर्क्स कमिटी, दृष्टी गुणवत्ता मंडळ, सूचना योजना संघ आदीचे ते सदस्य आहेत. व्यवस्थापनाने सुरक्षा मित्र पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. युनियन प्रतिनिधी म्हणूनही ते काम करतात. यूथ कौन्सिल, सद्गुरू स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट, रुरल अँड यंग फाऊंडेशन, अलिबाग ग्राम पंचायत अशा सामाजिक संस्थांचे सक्रिय सभासद असून विद्यार्थ्यांना मदत, अंधश्रद्धा निर्मूलन, वैद्यकीय तपासणी शिबिर, वृक्षारोपण, पाणी अडवा पाणी जिरवा, रक्तदान शिबिर यात भाग घेतला.



### श्री. राकेश अनंत सावंत

**(सुपरवायझर/प्लॅनर)**
**वनाझ इंजिनिअर्स लि. पौड, पुणे**

कंपनीच्या सेवेत सन २००२ पासून आहेत. कंपनीत उत्पादकता समिती, गुणवत्ता मापन समिती, औद्योगिक सुरक्षा समिती, शालेय शिक्षण समिती, सांस्कृतिक कार्यक्रम समिती यात सदस्य म्हणून काम केले आहे. याव्यतिरिक्त वनाझ इंजिनिअर्स एम्प्लॉईज युनियन व को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे पदाधिकारी म्हणून काम केले आहे. वनाझ कामगार संघटना व वनाझ परिवार शिक्षण मंडळ, द पूना स्कूल फॉर ब्लाईंड व गर्ल्स ट्रेनिंग सेंटर, संस्कृती प्रतिष्ठान, सन्मती बाल निकेतन, राणा प्रताप संघ, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, साहस, अखिल मंडई मंडळ आदी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून आरोग्य शिबिर, औषध वाटप, निसर्ग संवर्धन, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण शालेय साहित्य वाटप, छायाचित्र स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, अनाथ मुलांना कपडे व खाऊ वाटप आदी उपक्रमांत भाग घेतला आहे.



### सौ. संगीता श्रीकांत जोगदंड

**(ज्युनिअर ऑफिसर)**
**धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप.बँक.लि., नवी सांगवी, पुणे**

बँकेच्या सेवेत २००२ पासून कार्यरत आहेत. डिजिटल पेमेंट सिस्टम, ग्राहक सेवा, नवोदित लेखनिक संगणकीय कामकाजात भूमिका, डॉक्युमेंटेशन आदी कामाशी संबंधित प्रशिक्षणे पूर्ण केली असून कामात त्याचा वापर करतात. मानवी हक्क संरक्षण जागृती संस्था, समता मित्र मंडळ, आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक संघटना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रतिष्ठान आदी सामाजिक संस्थांशी संलग्न असून अंध केंद्रास मदत, अनाथ मुलांना मदत, विद्यार्थी गुणगौरव, स्वच्छता मोहीम, वधू-वर सूचक मेळावे, रस्त्यावरील झाडांसाठी विशेष अभियान, व्यसनमुक्ती कार्यक्रम, प्रदूषण मुक्ती मोहीम व रक्तदान शिबिर अशा विविध कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला आहे. कर्तृत्ववान महिला पुरस्कार, पर्यावरण पुरस्कार, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार यांनी सन्मानित आहेत.



### श्री. गोविंद शिवराम जाधव

**(ऑपरेटर)**
**ए.सी.जी. असोसिएटेड कॅप्सुल्स प्रा.लि., शिंदेवाडी, शिरवळ, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा**

कंपनीच्या सेवेत २००० पासून कार्यरत आहेत. ३ पदोन्नती मिळाल्या आहेत. कंपनीतील टीपीएम, जीएमपी, सीएएमपी, एस.सेफ्टी इत्यादी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. कंपनीत स्पार्कल टीम मेंबर, सेफ्टी टीम मेंबर या उपक्रमांत सहभागी असतात. उत्तम कामाबद्दल स्टार कार्ड व त्सेक सर्विस अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले आहे. कंपनीच्या क्रेडीट को-ऑप. सोसायटीचे पदाधिकारी आहेत. उत्तम ट्रेकर आहेत. रक्तदान शिबिर, श्रमसंस्कार शिबिर यांचे आयोजन, वनवासी कल्याण आश्रमास शैक्षणिक साहित्य वाटप, एक मूल एक झाड या संकल्पनेतून वृक्षारोपण मोहीम राबवितात. जिल्हा परिषद शाळेतील २ मुलांना दत्तक घेऊन त्यांचा खर्च ते करतात. भारतीय मजदूर संघ संलग्न पुणे जिल्हा मजदूर संघाचे सदस्य आहेत. काळेवाडी-केंजळ गावचे उपसरपंच असून ग्रामस्वच्छता अभियान, जलसंधारण, पाणी अडवा पाणी जिरवा, बेटी बचाओ, प्लास्टिक निर्मूलन, अंधत्व निवारण आदी कार्यक्रमाच्या आयोजनात भाग घेतला.





## श्री. शरद बाबुराव सिरस

**(पर्यवेक्षक)**
**एच.एम.टी. लि.**
**चिखलठाणा, औरंगाबाद**

कंपनीत सन १९८५ पासून कार्यरत आहेत. ५ बढत्या मिळाल्या आहेत. महात्मा गांधींचे चित्र असलेले घड्याळ बनविण्याची त्यांची संकल्पना कंपनीने प्रत्यक्षात आणली व त्यास ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. दि एच.एम.टी. वर्कर्स अँड स्टाफ युनियनचे सभासद आहेत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सार्वजनिक वाचनालय, साई लताड प्रतिष्ठान, मृत्युंजय कृषी विज्ञान विकास मंडळ, श्री बालाजी संस्थान आदींच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, कुटुंब नियोजन, आरोग्य शिबिर, महिलांचा आर्थिक व व्यक्तिमत्व विकास, पाणलोट विकास कार्यक्रम यात सहभागी झाले. त्यांचा काव्यसंग्रह देखील प्रकाशित आहे. भूमिजन साहित्य संमेलन, अखिल भारतीय प्रगतिशील लेखक संघाचे राज्य अधिवेशन, मराठवाडा साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा ग्रंथोत्सव, अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन, विद्रोही कवी संमेलन अशा कार्यक्रमात सहभागी झाले आहेत.



## श्री. समीर लक्ष्मण लाड

**(गुणवत्ता आश्वासक निरीक्षक-एस ग्रेड) माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि. डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई**

सन १९९८ पासून कंपनीच्या सेवेत आहेत्त. सेवेत ३ वेळा पदोन्नती मिळाली आहे. ते माझगाव डॉक कर्मचारी सहकारी पतपेढीचे कार्यकारिणी सदस्य, माझगाव डॉक स्पोर्ट्स क्लब मेंबर, माझगाव डॉक एस.सी./एस.टी. कर्मचारी कल्याणकारी संघाचे कार्यकर्ते आहेत. संत गाडगे महाराज मिशन धर्मशाळा, महागणपती श्री नायगावेश्वर, दै.मुंबई सितारा, आशा सामाजिक शैक्षणिक संस्था, कालिकामाता सेवा मंडळ, लेक लाडकी अभियान, सद्भावना संघ, मैत्री संस्था, सद्गुरू नरेंद्र महाराज संस्थान व भक्त सेवा मंडळ, संप्रदाय संजीवनी योजना, मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, विद्यार्थ्यांना मोफत वह्या व पुस्तकांचे वाटप, दारूबंदी व प्रौढ शिक्षण, हुंडा विरोधी चळवळ अशा कार्यक्रमांत भाग घेतला. शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे, जय महाराष्ट्र पत्रकार संघाचा जन गौरव पुरस्कार, दै. मुंबई संध्याचे सन्मानपत्र, मैत्री संस्थेचा राष्ट्र चेतना सन्मान पुरस्कार मिळाला आहे.



## श्री. गोपीनाथ राजाराम जगताप

**(उप व्यवस्थापक)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड बांद्रा, मुंबई.**

आस्थापनेत सन १९८३ पासून सेवेत आहेत. तीन बढत्या मिळाल्या आहेत. उत्पादन वाढ आणि ग्राहक वीज भरणा वाढविण्याची त्यांच्यावर जबाबदारी आहे. एम.एस.ई.बी. भारतीय कामगार सेना व कर्मचारी सहकारी पतसंस्था (मर्या.) यांच्या माध्यमातून कंपनीत आरोग्य शिबिर, क्रिकेट व कॅरम स्पर्धा, रांगोळी इ. आयोजनामध्येभाग घेतला. परिसरातील सेवा सुविधांबाबत वृत्तपत्रांतून लिहितात. मराठा समाज, ब्राह्मण सेवा संघ, समर्पण सेवा चॅरिटेबल ट्रस्ट, संत गाडगे महाराज महिला सेवा संस्था अशा सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थी गुणगौरव सोहळा, मुलांना खाऊ वाटप, वधू-वर परिचय मेळावा, नेत्रदान जनजागृती व धान्य वाटप, रक्तदान शिबिर, वैद्यकीय शिबिर, चष्मा वाटप अशा विविध कार्यक्रमांत भाग घेतला.



### श्री अरूण लक्ष्मणराव भोसले

**(वरिष्ठ प्रचालक)**

**राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायजर्स लि.चेंबूर, मुंबई**

कंपनीच्या सेवेत सन १९८२ पासून आहेत. पाच वेळा बढत्या मिळाल्या आहेत. २५ वर्षांच्या उत्कृष्ट सेवेकरिता व्यवस्थापनाने सन्मानित केले आहे. कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी क्वालिटी सर्कल, सुरक्षा प्रशिक्षण आदीतभाग घेतला. वृतपत्रात लिखाण करतात. वृक्षारोपण, पर्यावरण रक्षण, कुटुंब कल्याण, नशाबंदी, स्वच्छता अभियान, रुग्णांना फळे वाटप आदी सामाजिक कामे केली आहेत. आर.सी.एफ. येथे 'ए मेरे वतन के लोगो' या विषयावर फोटो प्रदर्शन भरविले आहे.



### श्री. दत्तप्रसाद रामचंद्र शिरोडकर

**(सहायक ऑपरेटर)**

**जॉन्सन अँड जॉन्सन प्रा.लि. मुलुंड, मुंबई**

कंपनीच्या सेवेत १९९१ पासून आहेत. चार वेळा पदोन्नती मिळाली आहे. उत्कृष्ट कामाबद्दल तीन विशेष वेतनवाढी मिळाल्या आहेत. बेस्ट कायझेन, वॉर ऑन वेस्ट, बेस्ट सजेशन व उत्पादन वाढ यासाठी कंपनीने सन्मानित केले आहे. मुंबई वृत्तपत्र लेखक संघाचा समाज रक्षक पुरस्कार, महाराष्ट्र टाईम्सचा सिटिझन रिपोर्टर पुरस्कार, मनुष्यबळ विकास लोकसभा अकादमीचा आदर्श कामगार गौरव पुरस्कार, महाराष्ट्र २४ तासचा राज्यस्तरीय काव्य पुरस्कार यांनी सन्मानित आहेत. महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान, श्रीकृष्ण नगर रहिवासी सेवा मंडळ, विघ्नहर्ता नागरी सेवा सह. पतसंस्था, नांदोस ग्रामविकास संस्था आदी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सहभागी झाले आहेत.



### श्री. सतीश शरदचंद्र बेडेकर (अपंग)

**(यंत्र चालक)**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, चिपळूण, जि. रत्नागिरी**

कंपनीच्या सेवेत सन २००६ पासून आहेत. कामगार संघटनेच्या कार्यात सहभागी होतात. राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू असून पॅराऑलम्पिक संघटनेच्या मान्यतेखाली राष्ट्रीय व राज्यस्तरीय बॅडमिंटन, ॲथलेटिक्स, गोळाफेक, थाळीफेक आदी खेळात सहभागी झाले आहेत. पॅरा ऑलम्पिक संघटना रत्नागिरीचे सदस्य आहेत. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन व महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स पतसंस्था यांचे ते सभासद आहेत. महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय अपंग कर्मचारी व अधिकारी संघटना चिपळूणचे पदाधिकारी आहेत. भारतीय मानवाधिकार असोसिएशनचे रत्नागिरी जिल्हा कमिटीचे वेल्फेअर सेक्रेटरी आहेत. विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यात सहभागी असतात.

२०१७



## श्री. योगीराज नथ्थुजी घोटेकार

**(उच्च श्रेणी सहायक)**
**एल.आय.सी. ऑफ इंडिया**
**जैन कॉम्प्लेक्स, अमरावती**

महामंडळात सन १९९१ पासून कार्यरत आहेत. अमरावती एल.आय.सी.ओ.बी.सी. संघटनेचे सरचिटणीस असून अखिल भारतीय एल.आय.सी.ओ.बी.सी. संघटनेचे कोषाध्यक्ष आहेत. महात्मा फुले एल.आय.सी.ओ.बी.सी. कर्मचारी को-ऑप. सोसायटीचे उपाध्यक्ष आहेत. या माध्यमातून कर्माचाऱ्यांना आर्थिक मदत, मुलांसाठी शिष्यवृत्ती, आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर असे उपक्रम राबवितात. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती विभागाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार मिळाला आहे. विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरींग, मेडिकल, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्य करीत आहेत. प्रधानमंत्री गणतंत्र दिन रॅलीत महाराष्ट्र राज्य एनसीसी निदेशालयाचे प्रतिनिधित्व केले आहे. मातोश्री सावित्रीबाई फुले जनसेवा गौरव पुरस्काराचे मानकरी आहेत.



## श्री. सुरेश शिवाजी पोवार

**(आर.बी.सी.अटेंडंट)**
**जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., हुपरी-यळगुड, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर**

सन २००१ पासून कामाला आहेत. कौशल्य वापरून उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्नशील असतात. एका अपघाताच्या क्षणी त्यांनी सहकाऱ्याचे प्राण वाचविले होते. त्याबद्दल व्यवस्थापनाने कौतुक केले आहे. जवाहर साखर कामगार संघटना (इंटक) चे क्रियाशील सदस्य आहेत. कामगारांना शासनाचे विविध लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. विविध सामाजिक संस्थाच्या माध्यमातून रक्तदान, वृक्षारोपण, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, कामगारांच्या मुला-मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप, कावीळ तपासणी शिबिर, महिलांसाठी बचत गट आणि विविध सण उत्सव आदी उपक्रम राबविण्यात सहभाग घेतला. केंद्रीय कामगार शिक्षण मंडळामार्फत कामगारांसाठी विविध कार्यक्रमाच्या आयोजनात भाग घेतला.



## राज्यस्तरीय समरगीत/ स्फूर्तिगीत स्पर्धा २०१९

**राज्यस्तरीय समरगीत/ स्फूर्तिगीत स्पर्धा, जळगाव जामोद, जि. बुलढाणा येथे दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी नगर परिषदेच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडली.**










## दशावतारी नाट्य महोत्सव - ओरोस, सिंधुदुर्ग



सिंधुदुर्ग – श्रीदेव रवळनाथ मंदिर, ओरोस, ता.कुडाळ येथे दि.२५.०४.२०१९ ते दि.०९.०५.२०१९ या कालावधीत ४३ वा दशावतारी नाट्य महोत्सव झाला. स्पर्धेत १४ नाट्यसंघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन श्री.विजय चव्हाण (गटविकास अधिकारी, कुडाळ) आणि परितोषिक वितरण श्री.दिलीप पांढरपट्टे (तत्कालीन जिल्हाधिकारी) व श्री.प्रकाश रसाळ (राज्य परिवहन, सिंधुदुर्ग विभाग नियंत्रक) यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर श्रीमती माधवी सुर्वे (तत्कालीन सहायक कल्याण आयुक्त, ठाणे), श्री.संभाजी पवार (तत्कालीन प्र.कामगार कल्याण अधिकारी, चिपळूण) उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण श्री.रा.बा. खानविलकर, श्री.राजेंद्र गोसावी, श्री.लक्ष्मण दळवी यांनी केले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक  देव दीनाघरी धावला (बाळकृष्ण गोरे दशावतारी नाट्य मंडळ, कवठी), द्वितीय क्रमांक  महापुरुष (सावंतवाडी दशावतारी नाट्य मंडळ) आणि तृतीय क्रमांक – सत्वपरीक्षा (सिद्धेश्वर दशावतारी नाट्य मंडळ, दोडामार्ग) यांनी पटकावला.



## १२ वी औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा २०१९-२०



ठाणे - औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची १२ वी राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा कामगार कल्याण भवन, विक्रोळी येथे दि.२७ जानेवारी ते ११ फेब्रुवारी २०२० या कालावधीत झाली. विविध १६ आस्थापनांच्या नाट्यसंघांनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन सिने-नाट्य अभिनेत्री श्रीमती वंदना गुप्ते, सुप्रसिद्ध सिनेनाट्य अभिनेता संजय मोने व श्रीमती संजीवनी जाधव-खानविलकर, रिलायंस इंडस्ट्रीजचे एच.आर.प्रमुख श्री.विनय किर्लोस्कर, तत्कालीन प्र.कल्याण आयुक्त श्री.महेंद्र तायडे आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. श्रीमती माधवी सुर्वे (तत्कालीन सहायक कल्याण आयुक्त, ठाणे) श्री.रामेश्वर गवई (तत्कालीन कामगार कल्याण अधिकारी, ठाणे) यांनी स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

स्पर्धेत प्रथम क्रमांक - अर्जुन की अभिमन्यू (म.रा.वि.वि.कंपनी, वांद्रे), द्वितीय क्रमांक - जननी जन्मभूमी (म.रा.वि.वि.कंपनी, बुलढाणा) आणि तृतीय क्रमांक - क्रीन्स चेंबर (माझगाव डॉक स्पोर्ट्स क्लब, मुंबई) या नाटकांनी पटकावला.

## ६७ वा राज्यस्तरीय अंतिम नाट्य महोत्सव २०१९-२०



सोलापूर - राज्यस्तरीय नाट्य महोत्सव दि.१० ते २८ फेब्रुवारी २०२० या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे झाला. स्पर्धेत १८ संघांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन सोलापूरच्या महापौर श्रीमती कांचन यन्नम, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूरचे अध्यक्ष श्री.प्रकाश यलगुलवार व सिने दिग्दर्शक श्री.अमर देवकर यांच्या हस्ते झाला. यावेळी डॉ.घनश्याम कुळमेथे (सहायक कल्याण आयुक्त), श्री.समाधान भोसले (प्र.सहायक कल्याण आयुक्त, पुणे), श्री.छोटू जाधव (कामगार कल्याण अधिकारी, सोलापूर) आदी उपस्थित होते.

स्पर्धेत प्रथम क्रमांक - पूर्णविराम (कामगार कल्याण केंद्र - मांजर्डे), द्वितीय क्रमांक - तुझ्यात जीव रंगला (कामगार कल्याण केंद्र - सावंतवाडी) आणि तृतीय क्रमांक घटोत्कच (कामगार कल्याण केंद्र प्रभादेवी) या नाटकाने मिळवला.

## राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा - तपोवन, नाशिक




श्री सद्गुरू जनार्दन स्वामी आश्रम, पंचवटी, तपोवन, नाशिक येथे मंडळाची २६ वी कामगार भजन स्पर्धा आणि १६ वी महिला भजन स्पर्धा दि.२९ व ३० जानेवारी २०२० दरम्यान आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत १९ कामगार पुरुष संघ व १९ महिला खुले संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे परीक्षण सुमित्रा सोनवणे, हर्षद वडजे, निलेश गाढवे यांनी केले. उद्घाटन श्रीमती देवयानी फरांदे (आमदार), श्री.सतीश कुलकर्णी (महापौर) यांच्या हस्ते तर ह.भ.प.दामोदर महाराज गावले, श्री.महेंद्र तायडे (तत्कालीन प्र.कल्याण आयुक्त) यांच्या हस्ते परितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी रंगमंचावर श्री.धनश्याम कुळमेथे (सहायक कल्याण आयुक्त, म.का.,मुंबई), श्री.मनोज बागले (प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, म.का.मुंबई), श्री.जितेंद्र पाटील (विधी अधिकारी, म.का.मुंबई), श्री.सयाजी पाटील (प्र.सहायक कल्याण आयुक्त, नाशिक), श्री.कुंदन खेडेकर (कामगार कल्याण अधिकारी, जळगाव) आदी उपस्थित होते.

पुरुष विभागात प्रथम क्रमांक - गट कार्यालय चिपळूण अंतर्गत कणकवली केंद्राने तर महिला विभागात गट कार्यालय कोल्हापूर अंतर्गत बिंदुचौक केंद्राने पटकावला.



# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा



औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २५ वी आणि महिलांची २० वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दि.१२ ते १६ फेब्रुवारी २०२० या कालावधीत कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे पार पडली. स्पर्धा पुरुष (शहर), पुरुष (ग्रामीण), महिला (खुला गट) अशा तीन गटात आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत ११० संघ सहभागी होते. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास श्री.दिलीप वळसे-पाटील (मा.मंत्री, कामगार), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (मा.राज्यमंत्री, कामगार), डॉ.महेंद्र कल्याणकर (कामगार आयुक्त), श्री.बालाजी मुळे (सहायक उपाध्यक्ष, लोकमत मीडिया), श्री.महेंद्र तायडे (तत्कालीन प्र.कल्याण आयुक्त), श्री.दिलीपदादा जगताप (कामगार नेते), श्री.विशाल माने (कबड्डीपटू) आदी मान्यवर उपस्थित होते. पारितोषिक वितरण खासदार श्री.राजेंद्र गावित, आमदार तथा मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अर्जुन पुरस्कारप्राप्त कबड्डीपटू श्रीमती माया आक्रे-मेहेर, उपसचिव (कामगार) श्री.श्रीकांत पुलकुंडवार, ग्लोबल हॉस्पिटलचे एच.आर.प्रमुख श्री.संजय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.



## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा




पुरुष शहर (विजेता संघ) - मुंबई पोर्ट ट्रस्ट




पुरुष गामीण (विजेता संघ) - जे.एस.डब्ल्यू. डोलवी, रायगड




महिला (विजेता संघ) - ठाणे महानगर पालिका

## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा - खासबाग मैदान, कोल्हापूर

राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा दि.२४ ते २६ फेब्रुवारी २०२० दरम्यान राजर्षि छत्रपती शाहू महाराज कुस्ती मैदान, खासबाग, कोल्हापूर येथे पार पडली. स्पर्धेत १५३ पैलवानांनी सहभाग घेतला.स्पर्धेचे उद्‌घाटन छत्रपती श्री. संभाजीराजे भोसले (खासदार), श्रीमती निलोफर आचरेकर (महापौर), डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी (मनपा आयुक्त), हिंदकेसरी श्री.दीनानाथ सिंह, श्री.महेंद्र तायडे (तत्कालीन प्र.कल्याण आयुक्त) यांच्या हस्ते झाले. पारितोषिक वितरण अपर पोलीस अधीक्षक श्री.तिरुपती काकडे, हिंद केसरी श्री.विनोद चौघुले यांच्या हस्ते झाले. यावेळी श्री.धनश्याम कुळमेथे (सहायक कल्याण आयुक्त, म.का.,मुंबई), श्री. मनोज बागले (प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, म.का.मुंबई), श्री.समाधान भोसले (प्र. सहायक कल्याण आयुक्त, पुणे), श्री.विजय शिंगाडे (कामगार कल्याण अधिकारी, कोल्हापूर), श्री.राजेंद्र निकम (तत्कालीन प्र. कामगार कल्याण अधिकारी, सांगली), श्री.संभाजी पवार (तत्कालीन प्र. कामगार कल्याण अधिकारी, चिपळूण) आदी उपस्थित होते. कामगार केसरीचा किताब सदगुरू साखर कारखाना आटपाडी येथील पैलवान राजेंद्र कांबळे यांनी पटकावला तर कुमार केसरीचे मानकरी कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना येथील पैलवान महेश पाटील ठरले.






## राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा, नांदेड

दि.२३ जानेवारी २०२० रोजी ललित कला भवन, नांदेड येथे राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा पार पडली. गट कार्यालय स्तरावर आयोजित प्राथमिक फेरीतील अंतिम विजेते १३ संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेचे परितोषिक वितरण नांदेड वाघाळा महानगर पालिकेच्या महापौर श्रीमती दिक्षा घबाले यांच्या हस्ते करण्यात आले. रंगमंचावर डॉ.धनश्याम कुळमेथे (सहायक कल्याण आयुक्त, म.का. मुंबई), श्री.मनोज पाटील (प्र.सहायक कल्याण आयुक्त, औरंगाबाद), श्री.प्रसाद धस (कामगार कल्याण अधिकारी, नांदेड) आदि मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेत प्रथम क्रमांक- गट कार्यालय ठाणे, द्वितीय क्रमांक- गट कार्यालय, नागपूर व तृतीय क्रमांक- गट कार्यालय नायगाव यांनी पटकावला.





# आरोग्य शिबिर



परळ, मुंबई – हाफकिन जीव–औषध निर्माण महामंडळाच्या परेल येथील कामगार वसाहतीत दि. २७ व २८ नोव्हेंबर २०१९ रोजी गट कार्यालय, नायगाव तर्फे ग्लोबल हॉस्पिटलच्या सहकार्याने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १६० कामगार व कामगार कुटुंबीयांनी या शिबिराचा लाभ घेतला. श्री. सुभाष शंकरवार (महाव्यवस्थापक, हाफकिन), श्री. अमित डोंगरे (कामगार अधिकारी, हाफकिन) यांच्या सहकार्याने श्री.नंदलाल राठोड (तत्कालीन सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, मुंबई) आणि श्री.संतोष साबळे, (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय, नायगाव) यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विजय कुडतरकर (कल्याण निरीक्षक, ललित कला भवन, नायगाव) यांनी शिबिराचे आयोजन केले होते.



कांजुरमार्ग, मुंबई – कामगार कल्याण भवन, विक्रोळीतर्फे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत कामगारांकरीता दि.४ फेब्रुवारी २०२० रोजी रुणवाल ब्लिस, कांजुरमार्ग, मुंबई येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. श्रीमती माधवी सुर्वे (तत्कालीन सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, ठाणे) आणि श्री.रामेश्वर गवई (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय, ठाणे) यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती सायली नाईक (कल्याण निरीक्षक, कामगार कल्याण भवन, विक्रोळी) यांनी शिबिराचे आयोजन केले होते.

## रक्तदान शिबिर



नागपूर कामगार कल्याण भवन, राजे रघुजी नगर, इंदोरा, चिटणीस नगर, कन्हान आदी ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने रक्तदान शिबिरांचे माहे जानेवारी २०२१ मध्ये आयोजन करण्यात आले. यात एकूण १७८ जणांनी रक्तदान केले. डॉ.अनिता देसाई, डॉ.संजय पराते, डॉ.अनिता सरदेशपांडे, डॉ.संदीप महाकालकर, डॉ.रमेश वाघमारे, डॉ.सागर गवई, डॉ.चेतन मेश्राम व त्यांच्या सहकाऱ्यांनी सदर शिबिर यशस्वी केले. श्री.नंदलाल राठोड (सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, नागपूर), श्रीमती कांचन वाणी (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय १ - चंदन नगर - नागपूर), श्रीमती प्रतिभा भाकरे (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय २, विनोबाग्राम - नागपूर) यांच्या मार्गदर्शनाखाली सदर शिबिरांचे आयोजन करण्यात आले.



कोल्हापूर - कामगार कल्याण केंद्र, बिंदू चौक यांच्यावतीने दि.१५.८.२०२० रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात २१ जणांनी रक्तदान केले. श्री.समाधान भोसले (प्र. सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, पुणे), श्री. विजय शिंगाडे (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय, कोल्हापूर) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.संघसेन जगतकर (केंद्र संचालक) यांनी या शिबिराचे आयोजन केले.

## मास्क वाटप




कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे राज्यातील गरजू कामगारांना ४२,९४७ मास्कचे मोफत वाटप करण्यात आले. मंडळाच्या शिवण वर्ग शिक्षिकांनी सदर मास्क तयार केले होते.



## वृक्षारोपण



मुंबई – हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.१ जुलै २०१९ रोजी आयोजित कार्यक्रमावेळी वृक्षारोपण करतांना सहआयुक्त कामगार (माथाडी) श्री.रविराज इळवे.

## मतदार जनजागृती अभियान



लातूर– सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०१९ करिता मंडळातर्फे आणि भारतीय निवडणूक आयोगाच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास जी.श्रीकांत (जिल्हाधिकारी), श्री. सचिन क्षीरसगर (विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, लातूर), कालिदास लांडगे (यंत्र अभियंता, रा.प.महामंडळ, लातूर), श्री. भालचंद्र जगदाळे (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय, लातूर) यांची प्रमुख उपस्थिती होती.

## फळे व भाजीपाला संस्करण

उदगीर - कामगार कल्याण केंद्र, उदगीर यांच्यावतीने फळे व भाजीपाला संस्करण शिबिराचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये आयोजन करण्यात आले होते. केंद्र परिसरातील महिलांनी शिबिराचा लाभ घेतला. श्री.मनोज पाटील (प्र. सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद), श्री.भालचंद्र जगदाळे (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय, लातूर) यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती गीता महिंद्रकर (केंद्र उपसंचालिका) यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




## क्रिकेट स्पर्धा

कोल्हापूर- मंडळाच्या गट कार्यालय कोल्हापूरतर्फे दि.२६ डिसेंबर २०१९ ते २ फेब्रुवारी २०२० या कालावधीत दुधाळी क्रिकेट ग्राउंड, कोल्हापूर येथे कामगारांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत ३२ आस्थापनांच्या ५०० खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन आमदार श्री.चंद्रकांत जाधव, नगरसेवक श्री.प्रतापसिंह जाधव, गोकुळ शिरगाव मॅन्यु. असोसिएशनचे चेअरमन श्री.सचिन शिरगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पारितोषिक वितरण सोहळ्यास आमदार श्री.ऋतुराज पाटील, मौर्या ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री.मंगेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक महावितरण - कोल्हापूर संघाने तर द्वितीय क्रमांक वारणा उद्योग समूह - वारणानगर यांनी पटकावला.




श्री.समाधान भोसले (प्र. सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.विजय शिंगाडे (कामगार कल्याण अधिकारी, गट कार्यालय, कोल्हापूर), श्री.राजेंद्र निकम (कल्याण निरीक्षक, राजारामपुरी) श्री.संघसेन जगतकर (केंद्र संचालक), चंद्रकांत घारगे (सहाय्यक केंद्र संचालक, सागरमाळ), दिपक गावराखे (सहाय्यक केंद्र संचालक, संभाजीनगर), सचिन शिंगाडे (कनिष्ठ लिपिक) यांनी स्पर्धा यशस्वि करण्यासाठी परिश्रम घेतले.



पाळणाघर,
कामगार कल्याण भवन,
सातपूर,
नाशिक



ग्रंथालय,
कामगार कल्याण भवन,
सातपूर,
नाशिक



संगीत वर्ग,
ललित कला भवन,
नायगाव,
मुंबई



जलतरण तलाव,
कामगार क्रीडा भवन,
प्रभादेवी, मुंबई




टेबल टेनिस,
कामगार क्रीडा भवन,
प्रभादेवी, मुंबई



योगा वर्ग,
ललित कला भवन,
नायगाव, मुंबई



शिवणवर्ग,
कामगार कल्याण भवन,
अभ्युदय नगर,
मुंबई



शिवणवर्ग,
कामगार कल्याण भवन,
कुंडल,
सांगली



शिशुमंदिर,
कामगार कल्याण केंद्र,
कुडाळ,
सिंधुदुर्ग



अभ्यासिका,
कामगार कल्याण भवन,
राजेरघुजीनगर,
नागपूर




स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी
प्रशिक्षण वर्ग,
राजारामपुरी,
कोल्हापूर



कॅरम,
ललित कला भवन,
ना. म. जोशी मार्ग,
मुंबई




बॅडमिंटन,
कामगार कल्याण भवन,
सहकारनगर,
पुणे



व्यायामशाळा,
कामगार कल्याण भवन,
बजाजनगर,
औरंगाबाद



जिम्नॅस्टिक,
कामगार कल्याण भवन,
राजेरघुजीनगर,
नागपूर

# सदिच्छा भेट



श्री. अशोक चव्हाण, मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम- सार्वजनिक उपक्रम वगळून तथा पालकमंत्री), यांनी ललित कला भवन, नांदेड येथील नवीन इमारतीस दि.१८.०२.२०२० रोजी सदिच्छा भेट दिली. सोबत आमदार श्री.अमर राजूरकर, जिल्हाधिकारी श्री.विपिन इटनकर, माजी राज्यमंत्री श्री.डी.पी.सावंत, कामगार कल्याण अधिकारी श्री.प्रसाद धस.





मुंबई- कामगार कल्याण केंद्र- गोपीनाथ नगर, धारावी येथे आयोजित महिला मेळाव्यात संबोधित करताना श्रीमती वर्षा गायकवाड (मा.मंत्री, शालेय शिक्षण). समवेत श्री.नंदलाल राठोड (तत्कालीन सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, मुंबई)

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा





मुंबई – औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २५ वी आणि महिलांची २० वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दि.१२ ते १६ फेब्रुवारी २०२० या कालावधीत कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे पार पडली. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास मा.मंत्री (कामगार) श्री.दिलीप वळसे-पाटील, मा.राज्यमंत्री (कामगार) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, कामगार आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर (भा.प्र.से), प्र. कल्याण आयुक्त श्री. महेंद्र तायडे, लोकमत मीडियाचे सहायक उपाध्यक्ष श्री.बालाजी मुळे, कामगार नेते श्री.दिलीपदादा जगताप, कबड्डीपटू श्री.विशाल माने आदी मान्यवरांची उपस्थिती होती.